
किंमत रु. ३०
पृष्ठे ४४

# जीवन शिक्षण

मे २०२०

हीरक महोत्सवी महाराष्ट्र

**मंगल देशा, पवित्र देशा,
महाराष्ट्र देशा।
प्रणाम घ्यावा माझा हा
श्री महाराष्ट्र देशा॥**




ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र



राज्यातील शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र व एल.एफ.ई. यांच्या वतीने 'ऑनलाईन व्यावसायिक विकास मंच' सुरू करण्यात आला. याचे उद्घाटन दि. ६ एप्रिल २०२० रोजी संपन्न झाले. या प्रसंगी उपस्थित मा. ना. श्रीम. वर्षा गायकवाड, मंत्री, शालेय शिक्षण विभाग, मा. श्रीम. वन्दना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मा. श्री. विशाल सोळंकी, आयुक्त (शिक्षण), श्री. दिनकर पाटील, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र.

'ऑनलाईन व्यावसायिक विकास मंच' अंतर्गत राज्यातील साहित्यिकांशी संवाद साधण्यात आला. याप्रसंगी शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा करताना, सतिश सोळांकूरकर, इंद्रजित भालेराव, डॉ. यशवंत पाटणे व डॉ. विठ्ठल वाघ.






'माझ्या लेखनामागची प्रेरणा' या विषयावर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी ऑनलाईन संवाद साधताना प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले.

'ज्ञानाचा प्रवास' या विषयावर शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांशी ऑनलाईन संवाद साधताना प्रसिद्ध लेखक व विचारवंत संदीप वासलेकर.



# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**वर्ष ६५** **मे २०२०** **अंक २ रा**



❖ **प्रवर्तक :**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**दिनकर पाटील**
*संचालक तथा संपादक* **अध्यक्ष**

**विकास गरड,** *विभाग प्रमुख तथा सहायक संपादक* **सदस्य**

**डॉ. कमलादेवी आवटे,** *प्राचार्य,* **सदस्य**
*जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.*

**श्रीम. अश्विनी मुसळे-काळसर्पे**
*सहा. संचालक, लेखा* **सदस्य**

**दत्तात्रय थिटे,** *वरिष्ठ अधिव्याख्याता,* **सदस्य**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**श्रीम. वर्षाराणी भोपळे,** *वरिष्ठ अधिव्याख्याता* **सदस्य**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **निर्मिती सहायक : बाळकृष्ण वाटेकर**
*वरिष्ठ अधिव्याख्याता, प्रसार माध्यम* **सदस्य-सचिव**

❖ **मुखपृष्ठ व अंतरंग सजावट :**
**नूतन क्षीरसागर,** *आर्टिस्ट कम टेक्निशियन*

❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :**

❖ **मूल्य : रु. ३०/-** **वार्षिक वर्गणी रु. ३००/-**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ सोनियाचा दिवस | - | ५ |
| ❖ आव्हान कोविडचे : संधी सक्षमीकरणाची | दिनकर पाटील | ८ |
| ❖ महाराष्ट्र निर्मितीचा इतिहास | नामदेव गायकवाड | १० |
| ❖ साठीतला शैक्षणिक महाराष्ट्र | संदीप वाक्चौरे | ११ |
| ❖ वेध मुलींच्या शिक्षण प्रवासाचा... | डॉ. कमलादेवी आवटे | १५ |
| ❖ अध्ययन निष्पत्ती आणि सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन | डॉ. राजेश बनकर | १८ |
| ❖ मूल्यवर्धन कार्यक्रम : पुढचे क्षितिज | विद्याधर शुक्ल<br>मीनल दशपुत्रे | २१ |
| ❖ कर्मवीरांचा शैक्षणिक दृष्टिकोन | प्रा. प्रदीप हिवरकर | २५ |
| ❖ Education in Pandemic and Aftermath | आशुतोष पाटील | २६ |
| ❖ निकष : तंबाखूमुक्त शाळेचे | रमेश मुनेश्वर | २९ |
| ❖ जपणूक जैवविविधतेची | डॉ. सुधीर कुंभार | ३० |
| ❖ महाडचे बाल साहित्य संमेलन | अरुणा यादव | ३२ |
| ❖ प्रतिबिंब गुणवत्ता विकासाचे | रामनाथ कराड | ३४ |
| ❖ पंख अभिव्यक्तीचे | अनिता जावळे | ३६ |
| ❖ शासन निर्णय | - | ३८ |
| ❖ प्रिय संपादक | - | ४२ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



*या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय ....✍



मित्रांनो,

*ही आवडते मज मनापासुनी शाळा ।*
*लाविते लळा ही, जसा माऊली बाळा ।।*

प्र. के. अत्रे यांच्या कवितेच्या या ओळी ऐकल्या की, आपल्या सर्वांच्या मनात उभी राहते आपली बालपणीची शाळा आणि शाळेचा तो पहिला दिवस...

खरंच... शाळेचा पहिला दिवस आणि या पहिल्या दिवसाच्या तयारीसाठी पाल्यापेक्षा पालकांची होत असलेली धावपळ आणि त्यातून मूल पहिल्यांदाच शाळेत जाणार असेल तर मग विचारायलाच नको! पाल्यापेक्षा पालकांच्याच उत्साहाला उधाण आलले असते. दप्तर, पाटी, पुस्तके, गणवेश, टिफिन, वॉटर बॉटल अशी काही आवश्यक तर काही अनावश्यक खरेदी प्रत्येक पालक आपापल्या ऐपतीनुसार करीत असतो. जून महिन्याच्या पहिल्या, दुसऱ्या आठवड्यात कोणत्याही मार्केटमध्ये गेले तरी शालेय वस्तूंच्या दुकानातील झुंबड पाहून असे वाटते की, पालक आपले हरवलेले बालपण, आपल्या शालेय जीवनात अपूर्ण राहिलेल्या इच्छा-आकांक्षा या सर्वांतून पूर्ण करीत असावेत.

पण मित्रांनो, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर २०२० चे शैक्षणिक सत्र 'न भूतो, न भविष्यति' असे सुरू होणार असे दिसते आहे. नवीन गणवेश, नवीन वह्या-पुस्तकांचा सुगंध, हजारो चिमुकल्या पावलांची वाट पाहणारे शाळेचे प्रवेशद्वार, मुलांच्या हसण्याने, गोंधळाने जिवंत होणाऱ्या शाळांच्या इमारती हे सर्वच सध्या थांबले आहे. अनिश्चिततेच्या भोवऱ्यात अडकले आहे. सर्वत्र लॉकडाऊन आणि चिमुकल्यांच्या शाळांचा विलगीकरण इमारती म्हणून होत असलेला वापर, संपूर्ण जगाला बंदिस्त करणारा कोरोनो व्हायरस, रोज हजारोंनी वाढत जाणारी रुग्णांची संख्या आणि यामुळे सर्वांवर आलेला ताण तसेच सर्वत्र भीतीचे वातावरण यांमुळे प्रथम शैक्षणिक सत्र सुरू होण्याचे दिवस जवळ येत आहेत तरी भीतीमुळे, अनिश्चिततेमुळे पालकांचा, मुलांचा उत्साह कुठेच दिसत नाही. शाळा कशी आणि कधी सुरू होणार? झाली तर मुलांची सुरक्षितता खरंच शक्य होईल का? मुलांना शाळेत पाठवावे की नाही? असे अनेक यक्ष प्रश्न पालकांच्याच नव्हे तर सर्वच जनसामान्यांसमोर उभे आहेत.

पण मित्रांनो, आता या परिस्थितीत तुमची भूमिका फार महत्त्वाची आहे आणि तुमच्यावर माझा विश्वास आहे. मार्च महिन्यात लॉकडाऊन सुरू झाले तेव्हापासून ते आजतागायत 'शाळा बंद पण शिक्षण सुरू' हा उपक्रम महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून तुम्ही ज्याप्रमाणे अशा कठीण दिवसांतही मुलांना शिकते ठेवण्याचे यशस्वी कार्य केले तसाच प्रयत्न आपण या शैक्षणिक सत्राच्या आरंभी सुद्धा करू या. वाड्या, वस्त्या, डोंगर, जंगलव्याप्त दुर्गम भाग, शहरी, ग्रामीण अशा अनेक भौगोलिक, सामाजिक परिस्थितीतील प्रत्येक बालकाच्या शिकण्याची काळजी आपण घेऊ या. त्यासाठी जी पद्धती, जे माध्यम वापरावे लागेल ते आपण वापरू या. शाळा, घर कुठेही असले तरी माझे प्रत्येक मूल शिकले पाहिजे असा ध्यास घेऊ या. शिक्षण क्षेत्रातील तुमचा प्रदीर्घ अनुभव, शाळा व्यवस्थापन समिती, गावकरी, सर्व प्रशासकीय यंत्रणा आणि आम्ही तुमच्या सोबत आहोत; या आव्हानात्मक परिस्थितीत महाराष्ट्रातील प्रत्येक मूल शिकते ठेवण्यासाठी!

महाराष्ट्राचे हे हीरक महोत्सवी वर्ष आहे. आपल्या पुरोगामी राज्याच्या शैक्षणिक परंपरेचा इतिहास अतिशय वैभवशाली आहे. याच इतिहासाला साक्षी ठेवून कोरोनाच्या रूपात आलेल्या या आव्हानाचा सामना करीत शिक्षणाचा ज्ञानयज्ञ प्रज्वलित ठेवू या.

**दिनकर पाटील**
संपादक, जीवन शिक्षण

# सोनियाचा दिवस

**'सह्याद्रीचे वारे' या यशवंतराव चव्हाण यांच्या भाषण संग्रहातून.**

आपल्या पंतप्रधानांच्या शुभहस्ते आज पहाटे नवराज्याचे उद्घाटन झाले व त्यानंतर नुकताच हा समारंभ पार पडला. अशा रीतीने एकभाषी महाराष्ट्र राज्य व त्याचे पहिले सरकार अस्तित्वात आले.

सर्व मराठी बांधव एका राज्यात यावेत अशी मराठी जनतेची फार दिवसांपासूनची इच्छा होती. काही ऐतिहासिक घटनांमुळे मराठी लोक कित्येक शतके निरनिराळ्या राज्यांत विभागले गेले होते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीने मराठी लोकांचे एकभाषी राज्याचे स्वप्न आज साकार होत आहे.

ज्ञानेश्वरांनी एका वेगळ्या संदर्भात म्हटल्याप्रमाणे हा खरोखरच 'सोनियाचा दिवस' होय. अशा वेळी मराठी लोकांच्या आनंदाला पारावार उरला नाही यात काहीच आश्चर्य नाही. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील जनतेची जी विचलित अशी अवस्था झाली होती ती संपून आता महाराष्ट्राला यापुढे स्थैर्याचे दिवस येतील अशी आशा करण्यास मुळीच हरकत नाही. त्यायोगे लोकांना आता आपल्या विकासाच्या प्रश्नांकडे कटाक्षाने लक्ष देता येईल व विकास कार्याच्या बाबतीत येणाऱ्या निरनिराळ्या अडचणींना ते अधिक परिणामकारकपणे तोंड देऊ शकतील. त्याचबरोबर ज्या द्विभाषिक राज्याची आताच समाप्ती झाली त्याच्या सुनियंत्रित राज्य कारभाराची परंपरा यापुढेही चालविण्याची दक्षता आपण घेतली पाहिजे व त्याची कीर्ती अबाधित राखली पाहिजे. तेव्हा या प्रसंगी यापुढे आपल्याला कोणकोणती कामे करावयाची आहेत व त्यासाठी आपण आपली मानसिक व इतर सर्व दृष्ट्या कशी तयारी करावयास हवी या गोष्टीची मनाशी नीट उजळणी केली पाहिजे. आपण आज एका नव्या कालखंडात प्रवेश करीत आहोत व आपल्या आशा-आकांक्षांची पूर्तता करून घेण्याचा क्षण आता आला अशी जनतेची भावना आहे. नव्या महाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील ही सामान्य जनतेची अपेक्षा योग्य अशीच आहे. हा

> *१ मे १९६०. महाराष्ट्रातील प्रत्येक माणसासाठी हा सोनियाचा दिनु! मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा दिवस. या राज्याची शासन यंत्रणा कशी असेल, शिक्षण, कृषी, उद्योग या क्षेत्रांच्या विकासाला कसे प्राधान्य दिले जाईल आणि एकूणच शासन धोरण कसे असेल याचा मा. यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या भाषणात केलेला ऊहापोह....*

जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणे हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदू मानतो. त्याचबरोबर नव्या राज्यात शासनाच्या द्वारे लोकांची अधिक कार्यक्षम रीतीने सेवा घडेल अशा प्रकारे शासन यंत्रणेची पुनर्घटना व सुधारणा करण्यासही आताच चालना मिळाली पाहिजे.

आपल्यापुढे जे मूलभूत, आर्थिक व सामाजिक प्रश्न आहेत यांची योग्य ती उकल करावयाची असेल तर या प्रश्नांचा अखिल भारतीय संदर्भ आम्हांस विसरून चालणार नाही म्हणून महाराष्ट्राचे नागरिक हे प्रथम भारताचे नागरिक आहेत व नंतर ते महाराष्ट्रीय आहेत याची जाणीव आम्ही सतत ठेवू.

आता महाराष्ट्र राज्यापुरते बोलावयाचे म्हणजे महाराष्ट्रातील लोकांनी त्यांचा धर्म, जात अगर पक्ष कोणता का असेना, आपण सर्व एकच बांधव आहोत असे मानले पाहिजे. नवा महाराष्ट्रीय हा केवळ मराठी भाषा बोलणारा नव्हे, तर जो महाराष्ट्रात राहतो व आपल्या शक्तीनुसार त्याचे जीवन समृद्ध करतो असा प्रत्येक माणूस हा महाराष्ट्रीयच होय.

मी या आधी म्हटल्याप्रमाणे आपली शासन यंत्रणा ही बदलत्या कालमानास सुसंवादी अशी असली पाहिजे. समाजवादी पद्धतीने नियोजन करण्यास आज आपण बद्धपरिकर आहोत. आपली शासन यंत्रणा ही अशा प्रकारच्या नियोजनास पूर्णपणे मिळतीजुळती अशीच असली पाहिजे, हे लक्षात घेऊन

सचिवालय संघटनेची सुसंबद्ध अशा प्रकारे पुनर्रचना करण्यात आली आहे. नव्या महाराष्ट्र राज्याची बारा खाती असतील. या खात्यांचे अशा रीतीने गट करण्यात आले आहेत की, शक्यतो सर्व संबंधित बाबी एकाच खात्याकडे राहून निर्णय त्वरित घेता येतील व खात्याखात्यांतील पत्रव्यवहार अवास्तव वाढणार नाही. ग्रामीण भागांतील सहकारी चळवळ आणि ग्रामपंचायतींचे कार्य हे परस्परांवर अवलंबून असल्याकारणाने यांचा एका वेगळ्या खात्यात समावेश करण्यात आला असून या खात्यास 'सहकार व ग्रामीण विकास खाते' असे नाव दिले आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कामाचे वर्गीकरण करून 'इमारती व दळणवळण' आणि 'पाटबंधारे व वीज' असे त्याचे जे दोन सुस्पष्ट वर्ग पडतात त्यानुसार ही दोन वेगळी खाती करण्यात आली आहेत.

विदर्भ, मराठवाडा, कोकण व दुष्काळी भाग यांच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरविण्यात येईल व महाराष्ट्र राज्याचे सरकार यांचे हितसंबंध डोळ्यांत तेल घालून जपेल असे जे आश्वासन मी दिले होते त्याचा मी या ऐतिहासिक प्रसंगी पुनरुच्चार करतो. त्याचप्रमाणे केवळ मुंबईच्या नागरिकांनाच नव्हे तर इतर सर्व संबंधितांना मी पुन्हा असे आश्वासन देतो की, या शहराचे बहुरंगी नव्या राज्याचे सरकार सतत प्रयत्न करील. तसेच, नागपूर शहराचे महत्त्व टिकविण्याचाच नव्हे तर ते वाढविण्याचा सरकारचा कटाक्ष राहील.

आपल्या पंचवार्षिक योजनेचा सर्व भर ग्रामीण भागांची सुधारणा करण्यावर देण्यात आलेला आहे. ग्रामीण भागांत पुन्हा नवचैतन्य निर्माण करण्याच्या ध्येयास सरकार बांधील आहे. या दृष्टीने शेतीच्या उत्पादन पद्धतीचे आधुनिकीकरण करणे आणि ग्रामीण भागांमध्ये विजेचा प्रसार करणे, छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीस चालना देणे या कार्यक्रमांना अग्रहक्क देण्यात येईल. शेतीसंबंधित उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात सहकारी पद्धतीस प्राधान्य देण्याबाबत या शासनाचा आग्रह राहील.

शिक्षणाच्या बाबतीत माध्यमिक शिक्षणांत व्यावसायिक बाजूवर विशेष भर देण्यात येईल. हुशार विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारे अडचणी येऊ नयेत म्हणून शिष्यवृत्ती व अन्य मार्गांनी सर्व प्रकारे साहाय्य करण्यात येईल. त्याचप्रमाणे विदर्भ व मराठवाडा या भागांत सध्या ज्या शैक्षणिक सवलती चालू आहेत त्यात कपात करावयाची नाही असे सरकारचे धोरण राहील.

राज्यकारभार इंग्रजीच्या ऐवजी आता मराठीत चालविणे कसे इष्ट व निकडीचे आहे याची सरकारला पूर्ण जाणीव आहे. हा बदल कारभारांतील कार्यक्षमतेस बाधा येऊ न देता करावयाचा आहे. या कार्यास चालना मिळावी म्हणून सरकार 'डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेजेस' अशा नावाचे एक खाते ताबडतोब सुरू करीत आहे. त्याचप्रमाण मराठी साहित्य व इतर क्षेत्रांतील महत्त्वाचे संशोधन कार्य यांना उत्तेजन देण्याचाही सरकारचा इरादा आहे.

लोक कोणत्या भागात राहत आहेत, त्यांची भाषा कोणती आहे किंवा त्यांचा धर्म कोणता आहे अशा विचारास यत्किंचितही थारा न देता सर्व वर्गांच्या व सर्व जातींच्या लोकांना समान न्याय व समान संधी प्राप्त करून देणे असेच सरकारचे नेहमी धोरण राहील. केवळ परंपरेमुळे म्हणा, अगर परिस्थितीमुळे म्हणा, सुसंस्कृत जीवन जगणे ज्यांना अशक्य झालेले आहे अशा लोकांची स्थिती सुधारण्याचा सरकार सातत्याने प्रयत्न करील. नवबौद्धांच्या सवलतींच्या प्रश्नाचा मी येथ खास उल्लेख करू इच्छितो. धर्मांतरामुळे त्यांच्या काही अडचणी वाढलेल्या आहेत याची मला जाणीव आहे. सामाजिक वा आर्थिक दृष्ट्या जे दुर्बल आहेत यांना साहाय्य करण्याचे सरकारचे धोरण आहे. अर्थात जेथे असे करणे राज्यघटनेशी विसंगत होईल त्या बाबी याला अपवाद असतील. तसेच गांधीवधानंतर झालेल्या दंगलीत ज्यांची हानी झाली त्यांना दिलेल्या कर्जापैकी त्यांच्याकडे अद्याप येणे असलेल्या सर्व बाकीत सूट देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

आपले राज्य हे उद्योगधंद्यांच्या बाबतीत भारतात सर्वांच्या आघाडीवर आहे. यामुळे राज्यांतील उद्योगधंद्यांचा केवळ राज्याच्याच नव्हे तर सर्व देशाच्या अर्थ व्यवस्थेवर भलाबुरा परिणाम होतो. उद्योगधंद्यांचा पाया बळकट असल्याखेरीज आपल्या पंचवार्षिक योजना पूर्णपणे यशस्वी होऊ शकणार नाहीत. तेव्हा अशा परिस्थितीत औद्योगिकीकरणाची गती ज्यामुळे रोखली जाईल व राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होईल असे काहीही न करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरते. उत्पादन सारखे होत राहण्यासाठी व त्यांत वाढ होण्यासाठी उद्योगधंद्यांचा कारभार सुरळीत चालला पाहिजे. मालक व कामगार यांचे संबंध सलोख्याचे राहिले पाहिजेत. थोडक्यात म्हणजे औद्योगिक आघाडीवर शांतता नांदली पाहिजे. उद्योगधंद्यात जर सतत कलहाचे वातावरण राहिले तर उत्पादन चालू ठेवणेच मुश्किल होईल, मग वाढविण्याची

गोष्ट तर सोडाच. तेव्हा मालक व कामगार या दोघांसही न्याय्य होईल व सबंध समाजाचेही ज्याने हित होईल अशा औद्योगिक संधी निदान पाच ते दहा वर्षे राहणे आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे कारण अशा परिस्थितीतच उत्पादनाची वाढ निर्विघ्नपणे होत राहील. मालक व कामगार हे दोघेही जेव्हा समाजाच्या बाबतीतील आपली जबाबदारी ओळखतील तेव्हाच हे साध्य करता येईल. अशा प्रकारची औद्योगिक संधी घडवून आणण्यासाठी मालक व कामगार यांच्या प्रतिनिधींची एक परिषद भरविण्याचा सरकारचा मानस आहे.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी ज्या थोर नेत्यांनी अखंड सायास केले व आपले प्राण खर्ची घातले आणि ज्यांच्यामुळे आपण आज स्वातंत्र्याची फळे चाखतो आहोत, त्या नेत्यांचे स्मरण करून आपण श्रद्धांजली वाहू या. कार्यनिष्ठा व जनतेची सेवा ही जी उदात्त ध्येये त्यांनी आपल्यापुढे ठेवली ती गाठण्याचा सतत प्रयत्न करूनच आपण त्यांच्या स्मृतींचा खरा आदर करू.

महाराष्ट्राची ही भूमी अनेक संत, विद्वान, पराक्रमी वीर, त्यागी समाज सुधारक व देशभक्त यांच्या वास्तव्याने पुनीत झालेली आहे. संत ज्ञानेश्वर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व लोकमान्य टिळक ही आमची प्रातिनिधिक प्रतिके आहेत. त्यांनीच महाराष्ट्राच्या संस्कृतीची जोपासना केली व तिचा वारसा आपल्या हाती दिला. हा अमोल ठेवा आपल्या हृदयांत जपून ठेवणे व त्याचा विकास करणे हे प्रत्येक मराठी माणसाचे आद्य कर्तव्य ठरते. आज आपले मराठी भाषकांचे राज्य स्थापन होत असताना, आपल्या देशाची भरभराट करण्यास व त्याची कीर्ती दिगंतात पसरविण्यास आपले सर्वस्व देऊ अशी प्रतिज्ञा आपल्यापैकी प्रत्येकाने केली पाहिजे.

आज आपण महाराष्ट्राची व भारताची सेवा करण्याचे व्रत घेऊ या व आपले ध्येय गाठण्याकरिता शक्ती व बुद्धी दे अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करू या.

❖❖❖

---

## राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस

११ मे हा दिवस 'राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस' म्हणून देशभर साजरा केला जातो. ११ मे १९९८ या दिवशी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या मार्गदर्शनाखाली भारताने पहिली अणुचाचणी राजस्थानमधील पोखरण (भारतीय लष्कराचे क्षेत्र) येथे यशस्वीपणे पार पाडली. तसेच ११ मे १९९८ रोजी संरक्षण संशोधन विकास संघटनेकडून 'त्रिशूल' क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी पूर्ण केली गेली. देशातच विकसित पहिले स्वदेशी विमान 'हंस–३' ने त्याचे पहिले उड्डाण बेंगळूरू येथे घेतले. हे विमान वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषद च्या 'नॅशनल एरोस्पेस लॅबोरेटरीज' ने विकसित केले होते. देशाच्या या प्रचंड यशानंतर, भारताचे तत्कालीन माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ११ मे हा दिवस 'राष्ट्रीय तंत्रज्ञान दिवस' म्हणून घोषित केला. त्यानिमित्ताने हा दिवस साजरा केला जातो.

भारतात १९९९ पासून दरवर्षी तंत्रज्ञान विकास मंडळ यांच्या नेतृत्वात हा दिवस साजरा केला जातो. तंत्रज्ञान म्हणजे मूलभूत विज्ञानामधील तत्त्वांवर आधारित अवजारे, यंत्रे, त्यांपासून बनलेल्या प्रणाली यांची निर्मिती आणि उपयोजन यांचा अभ्यास करणारी तसेच त्यांत सुधारणा घडवून आणण्याबाबतची विद्याशाखा होय. प्राचीन काळापासून मानव तंत्रज्ञानाचा वापर व अभ्यास करत आहे. अगदी प्राचीन काळी नियंत्रित पद्धतीने आग चेतविण्याचे तंत्र मानवाने शोधून काढले. त्यानंतर चाकाचा शोध लावल्यामुळे मानवाला अधिक पल्ल्याचे अंतर कापण्यासाठी उपयुक्त तंत्रज्ञान उपलब्ध झाले. तेथून पुढे अगदी आधुनिक काळात छपाईचे तंत्रज्ञान, टेलिफोन, इंटरनेट या तंत्रांपर्यंत मानवाने तंत्रज्ञान विकसित केले आहे. तंत्रज्ञान विकसनामुळे मानवाचे जीवन अधिक सुकर बनत चालले आहे.

# आव्हान कोविडचे : संधी सक्षमीकरणाची

**दिनकर पाटील,**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे

*संकटे येतच असतात, पण संकटांनी डगमगून न जाता सकारात्मक दृष्टीने विचार करून त्याच्यावर मात करण्याबरोबरच एक संधी म्हणून त्याच्याकडे पाहिले तर काही चांगले नवे बदल घडून येतात, ज्यांची भविष्यात गरज असते. सध्या कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाने ठप्प झालेल्या परिस्थितीतही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांचे शिक्षण चालू रहावे यासाठी सुरु झालेले प्रयत्न आणि त्याला मिळालेला प्रतिसाद पाहता यातून सक्षमीकरणाची संधी मिळाल्याचे दिसून येते त्याविषयी....*

जगभरात कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावाने जग ठप्प होण्याची परीस्थिती निर्माण झाली. भारतात लॉकडाऊनच्या काळात सर्व आस्थापना बंद आहेत. अशा परिस्थितीत हे आव्हान पेलतांना त्याकडे संधी म्हणून पाहिले. त्याचाच प्रयत्न म्हणून विद्यार्थी व शिक्षण विभागातील अधिकारी यांच्या सक्षमीकरणासाठी ऑनलाईनचे प्रयत्न केले गेले. त्या प्रयत्नांसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांनी संधी म्हणून पहिले सकारात्मक पाऊल टाकले. त्या संधीतून झालेल्या राज्यस्तरीय प्रयत्नांचा हा मागोवा घेण्यात आला आहे.

**ऑनलाईन व्यावसायिक विकास मंच :** कोविड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव सुरू झाला. सर्वत्र लॉकडाऊन जाहीर झाला आणि जणू सर्व काही ठप्प झाले. सर्व कार्यालये बंद करावी लागली. या पार्श्वभूमीवर या आव्हानाला आम्ही संधी मानले. याही परिस्थितीत शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचे ऑनलाईन प्रशिक्षणाद्वारे सक्षमीकरण सुरू करण्याची कल्पना मांडली आणि सर्वांच्या सहकार्याने ताबडतोब ती अत्यंत यशस्वीपणे प्रत्यक्षात आली.

दि. ६ एप्रिल २०२० पासून आम्ही हा उपक्रम राबविण्यास सुरुवात केली. राज्यातील शिक्षण उपसंचालक, डायटचे प्राचार्य, शिक्षणाधिकारी, ज्येष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, विषय सहायक व परिषदेतील सर्व अधिकारी असे राज्यातील जवळपास ८०० अधिकारी झूमद्वारे या ऑनलाईन सक्षमीकरण सत्रात सहभागी झाले. 'लीडरशिप फॉर इक्विटी' या संस्थेच्या सहकार्याने हा कार्यक्रम सुरू करण्यात आला. व्यावसायिक विकास मंचाचे उद्घाटन शालेय शिक्षणमंत्री मा. ना. श्रीमती वर्षा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मा. श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, मा. श्री. विशाल सोळंकी, आयुक्त शिक्षण, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या पहिल्या ऑनलाईन सत्रात विद्यार्थ्यांसाठी लर्न फ्रॉम होम, दूरदर्शन व आकाशवाणीच्या माध्यमातून अध्ययन साहित्य उपलब्धता, विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्ययन नियोजन, ई-साहित्य निर्मिती यांबाबत चर्चा करण्यात आली. यानंतरचे प्रत्येक सत्र हे अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असावे असे नियोजन करण्यात आले होते.

माईंड फुलनेस, मूल्यमापन व सनियंत्रण, ताणतणावाचे व्यवस्थापन, शिक्षणामध्ये तंत्रज्ञानाची भूमिका, विविध देशांतील शैक्षणिक धोरणे व तेथील शैक्षणिक प्रयोग, दिल्लीमधील शैक्षणिक प्रयोगांबाबत मा. मनीष सिसोदिया, उपमुख्यमंत्री (शिक्षणमंत्री), श्री. विनय भूषण (शिक्षण संचालक, दिल्ली), श्री. शैलेंद्र शर्मा (शिक्षण संचालक, दिल्ली), मा. श्रीमती मृणाल कुलकर्णी यांचे पालकत्व व मानसिक आरोग्य, श्री. अच्युत गोडबोले यांचे माझ्या लेखनामागची प्रेरणा तसेच महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक डॉ. विठ्ठल वाघ, डॉ. यशवंत पाटणे, श्री. इंद्रजीत भालेराव, श्री. सतीश सोळांकूरकर, डॉ. संजय मालपाणी यांचे शिक्षणातील "5...S", डॉ. अर्चना ठोंबरे यांचे 'आरोग्य शिक्षण काळाची गरज' आणि 'अधिकारी घडताना' माझी स्वतःची मुलाखत अशी १९ सत्रे संपन्न झाली आणि अजून पुढे काही नियोजित आहेत. नेहमी सकारात्मक राहून, आपल्या पूर्ण कार्यक्षमतेने व अधिक लोकाभिमुख कार्यासाठी आपला दृष्टिकोन बदलण्याच्या दृष्टीने ही सत्रे अत्यंत उपयुक्त ठरल्याचे प्रतिसाद अनेक अधिकाऱ्यांनी

नोंदविले आहेत. या प्रकारचा ऑनलाईन सक्षमीकरणाचा हा प्रयोग प्रथमच आयोजित करण्यात आला आणि अद्यापही तो यशस्वीपणे सुरू आहे. ऑनलाईन अधिकारी विकास मंचसाठी आय. टी. विभागाचे प्रभारी प्राचार्य श्री. विकास गरड आणि त्यांच्या टीमने बरेच परिश्रम घेतले. या सक्षमीकरणाच्या ध्वनीचित्रफिती ६५००० पेक्षा जास्त लोकांनी पाहिल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

**केंद्रप्रमुख शैक्षणिक नेतृत्व विकास कार्यक्रम :** केंद्रप्रमुख हा प्रशासकीय यंत्रणेतील शिक्षण व शाळांसाठी जवळचा घटक आहे. या बदलत्या पार्श्वभूमीवर त्यांचे उद्बोधन करणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता वेबिनारद्वारे केंद्रप्रमुख शैक्षणिक नेतृत्व विकास कार्यक्रम परिषदेतील सी.पी.डी. विभागामार्फत सुरू करण्यात आला. हा कार्यक्रम ५ सत्रांत संपन्न होण्याबाबत श्री. महेश चोथे, प्रभारी प्राचार्य व श्री. अरुण जाधव, अधिव्याख्याता यांनी नियोजन केले. केंद्रप्रमुख हा केंद्रातील शाळांचे नेतृत्व करीत असतो. केंद्रातील मुख्याध्यापक आणि शिक्षकांना मार्गदर्शन करणे, शालेय गुणवत्ता वाढविणे, राज्याचे धोरण शाळांपर्यंत पोहोचविणे, त्यांची अंमलबजावणी करणे, ही कामे केंद्रप्रमुख करीत असतात. या सर्व बाबी अधिक परिणामकारक व्हाव्यात यासाठी वेबिनारच्या माध्यमातून उद्बोधन केले जात आहे.

वेबिनारच्या पाहिल्या सत्रांत ३९३६ केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांनी सहभाग नोंदविला. सदर सत्रामध्ये मा. श्री. विशाल सोळंकी आयुक्त (शिक्षण) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आयुक्त मा. सोळंकी म्हणाले, ''पुढील शैक्षणिक वर्षे आव्हानात्मक असतील, भविष्यातील शिक्षण कसे असेल याचा पाया घालावा लागेल. केंद्रप्रमुखांनी आपली कौशल्ये विकसित करून वेळेचा सदुपयोग करावा. त्याद्वारे विद्यार्थी गुणवत्तावाढीसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन त्यांनी केले. राज्य स्तरावरून दिली जाणारी अभ्यास माला प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त करीत असताना, गुणवत्तेच्या दृष्टीने हे कसे महत्त्वाचे आहे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. श्री. विकास गरड, उपसंचालक यांनी यावेळी दीक्षा ॲप व सह्याद्री वाहिनीवर सुरू असलेल्या 'गली गली सीम' या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली.

वेबिनारच्या दुसऱ्या सत्रांत मा. श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव यांनी विद्यार्थ्यांच्या अध्ययनाच्या नोंदी व केंद्रप्रमुखांना केंद्रात येणाऱ्या अडचणी यांबाबत मार्गदर्शन केले.

वेबिनारचे तिसरे सत्र दि. २१ मे २०२० रोजी आणि वेबिनारचे चौथे सत्र दि. २८ मे २०२० रोजी संपन्न होत आहे.

**विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन स्वअध्ययन व गृहपाठ अभ्यास माला :** कोविड-१९ या आजाराच्या पार्श्वभूमीवर राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमधील आय. टी. विभागामार्फत राज्यातील विद्यार्थी घरी असल्याने त्यांचा अभ्यास सुरू रहावा या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या प्रयत्नांना राज्यातील शाळा, पालक व विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला असल्याचे आढळून येत आहे. करोना विषाणूच्या संसर्गामुळे उन्हाळी सुट्टी सुरू होण्यापूर्वीच शाळा बंद झाल्या आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून मा. शालेय शिक्षण मंत्री श्रीम. वर्षा गायकवाड यांच्या प्रेरणेने परिषदेच्या वतीने दररोज इ. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १३ एप्रिल २०२० पासूनच ऑनलाईन स्वयंअध्ययन अभ्यास मालिका सुरू करण्यात आली आहे.

अध्ययनाचे दैनंदिन नियोजन करून दररोज इयत्तानिहाय प्रत्येक विषयातील दुसऱ्या सत्राच्या घटकाची लिंक विकसित करून व्हॉट्सॲपच्या माध्यमातून विद्यार्थांपर्यंत पोहोचविली जात आहे. सदरील लिंकच्या माध्यमातून दीक्षा ॲपवरील ई-साहित्य मुलांसाठी उपलब्ध होत आहे. यामध्ये अनुरूप चित्रे, संवाद, ध्वनीचित्रफिती, कृती व प्रश्नांचा समावेश आहे. आता मे महिना हा उन्हाळी सुट्टीचा कालावधी असल्याने, दि. २७ एप्रिल २०२० पासून सहशालेय उपक्रम व कृतींवर आधारित घटकांचा समावेश केला आहे. 'प्रथम' संस्थेसोबत 'मिस कॉल द्या गोष्ट ऐका' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. टोल फ्री क्रमांक ०८०३३३०९४२४३ वर फोन करून मुले आपल्या भाषेतील गोष्ट ऐकू शकतात. युनिसेफच्या सहकार्याने कोरोना योद्धा (व्हायरस वीर) हे पुस्तक विद्यार्थ्यांचे नाव टाईप करून ऑनलाईन तयार होते. ज्यामध्ये कोरोना टाळण्यासाठी कोणती काळजी घ्यावी हे कळते. विद्यार्थ्यांना स्पोकन इंग्लिश, पूरक वाचनासाठी गोष्टींची पुस्तके, कार्यानुभवाच्या छोट्या कृती, संगीत, नाटक, गायन आणि वाद्य वादनाचा समावेश केला आहे. इ. पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारी बाबतीतही मार्गदर्शन करण्यात येत आहे. राज्यातील जवळपास २२.४ लाख विद्यार्थ्यांनी या ऑनलाईन स्वअध्ययन मालिकेचा लाभ घेतला असून १.१६ कोटी इतक्या वेळा हे ई-साहित्य पाहण्यात आले आहे. सदरील अभ्यास माला विद्यार्थ्यांना उपयुक्त असल्याबाबत राज्यामधून अनेक विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया आय. टी. विभागास प्राप्त होत आहेत. लॉकडाऊनच्या या काळात महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबू नये तसेच माझा प्रत्येक शिक्षक व अधिकारी घरी राहून सुद्धा कार्यप्रवण असावा यासाठी उपरोक्त उपक्रमांच्या माध्यमातून यशस्वी प्रयत्न केले जात आहेत.

❖❖❖


# महाराष्ट्र निर्मितीचा इतिहास

**नामदेव गायकवाड**
जि. प. प्राथ. शाळा मरकळ क्र.२, ता. खेड, जि. पुणे. भ्रमणध्वनी : ९९२३२५२७९८

*'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' या गीताच्या सुरांनी उगवणारा १ मे चा महाराष्ट्र दिन आपण उत्साहाने साजरा करतो. महाराष्ट्राची लोकधारा समजून घेताना महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा इतिहास ज्ञात असावा. ज्यांनी या राज्याच्या निर्मितीसाठी हौतात्म्य पत्करले त्यांचेही स्मरण ठेवले पाहिजे.*

१ मे रोजी सर्वत्र महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा होतो. औपचारिकपणे हा सण साजरा होण्याबरोबरच त्यामागची त्यागमय पार्श्वभूमी सर्व समाजाला माहीत होणे महत्त्वाचे आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात शेकडो हुतात्म्यांनी दिलेल्या बलिदानाची माहिती सर्वसामान्यांपर्यंत जावी, त्यांनी केलेल्या त्यागाची यशोगाथा तरुणांनी जाणून घ्यावी ही खरी महाराष्ट्र दिन सोहळ्याची सार्थकता ठरेल. याबाबत होत असलेल्या कार्यक्रमांमधून या दिवसाच्या पार्श्वभूमीची माहिती सर्वत्र पोहोचणे गरजेचे आहे. शाळा, महाविद्यालये, मंडळे, संस्था, वर्तमानपत्रे, प्रसारमाध्यमे अशा सार्वजनिक ठिकाणांहून समाजात सकारात्मक संदेश पोहोचणे महत्त्वाचे ठरेल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावार प्रांतरचना करणाऱ्या राज्य पुनर्रचना आयोगाने मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा निर्णय घेतला होता. मराठी माणूस या निर्णयाने व्यथित झाला व खवळून उठला. याचा एकत्रित परिणाम म्हणून २१ नोव्हेंबर १९५५ रोजी गिरणी कामगारांसोबत सर्वसामान्य महाराष्ट्रप्रेमी समाज मुंबईत घोषणा देत जमा झाला. शांततापूर्ण सत्याग्रह उधळून लावण्यासाठी सरकारने लाठीमार केला, दडपशाही केली, पण आंदोलक शांत झाले नाहीत. शेवटी बेधडक गोळीबार करण्यात आला. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात अनेकांनी छातीवर गोळ्या झेलल्या, पण ते मागे हटले नाहीत. १९६० च्या दशकातील या आंदोलन मालिकेत १०५ हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. मराठी माणसांच्या या एकीमुळे, त्यागामुळे व बलिदानामुळे पुढे १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. आजही या ठिकाणचे हुतात्मा स्मारक सर्वांना अभिमानास्पद वाटत आहे. भारत देशाची आर्थिक राजधानी मुंबईसह बनलेला अखंड महाराष्ट्र प्रत्येक मराठी माणसाच्या निस्सीम त्यागाची यशस्विता आहे. त्याच्या बलिदानाचे फळ आहे.



महाराष्ट्र दिनी या हुतात्म्यांचे स्मरण करणे, त्यांचे विचार सर्वत्र पोहोचविणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. अनेक राजकीय नेते, साहित्यिक, नाटककार, गायक, शाहीर, पत्रकार, एकंदरीत सर्वांनीच संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठी अथक परिश्रम केले, चळवळी केल्या व सत्याग्रह केले. त्यांच्या कार्याची आठवण व विचार पुढील पिढीपर्यंत संक्रमित करणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र उभारण्यासाठी या सर्वांनी केलेल्या त्यागाची विचारधारा सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचविल्यास खऱ्या अर्थाने महाराष्ट्र दिन साजरा होईल असे वाटते.

# साठीतला शैक्षणिक महाराष्ट्र

**संदीप वाक्चौरे**
विषय सहायक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर. भ्रमणध्वनी : ९४०५४०४५००

*एखाद्या राज्याचा विकास तेथील भौतिक सुविधा, कृषी, उद्योग, वाहतूक व्यवस्था, आरोग्य सुविधा, विकसित समाज आणि शिक्षण अशा विविध पातळ्यांवर राज्याने गाठलेली उंची बघूनच मोजता येतो. यात शिक्षण महत्त्वाचे आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही; कारण शिक्षणाच्या भक्कम पायावरच इतर बाबींमधील प्रगती अवलंबून असते, म्हणूनच महाराष्ट्र राज्याच्या साठीच्या निमित्ताने सिंहावलोकन करताना महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रवासाचा, प्रगतीचा घेतलेला आढावा....*

या वर्षी महाराष्ट्राची ''साठी'' आहे. खरे तर व्यक्तीच्या आयुष्यात साठ वर्षांचा कालखंड खूप मोठा असला तरी राष्ट्र, राज्य किंवा एखाद्या संस्थेसाठी हा कालावधी फार मोठा नाही. मात्र तरी सुद्धा एखाद्या राज्याला साठ वर्षे पूर्ण होणे आणि त्या निमित्ताने प्रगतीच्या आलेखाचे सिंहावलोकन करीत पुढे जाणे महत्त्वाचे आहे.

१ मे १९६० महाराष्ट्रासाठीचा महत्त्वाचा दिवस आहे. १०५ हुतात्म्यांनी रक्त सांडत बलिदान दिल्यावरच या राज्याची निर्मिती झाली आहे. या राज्याने भारताच्या एकूण विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे योगदान दिले आहे. राज्याची संस्कृती, प्राचीन परंपरा, भाषा, समृद्ध साहित्य, सांस्कृतिक वैभव आणि येथील हिमालयाच्या उंचीची माणसे, समृद्ध विचारांचे राजकारणी, व्यावसायिक, उद्योजक यांनी साठीच्या प्रवासात दिलेल्या योगदानाने महाराष्ट्राची मान उंचावली आहे.

कोणत्याही राज्याचा विकास केवळ भौतिक सुविधांच्या उपलब्धतेवर मोजता येत नाही. त्या राज्यातील समाज निर्मितीची प्रक्रिया करणाऱ्या शिक्षणाचा आलेख किती उंचावला आहे, त्यावर त्या राज्याची प्रगती मोजली जात असते. त्या राज्यातील शिक्षणाची गुणवत्ता आणि विस्तार हा प्रगतीच्या अनेक मापदंडांपैकी एक मापदंड आहे. राज्यातील शिक्षणाची व्यवस्था विकसित करीत आपण साठीचा प्रवास केला आहे. त्या प्रवासात बरेच काही कमावले आहे. त्याचा अभिमान आहेच; पण अजूनही आपणाला जागतिक स्पर्धा आणि गुणवत्तेचा विचार करता बराच पल्ला गाठायचा आहे. त्यासाठी या प्रवासाचे सिंहावलोकन करावे लागणार आहे. या राज्याने गेल्या साठ वर्षांत उभारलेली शिक्षणाची गुढी आणि शिक्षणक्षेत्रात केलेली प्रगती भारत देशासाठी निश्चित स्पृहणीय आणि अभिमानास्पद आहे.

भारतीय शासनव्यवस्थेचे स्वरूप संयुक्त प्रकारचे आहे. भारत हे संघराज्य आहे. विविध राज्ये ही त्या संघराज्याचे घटक आहेत. त्यामुळे राज्य व केंद्र सरकारच्या जबाबदाऱ्या राज्यघटनेने ठरवून दिलेल्या आहेत. सध्याच्या प्रचलित कायद्याप्रमाणे शिक्षण हा संयुक्त सूचीतील विषय आहे. आरंभी राज्यघटनेच्या मार्गदर्शक कलम ४५ प्रमाणे प्रत्येक मुला-मुलीस वयाच्या १४ वर्षांपर्यंत प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत देण्याची तरतूद करण्यात आली होती.

राज्याची स्थापना झाल्यानंतर त्यावेळच्या शैक्षणिक स्थितीचे चित्रण आणि वर्तमानातील चित्र समजावून घेतले, तर आपण बरेच काही कमावले आहे असे सहजतेने लक्षात येईल. १९६० ला राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ३४ हजार ८६४ इतकी होती. विद्यार्थी संख्या सुमारे ४५ लाख सहा हजार होती आणि प्राथमिक शिक्षणाचा खर्च १६.३० कोटी इतका होता. माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या २ हजार १९८ होती. विद्यार्थी संख्या अवघी ५ लाख २८ हजार इतकी होती आणि त्यासाठीचा खर्च ९ कोटी ६३ हजार इतका होता. उच्च शिक्षणाचा विचार करता १८७ महाविद्यालये होती आणि विद्यार्थी संख्या १ लाख १० हजार ६५९ होती. त्यावेळी उच्च शिक्षणावरील खर्च हा ६ कोटी ५३ लाख इतका होता. राज्य स्थापनेच्यावेळी असलेले हे चित्र पाहता सध्या हा आलेख फारच उंचावलेला असल्याचे लक्षात येईल. राज्यात

सध्या १ लाख ४ हजार ९७१ प्राथमिक शाळा आहेत. त्या शाळांमध्ये एकूण १ कोटी ५९ लाख ८५ हजार ७१२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक स्तरावर अध्यापनासाठी ५ लाख ३० हजार चारशे पंच्याऐंशी शिक्षक कार्यरत आहेत. राज्यात २५ हजार ७३७ माध्यमिक शाळा आहेत. त्या शाळांमध्ये ६६ लाख १४ हजार ६५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या स्तरावर अध्यापनासाठी दोन लाख १२ हजार ९८१ शिक्षक कार्यरत आहेत. राज्यात एकूण ९ माध्यमांच्या शाळा आहेत. ८७ टक्के प्राथमिक शाळा असून ७८ टक्के शाळा या माध्यमिक स्तराच्या मराठी माध्यमाच्या आहेत. राज्यात उच्च शिक्षणाचा विस्तार देखील खूप मोठ्या प्रमाणावर आहे. राज्यात सध्या २ हजार ३५६ महाविद्यालये आहेत. तेथे ११ लाख १२ हजार ५४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची संख्या ६३९ असून तेथे सुमारे २५ हजार ८७० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या २ हजार ७४५ असून १ लाख १९ हजार ७७७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याच बरोबर अभियांत्रिकी महाविद्यालयांची संख्या १०६४ असून तेथे ५ लाख ९१ हजार ४८२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्याच बरोबर कृषी, वैद्यकीय, तंत्रज्ञान, संगणकीय यांसारख्या विविध शाखा मिळून राज्यात ९ हजार ४१४ महाविद्यालये आहेत. त्या ठिकाणी २१ लाख २९ हजार ६७६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची संख्या ८४६ इतकी असून विद्यार्थी क्षमता १ लाख २६ हजार ५९८ आहे. शिक्षणासाठी राज्याच्या अंदाजपत्रकात सर्वसाधारण ५५५२७.४५ कोटींची तरतूद करण्यात येत आहे. तांत्रिक शिक्षणासाठी २२७५.०२ कोटी रुपये, क्रीडा युवक सेवा ३८०.१८ कोटी रुपये अशी तरतूद अंदाजपत्रकात करण्यात येत आहे. राज्यातील शिक्षणाचा विस्तार आणि खर्चाचा आकडा लक्षात घेता हा विस्तार लक्षणीय झाला आहे असेच म्हणावे लागेल. राज्याच्या स्थापनेपासून आपण आज कोठे जाऊन पोहोचलो हे यावरून सहज लक्षात येईल.

राज्य आस्तित्वात आले तेव्हा महाराष्ट्रात मुंबई विद्यापीठ (१८५७), स्त्रियांसाठी ना. दा. ठाकरसी विद्यापीठ (१९५१), नागपूर विद्यापीठ (१९२५), पुणे विद्यापीठ (१९४८), मराठवाडा विद्यापीठ (१९५८) अशी पाच विद्यापीठे अस्तित्वात होती. त्यानंतर १९६२ ला कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. अमरावती, सोलापूर तसेच नाशिक येथील आरोग्य विद्यापीठ या विद्यापीठांची भर पडली. कृषी विद्यापीठांची संख्या देखील स्थापनेनंतर वाढली आहे. राज्यात विधी, कृषी, वैद्यकीय, तंत्रज्ञान अशा विविध विषयांच्या संदर्भाने शासकीय, खाजगी, स्वायत्त विद्यापीठांची स्थापना करण्यात आली आहे. राज्यात सध्या एकूण विद्यापीठांची संख्या ६२ च्या आसपास पोहोचली आहे. हा साठ वर्षांतील विस्तार निश्चित अभिमानास्पद आहे.

राज्यात १९६० ला शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेतली, तर साठ वर्षानंतर आपण सुमारे ९९ टक्के विद्यार्थी दाखल करण्यात यश मिळविले आहे. यामागे शिक्षणासंदर्भातील जाणीव जागृती करण्यात राज्याचे प्रयत्न, त्याचबरोबर दर किलोमीटरवर शाळेची सुविधा आणि माध्यमिक शाळांची उपलब्धता निर्माण करून देण्यात सरकारने उचलेलेली पावले महत्त्वाची ठरली आहेत. साठीच्या दशकात राज्यातील विद्यार्थ्यांची गळती, स्थगिती हे प्रश्न गंभीर होते. हे शैक्षणिक प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांनी देखील विद्यार्थी शाळेत टिकविण्यात यश मिळाले आहे. राज्यात सन १९५०-५१ मध्ये इयत्ता पहिलीत दाखल झालेल्या १०० विद्यार्थ्यांपैकी ५९.६ टक्के विद्यार्थी दुसरीत पोहोचत होते, तर चौथीपर्यंत हे प्रमाण अवघे ४२.५ इतकेच होते. सन १९६०-६१ मध्ये पहिलीत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची गळती कमी झालेली पहायला मिळते. त्यात झालेली सुधारणा लक्षात घेता ५७.९ इतकी वाढ झालेली दिसत होती. यावेळी गळतीच्या संख्येवर नजर टाकली तर गळतीत विद्यार्थिनींची संख्या अधिक होती. वर्तमानात साठ वर्षांच्या प्रवासात यावर मात करण्यात निश्चित यश मिळाले आहे. सध्या शिक्षण हक्क कायद्यानंतर राज्याने गळती, स्थगितीच्या प्रश्नांवर मात केली आहे. त्याचबरोबर पाल्यांना शाळेत दाखल करण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाल्याचे चित्र पहावयास मिळते आहे. सध्या ९९ टक्के विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात दाखल होत आहेत. राज्यात माध्यमिक स्तरावरील गळती आणि स्थगितीचे प्रमाण कमी करण्यात यश मिळाले असले तरी शंभर टक्के थांबविण्यापर्यंत अजून आपण पोहोचू शकलो नाही. त्यामुळे तेथे आपणाला निश्चित स्वरूपात अधिक काम करावे लागणार आहे.

राज्यात शिक्षणाचा विस्तार होत असताना आणि गुणवत्तेचा आलेख उंचावताना या राज्याने केलेल्या प्रयत्नांची दखल घ्यावीच लागेल. महाराष्ट्रातील शिक्षणातील प्रयोग आणि योजनांची दखल केंद्राने घेतली आहे. त्याचबरोबर इतर राज्यांनी

देखील येथील कार्यक्रमांची दखल घेत अंमलबजावणी केली आहे. ही बाब आपल्या सर्वांसाठीच अभिमानास्पद आहे. शिक्षण हक्क कायदा देशाने २०१० ला देशभर लागू केला असला तरी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा पहिला कायदा मुंबई इलाख्यात करण्यात आला होता तो १९१८ मध्येच. त्याच अर्थाने ५०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांनाही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागू करण्यात आला होता. त्याचबरोबर महाराष्ट्रातील शैक्षणिक परिवर्तनात महत्त्वाचे जे पाऊल ठरले ते म्हणजे शिक्षणावरील श्वेतपत्रिका. राज्याच्या श्वेतपत्रिकेच्या रूपाने कोठारी आयोगाची दखल घेण्यात आली आहे. तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरी यांचे विधिमंडळातील भाषण राज्याच्या शिक्षणाची दिशा स्पष्ट करते. अत्यंत उच्च धारणेचा विचार या श्वेतपत्रिकेत मांडण्यात आला आहे. शिक्षण ही विद्याविषयक उच्च साधना आहे. यातून मानवाला सत्याचा शोध व सर्वोच्च जीवन विकास यांसाठी सातत्याने प्रयत्न करण्याची स्फूर्ती लाभते. शिक्षण व्यक्तीच्या अंत:स्थ शक्तीचा अत्युत्तम आविष्कार करण्यास मदत करते. लोकांचे जीवन, गरजा, आकांक्षा यांच्याशी शैक्षणिक कार्यक्रमाचा समन्वय साधत राष्ट्राच्या आकांक्षाचा विकास घडतो. ही विधाने शिक्षणाची दिशा स्पष्ट करणारी होती. अशा स्वरूपाची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य. राज्याने शिक्षणाकडे किती गंभीरपणे पाहिले आहे हे यावरून लक्षात येते.

आज राज्यात प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध आहे. शिक्षकांची शैक्षणिक आणि व्यावसायिक पात्रता उंचावलेली आहे. राज्याच्या प्राथमिक शिक्षक पदासाठी केवळ शिक्षणशास्त्र पदविका अपेक्षित असताना पदवी, पदव्युत्तर शिक्षकांची उपलब्धता आहे. राज्याच्या प्राथमिक शिक्षणात पी.एचडी.पात्र शिक्षकांची संख्या देखील आहे हे विशेष. राज्यात १९५० मध्ये अवघे पन्नास टक्के शिक्षक प्रशिक्षित होते. साठच्या दशकात हे प्रमाण वाढत ७८ टक्क्यांवर पोहोचले. ७० च्या दशकात ८६ टक्क्यांच्या आसपास होते. आज जवळपास शंभर टक्के शिक्षक प्रशिक्षित आहेत.

**लाभाच्या योजनांचे लाभार्थी**

| | | |
|---|---|---|
| १. | उपस्थिती भत्ता योजना | १.८४ लाख विद्यार्थी |
| २. | अहिल्याबाई होळकर योजना | २०.५९ लाख विद्यार्थिनी |
| ३. | उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींना मोफत शिक्षण | ३.४९ लाख विद्यार्थिनी |
| ४. | पहिली ते चौथीच्या गरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेश | ४.२५ लाख विद्यार्थी |
| ५. | पहिली ते दहावीतील अनुदानित विनाअनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | ५२.६८ लाख लाभार्थी |
| ६. | उच्च माध्यमिक स्तरावरील आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण | १. ९५ लाख लाभार्थी |
| ७. | आदिवासी विद्यार्थ्यांना विद्या वेतनासाठी | ०.०२ लाख लाभार्थी |
| ८. | शालेय पोषण आहार योजना<br>इयत्ता पहिली ते पाचवी<br>इयत्ता सहावी ते आठवीसाठी | <br>६४.९९ लाख लाभार्थी<br>४२.८९ लाख लाभार्थी |
| ९. | दिव्यांग समावेशित कार्यक्रमांतर्गत | २.५२ लाख लाभार्थी |
| १०. | दिव्यांग कार्यक्रम माध्यमिक स्तरावर | ०.३८ लाख लाभार्थी |

शिक्षणाचा विस्तार करताना गुणवत्ता उंचावण्यासाठी वाड्या–वस्त्यांवर शाळा आणि शिक्षक देण्यात येत आहेत. राज्यात आज दहा पटाच्या आत संख्या असलेल्या शाळा सुमारे पाच हजारांपर्यंत आहेत. मात्र त्याचवेळी राज्यात पट कमी असूनही एकशिक्षकी शाळांची संख्या मात्र तितकीशी नाही.आज हे प्रमाण अत्यंत अल्प आहे. राज्यात १९६० च्या दशकात एकशिक्षकी शाळांची संख्या सुमारे ३४५९४ होती. सत्तरच्या दशकात ही संख्या ४५१४३ वर पोहोचली होती. त्या मानाने सध्या एकशिक्षकी शाळांची संख्या खूपच प्रमाणात कमी झालेली आहे.

शैक्षणिक गुणवत्ता विकासाकरिता राज्याने कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यात केंद्र सरकारने स्थापन केलेल्या राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या धर्तीवर १९८४ ला राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. ती स्थापन करताना ही संस्था म्हणजे विद्याविषयक विंग म्हणून उल्लेखित करण्यात आली आहे. राज्यात या संस्थेचे विशेष योगदान राहिले आहे. त्याचबरोबर विविध उद्देशाने राज्यात बालभारती (१९६७), महाराष्ट्र

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ (१९६६), शासकीय परीक्षा मंडळ (१९६८), राज्य विज्ञान शिक्षण संस्था (१९६५), राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ (१९६५) राज्य इंग्रजी अध्यापन संस्था (१९६५), व्यावसायिक मार्गदर्शन आणि निवड या संस्था स्थापन झाल्या आहेत. त्यात राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता विकासाबरोबरच शिक्षणाच्या सामाजिकीकरणाचा विचार करण्यात आला आहे.

शैक्षणिक गुणवत्ता विकास आणि सुधारणा करण्याच्या दृष्टीने शासनाने विविध प्रयत्न केले आहेत. त्यासाठी अभ्यास समिती आणि आयोग नेमले आहेत. त्यात १९६५ ला ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ चित्रा नाईक यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यातील शिक्षकांचे प्रशिक्षण, १९८४ ला तत्कालीन शिक्षण राज्यमंत्री मा. श्रीमती पार्वताबाई मलगोंडा यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण सुधार समिती, १९८६ ला मा. पी. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायतराज मूल्यमापन समिती आणि १९९२ ला शिक्षणमंत्री प्रा. मा. राम मेघे यांच्या अध्यक्षतेखाली प्राथमिक शिक्षण आयोगाची नियुक्ती करण्यात आली. माजी मुख्य सचिव मा. द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक शिक्षण व साक्षरता, धोरणात्मक प्रश्न व अनुदान यांविषयी अभ्यासासाठी अभ्यासगट नियुक्त करण्यात आला. १९९२ ला राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याकरिता कार्यबल गट स्थापन करण्यात आला होता. १९९५ ला प्रा. राम जोशी यांच्या अध्यक्षतेखाली राज्य बालशिक्षण समिती नियुक्त केली. यांसारख्या विविध समित्यांनी, आयोगांनी अभ्यास करून केलेल्या शिफारशीमुळे राज्याच्या शिक्षणात हे बदल पाहावयास मिळत आहेत.

राज्य सरकारने व केंद्र सरकारने शाळांच्या सुविधा व गुणवत्ता उंचावण्याकरिता केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. शाळांना सक्षम करण्याच्या दृष्टीने वेळोवेळी शासनाने निर्णय घेऊन मदतीचा हात दिला आहे. खडू–फळा योजनेपासून तर आता शाळा अनुदान, शिक्षक अनुदान, देखभाल दुरुस्ती अनुदान यांसारख्या विविध अनुदानांनी हातभार लावला जात आहे. शाळा स्तरावर शाळांच्या विकासात लोकसहभाग असायला हवा, यासाठी विविध लोकप्रतिनिधींचा समावेश असणाऱ्या समित्या शाळा स्तरावर तयार करण्यात आल्या होत्या. त्यात शिक्षण हक्क कायदा अस्तित्वात आल्यानंतर शाळा व्यवस्थापन समिती अस्तित्वात आली. पूर्वी ग्रामशिक्षण समिती होती. त्याचबरोबर पालक शिक्षक संघ, माता पालक संघ, बांधकाम समिती, शालेय पोषण आहार समिती यांसारख्या विविध समित्यांचे अस्तित्व म्हणजे शाळांना आधार देण्याचा प्रयत्न आहे.

**महाराष्ट्रातील शाळांमध्ये सुविधांची उपलब्धता (टक्केवारी)**

| प्राथमिक शाळा | | माध्यमिक शाळा | |
|---|---|---|---|
| पिण्याचे पाणी | ९८.८ | पिण्याचे पाणी | ९९.७ |
| संरक्षक भिंत | ८२.६ | संरक्षक भिंत | ९३.१ |
| मुलींकरता शौचालय | ९२.९ | मुलींकरता शौचालय | ९७.७ |
| संगणक | ५८.९ | दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | ८२.५ |
| दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | ८९.५ | खेळाचे मैदान | ९४.७ |
| खेळाचे मैदान | ८५.० | ग्रंथालय | ९०.२ |
| ग्रंथालय | ८१.२ | विद्युत जोडणी | ९८.४ |
| विद्युत जोडणी | ९४.३ | संगणक | ८०.० |
| | | संगणक व आंतरजाल | ७०.८ |

विद्यार्थ्यांची गळती होऊ नये, त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे याकरिता शासनाने सातत्याने विविध योजना सुरू ठेवल्या आहेत. वर्तमानात सुरू असलेल्या योजनांना इतिहास आहे. आज शालेय पोषण आहार योजना, मुलींसाठी उपस्थिती भत्ता, मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके, सायकल वितरण, विविध मागास संवर्गांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, त्याचबरोबर विविध प्रकारच्या गुणवत्तेकरिता असलेल्या शिष्यवृत्ती योजना सुरू आहेत. पाचवी व आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षांच्या माध्यमांतून प्रज्ञाशोध करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येत आहेत.

राज्यात असलेल्या विविध विभागांद्वारे शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यात आदिवासी कल्याण विभाग, समाज कल्याण विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश आहे. गेल्या साठ वर्षांत सुरू असणारा शिक्षणाचा प्रवास निश्चित राज्याच्या विकासाच्या प्रक्रियेला हातभार लावणारा आहे; पण तरी सुद्धा आपणाला गुणवत्तेचे शिवधनुष्य पेलण्यासाठी आणखी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे.

# वेध मुलींच्या शिक्षण प्रवासाचा...

**डॉ. कमलादेवी आवटे**
प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे. भ्रमणध्वनी : ९४२१३०४३७३

*मुलगा शिकला तर एक व्यक्ती शिकते परंतु मुलगी शिकली तर दोन घरे शिकतात, म्हणून अनेक समाज सुधारकांनी मुलींच्या शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. यामुळेच आजपर्यंत झालेला सावित्रीच्या लेकींचा शिक्षण प्रवास नेत्रदीपक असाच आहे. महाराष्ट्राच्या हीरक महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने स्त्री शिक्षणाचा घेतलेला हा आढावा....*

महाराष्ट्र हे एक पुरोगामी राज्य आहे. शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्राला एक समृद्ध परंपरा आहे. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाली, त्याला आज ६० वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्र निर्मितीचा हा हीरक महोत्सव साजरा करीत असताना महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीचा आलेख डोळ्यांपुढे आल्याशिवाय राहत नाही. या शैक्षणिक प्रगतीमध्ये मुलींच्या शिक्षणात लक्षणीय प्रगती झालेली आहे. हीरक महोत्सवानिमित्त महाराष्ट्राच्या शैक्षणिक प्रगतीचा विचार करताना मुलींच्या शिक्षणाची स्थिती अभ्यासणे महत्त्वपूर्ण ठरते.

शिक्षण हे सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार आहे असे सांगणाऱ्या महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी महाराष्ट्रात पुण्यामध्ये मुलींची पहिली शाळा सुरू केली. १ जानेवारी १९४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात अवघ्या ६ मुलींना घेऊन फुले दांपत्याने ही ऐतिहासिक क्रांती केली. त्यापूर्वी काही ख्रिश्चन मिशनऱ्यांनी स्थानिक पातळीवर शाळा सुरू केल्या होत्या. कोल्हापूरचे शाहू महाराज, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड, विठ्ठल रामजी शिंदे, गो. ग. आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे आणि इतर अनेक समाज सुधारकांनी स्त्री शिक्षणासाठी भरीव काम केले.

**उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण**

उच्च शिक्षणातील एकूण विद्यार्थी संख्या ४२.३० लाख असून त्यातील ४५.१ टक्के विद्यार्थिनी आहेत. तसेच विद्यापीठांमध्ये व इतर संस्थांमध्ये ९.४३ लाख विद्यार्थी शिकत असून त्यांपैकी ३९.४ टक्के विद्यार्थिनी आहेत.

मुलगा शिकला तर एक व्यक्ती शिकते परंतु मुलगी शिकली तर दोन घरे शिकतात, समृद्ध होतात, म्हणून या समाज सुधारकांनी मुलींच्या शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. १९०९ मध्ये रमाबाई रानडे यांनी सेवासदन या संस्थेची स्थापना केली. १९१६ मध्ये महर्षी कर्वे यांनी पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना करून मुलींसाठी उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले केले. १९२३ ने १९७३ या कालावधीत ताराबाई मोडक यांनी बालशिक्षणाचे बीज रोवले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील काही शैक्षणिक धोरणे आणि समित्यांमुळे मुलींच्या शिक्षणाला पोषक वातावरण मिळाले हे नाकारून चालणार नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीशांनी सुद्धा स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी विविध समित्यांची स्थापना केली परंतु सरकारी प्रयत्नांपेक्षाही महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे योगदान स्त्री शिक्षणाच्या वाटचालीस प्रेरक ठरले कारण स्वातंत्र्यपूर्व काळातील सामाजिक वातावरण मुलींच्या शिक्षणासाठी फारसे अनुकूल नव्हते. जुन्या रूढी परंपरांचा पगडा, पुरुष प्रधानता यामुळे मुलींच्या शिक्षणाला जनमानसातून विरोध होता. यामुळे सर्व स्तरांवरून प्रयत्न होऊनही स्वातंत्र्य प्राप्तीच्या वेळी भारतात ग्रामीण भागातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमी होते. दर १०० मुलांमागे केवळ ३१ मुली शिकत होत्या.

स्वातंत्र्योत्तर काळात मात्र हे चित्र बदलण्यासाठी बऱ्याच बाबी कारणीभूत ठरल्या. २६ जानेवारी १९५० रोजी भारताची राज्यघटना अमलात आली. राज्यघटनेने महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान दर्जा दिला. घटनेच्या कलम ४५ मध्ये ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींच्या प्राथमिक शिक्षणासंबंधीची महत्त्वपूर्ण तरतूद मार्गदर्शक तत्त्वांमध्ये समाविष्ट केली गेली. नंतर कलम २१ अ नुसार हा मूलभूत हक्क ठरला आणि RTE 2009 नुसार आता शिक्षणाच्या हक्काला कायद्याचे अधिष्ठान प्राप्त झाले हे आपण जाणतोच.

स्वातंत्र्योत्तर काळातील पुढील शैक्षणिक आयोग आणि समित्या अतिशय उपयुक्त ठरल्या.

| क्र. | आयोग/समिती | सन | महत्त्वपूर्ण शिफारशी |
|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ आयोग | १९४८-४९ | स्त्री शिक्षणासाठी विविध सुविधा, शिक्षणाच्या संधी, विशेष अभ्यासक्रम. |
| २. | माध्यमिक शिक्षण आयोग | १९५२ | समाज शिक्षण, गरजेप्रमाणे स्वतंत्र शाळा, स्त्री शिक्षिकांसाठी व्यवस्था. |
| ३. | स्त्री शिक्षणासाठी राष्ट्रीय समिती | १९५७ | मंत्रालयात स्वतंत्र स्त्री शिक्षण विभाग, पंचवार्षिक योजनेत स्त्री शिक्षणासाठी विशेष आर्थिक तरतुदी. |
| ४. | मुले-मुली यांच्या अभ्यासक्रमातील भेदासंबंधी समिती (हंसा मेहता समिती) | १९६७ | मुलामुलींच्या अभ्यास-क्रमात भेद असू नये, प्राथमिक व माध्यमिक स्तरावर सहशिक्षण असावे, उत्पादक कार्याचे शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण, लैंगिक शिक्षण यांविषयी शिफारशी. |
| ५. | कोठारी आयोग | १९६४-६८ | सर्व स्तरांवरील स्त्री शिक्षणाकडे लक्ष, नोकऱ्यांची संधी, समान अभ्यासक्रम |
| ६. | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण | १९८६ | स्त्री शिक्षणाचा पाया, व्यापक विचार करणारे पहिले धोरण, स्त्री सबलीकरणावर भर, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तक पुनर्रचना, निर्णय प्रक्रियेत व प्रशासनात स्त्रियांचा सहभाग वाढविण्यासाठी कृतिकार्यक्रम |
| ७. | राममूर्ती समिती | १९९० | शिक्षणातून स्त्री-पुरुष समानता, स्त्री अभ्यासकेंद्र स्त्री सबलीकरण यांवर शिफारशी,स्त्री शिक्षणातील जनसंपर्क साधनांचे महत्त्व स्पष्ट केले. |
| ८. | राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा | २००५ | मुला-मुलींना सामाजिक आणि भावनिक मार्गदर्शनाची गरज (किशोरवयीन मुले-मुली) शिक्षणाचा सामाजिक संदर्भ |

वरील सर्व शिफारशी मुलींच्या शिक्षणासाठी सर्वार्थाने उपयुक्त ठरल्या.

## महाराष्ट्रातील विशेष प्रयत्न :

महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणाला चालना मिळावी यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले. खास मुलींसाठी काही योजना सुरू करण्यात आल्या :

- मुलींसाठी उपस्थिती भत्ता
- सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना
- अहिल्याबाई होळकर मोफत बस पास
- मुलींसाठी सायकल वाटप
- मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश
- शिष्यवृत्ती
- अतिदुर्गम भागात निवासी शाळा, आश्रमशाळा
- राज्यस्तरावर स्त्री शिक्षण कक्षाची निर्मिती
- बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण

या प्रयत्नांमुळे मुलींच्या शिक्षणामध्ये नक्कीच प्रगती झाली. बारावीपर्यंत मुलींना मोफत शिक्षण देण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय महाराष्ट्रात सर्वप्रथम घेण्यात आला. याचा सकारात्मक परिणाम झाला कारण प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या मुली उच्च माध्यमिक स्तर आणि उच्च शिक्षणापर्यंत पोहोचत नव्हत्या. २०१०-११ साली करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, शाळेत प्रवेश घेणाऱ्या १०० मुलांपैकी २० टक्के मुले उच्च शिक्षणापर्यंत पोहोचतात, पण मुलींमध्ये हे प्रमाण १७ टक्के आहे. दहावी ते बारावी या पातळीवर ५५ टक्के मुले पोहोचतात पण तिथपर्यंत पोहोचणाऱ्या मुलींचे प्रमाण ४५ टक्के असते. यामुळे अजूनही मुलींना मुलांच्या बरोबरीने शिक्षण दिले जात नाही असे आढळून आले, म्हणूनच बारावीपर्यंत मोफत शिक्षणाची संधी ही मुलींसाठी महत्त्वाची ठरते आहे.

स्वतंत्रपणे महिला धोरण जाहीर करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. १९९४ साली जाहीर झालेल्या या महिला धोरणामुळे स्त्रियांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक जीवनाची

गुणवत्ता सुधारण्याचे उद्दिष्ट साध्य व्हायला मदत झाली; कारण केवळ पुस्तकी शिक्षण मुलींना सक्षम करणार नाही, तर त्यांना स्वत:तल्या सामर्थ्याची, हक्कांची जाणीव त्यांना करून देण्यासाठी सामाजिक स्तरावरूनही प्रयत्न करणे गरजेचे होते. महाराष्ट्रातल्या स्त्री मुक्ती चळवळीने हे आत्मभान येण्यासाठी सर्वंकष मदत केली.

या सर्व प्रयत्नांमुळे आपल्याला स्त्री साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

| जनगणना वर्ष | पुरुष | स्त्रिया | साक्षरतेतील तफावत |
|---|---|---|---|
| १९७१ | ५९.४० | ३०.०० | २९.४० |
| १९८१ | ७०.०६ | ४३.५० | २६.५६ |
| १९९१ | ७६.५६ | ५२.३२ | २४.२४ |
| २००१ | ८५.९७ | ६७.०३ | १८.९४ |
| २०११ | ८९.८२ | ७५.४८ | १४.३४ |

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी २००१ पासून सुरू असलेल्या सर्व शिक्षा अभियानामुळेही हे चित्र बदललेले आपल्याला दिसत आहे. त्यामुळे ७ ते १४ वर्षे वयोगटातील महिला साक्षरतेचे प्रमाण ९१.८९ टक्के आहे. (२०११ जनगणना)

मुलींचे शिक्षण हा सर्व शिक्षा अभियानाचा गाभा आहे. सर्व मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी 'सर्व शिक्षा अभियान' मधून अनेक नवोपक्रमांना विशेष अनुदान दिले गेले आहे. याशिवाय NPEGEL व KGBV (कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय) या दोन स्वतंत्र योजनांची अंमलबजावणी केली आहे. राष्ट्रीय स्त्री साक्षरता दरापेक्षा कमी स्त्री साक्षरता दर असणाऱ्या जिल्ह्यांत हे उपक्रम राबविले गेले, ज्यामुळे आदिवासी, डोंगराळ दुर्गम भागातील मुलींचे शिकणे सोपे झाले. महाराष्ट्रात आज ४३ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये आहेत, जिथे मुली आपले भविष्य घडवीत आहेत.

मीना राजू मंच, किशोरी उत्कर्ष मंच, बेटी बचाओ, बेटी पढाओ यांसारख्या उपक्रमांतून मुलींच्या सबलीकरणाची दिशा मिळाली आहे. सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान आणि सध्याचे समग्र शिक्षा अभियान यांमधून मुलींचे शिक्षण नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे, म्हणूनच आपल्याला मुला-मुलींच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षणातील असमतोल कमी झालेला दिसून येत आहे. पुढील स्तरावर मात्र अजूनही काम करण्याची गरज आहे.

**प्रवेश दर (GER) (२०११ ची जनगणना)**

| वयोगट | वर्ष | प्रवेश (%) मुले | प्रवेश (%) मुली |
|---|---|---|---|
| ६ ते १० वर्षे | पहिली ते पाचवी | १०१.९८ | १०१.६ |
| ११ ते १३ वर्षे | सहावी ते आठवी | ९५.२७ | ९२.०८ |
| १४ ते १५ वर्षे | नववी व दहावी | ८३.४४ | ७९.२७ |
| १६ ते १७ वर्षे | अकरावी व बारावी | ५३.६९ | ५४.५६ |

(स्रोत : २०११ ची जनगणना आणि डिसेंबर २०१२-१३ ची सांख्यिकी)

इयत्ता पहिली ते आठवी चा मुला-मुलींचा प्रवेश दर पुढीलप्रमाणे दिसून येत आहे :

| वर्ष | मुले | मुली |
|---|---|---|
| २०१३-१४ | ९८.६८ | ९८.५९ |
| २०१४-१५ | ९८.६० | ९९.२४ |
| २०१५-१६ | ९७.७० | ९८.९८ |

(Source : MHRD/NIEPA)

यावरून मुलींचे शाळेत प्रवेश घेण्याचे प्रमाण चांगले असल्याचे आपल्याला दिसून येत आहे. RTE नुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाचा तो अधिकार आहे परंतु अजूनही गरिबी, अज्ञान, शाळेची नावड, स्थलांतर अशा अनेक कारणांमुळे मुले शाळाबाह्य होताना दिसत आहेत. यातही मुलींचे प्रमाण अधिक आहे. मुलींच्या बाबतीत तर घरकाम, बालविवाह, मासिक पाळीतील प्रश्न ही कारणे मुलींना शाळेपासून दूर ठेवतात. सध्या राज्यस्तरावरून समता विभागामार्फत या शाळाबाह्य मुलांसाठी बालरक्षक चळवळ उल्लेखनीय काम करीत आहे. तसेच किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी व्यवस्थापन, स्वसंरक्षण यांचे प्रशिक्षण दिले जात आहे.

मुलींच्या शिक्षणाचा हा संख्यात्मक आणि गुणात्मक विस्तार पाहताना 'थोडी खुशी, थोडा गम' अशी स्थिती होते. फुले दांपत्याने पुण्यातल्या भिडे वाड्यातून ६ मुलींना घेऊन मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. त्या साऊच्या लेकींचा आज किती मोठा विस्तार झाला आहे! हे इथल्या मातीत समाजसुधारकांनी पेरलेल्या सुधारणांचे यश आहे, पण इथेच थांबून चालणार नाही. एकविसाव्या शतकातील सक्षम नागरिक होण्यासाठी या महाराष्ट्र कन्यांचा प्रवास अजून सुरू आहे. आपण सर्वांनी त्यांच्या सोबत रहायला हवं. समतेच्या दिशेने सुरू असलेली ही वाटचाल आपणा सर्वांच्या आश्वासक आधारानेच पुढे जाणार आहे. स्वत:च्या कर्तृत्वाने प्रत्येक क्षेत्र गाजविणारी ही साऊची लेक सर्वार्थाने सक्षम व्हावी आणि महाराष्ट्रासारखीच कणखर व्हावी याच निर्धाराने पुढची पावले टाकू या.

❖❖❖



महाराष्ट्रातील पहिली सहकारी सूत गिरणी - कोल्हापूर जिल्हा विणकर सहकारी संस्था इचलकरंजी

# अध्ययन निष्पत्ती आणि सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन

**डॉ. राजेश बनकर**
जिल्हा शैक्षणिक व प्रशिक्षण संस्था, पुणे. भ्रमणध्वनी : ९८५०२५२३८०

*आपण ध्येयसिद्धीसाठी जे काम करतो, त्याचे फलित, प्रगती, त्याची यशस्विता पाहण्यासाठी मूल्यमापन आवश्यक असते. मूल्यमापन हे शिक्षण प्रक्रियेचे अविभाज्य अंग आहे. शिक्षणाचे हेतू साध्य होत आहेत ना हे त्यातूनच कळणार असते. शैक्षणिक धोरणाप्रमाणे मूल्यमापन पद्धतीत बदल होत जाऊन सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धती अंगीकारताना आकारिक मूल्यमापन, संकलित मूल्यमापन आणि अध्ययन निष्पत्ती यांचा साकल्याने कसा विचार करण्यात येत आहे त्याविषयी....*

मूल्यमापन हे शिक्षण प्रक्रियेचे एक अविभाज्य अंग आहे. शालेय अभ्यासक्रमाची उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली? शिक्षकांनी वर्गात दिलेल्या अध्ययन अनुभवांमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनात प्रगती होत आहे ना? एकंदरीत शिक्षणाचे हेतू साध्य होत आहेत ना? हे सर्व पाहण्यासाठी शैक्षणिक मूल्यमापन केले जाते. मूल्यमापनचा थेट संबंध शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेशी असतो. शाळेमध्ये दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेद्वारे बालकांच्या बौद्धिक विकासाबरोबरच त्यांच्या विविध क्षमतांचा, गुणांचा विकास व्हावा अशी अपेक्षा असते. त्यामुळे शाळेमधील औपचारिक शिक्षणात विद्यार्थ्यांच्या संपादणुकीचे मूल्यमापन करणे खूप महत्त्वाचे असते. शैक्षणिक मूल्यमापनामुळे शालेय अभ्यासक्रम, पाठपुस्तके, शिक्षकांचे अध्यापन इत्यादी शिक्षण प्रक्रियेशी संबंधित बाबींचा दर्जा स्पष्ट होण्यास मदत होत असते. एकंदरीत शैक्षणिक मूल्यमापन हे शिक्षण प्रक्रियेला योग्य दिशा, गती आणि प्रेरणा देत असते.

शाळेतील अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचे फलित पाहण्यासाठी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करणे म्हणजे त्यांची परीक्षा घेणे. सदर परीक्षांद्वारे विद्यार्थ्यांची गुणवत्ता व पर्यायाने शैक्षणिक गुणवत्ता ठरविली जाते, त्यामुळे शाळांमधील वार्षिक परीक्षांना खूप महत्त्व प्राप्त झाले. शिवाय या परीक्षांमध्ये लेखी परीक्षेवरच जास्त प्रमाणात भर दिला जात असे. संपूर्ण शिक्षण प्रक्रिया परीक्षाकेंद्रित झाली. या परीक्षाकेंद्रित शिक्षण प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्यावर व पर्यायाने संपूर्ण शिक्षण प्रक्रियेवर अनेक दुष्परिणाम होत असल्याचे दिसून आल्याने विद्यार्थ्यांचे सर्वांगीण मूल्यमापन होण्यासाठी शाळांमधील प्रचलित मूल्यमापन पद्धतीमध्ये अनेक वेळा बदल करण्यात आले. परंतु या सर्व मूल्यमापन पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाचे मूल्यमापन करण्यामध्ये अनेक प्रकारच्या मर्यादा जाणवत होत्या. या मर्यादा दूर करण्यासाठी वेळोवेळी अनेक प्रयत्न केले गेले आहेत.

'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५' मध्येही शाळांमधील मूल्यमापन पद्धती या विद्यार्थ्यांच्या अतिशय मर्यादित कौशल्यांची तपासणी करतात. त्यांनी प्राप्त केलेल्या क्षमतांचे व शिक्षणाच्या उद्दिष्टांकडे होणाऱ्या त्यांच्या प्रगतीचे समग्र चित्र त्यातून स्पष्ट होत नाही म्हणून आपणांस मूल्यांकन करण्याचे आणि आढावा घेण्याचे नवे निकष आणि नवीन पद्धती विकसित कराव्या लागतील असे नमूद केलेले आहे. शिक्षण हक्क कायद्यातील कलम २९ (२) मध्ये प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम व मूल्यमापन प्रक्रिया निर्धारित करताना, बालकाच्या ज्ञान व आकलनाचे व्यापक व अखंडपणे मूल्यमापन होईल याकडे लक्ष देण्यास सांगितलेले आहे.

इयत्ता पहिली ते आठवीसाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र राज्यामध्ये सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेचे सातत्याने मूल्यमापन करणे तसेच त्याच्या वर्तनातील अपेक्षित निष्पत्तींचे वेळोवेळी अनुधावन करणे हा या मूल्यमापन पद्धतीचा मुख्य हेतू आहे. या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचे नियमितपणे करावयाचे आकारिक मूल्यमापन' (Formative Evaluation) व ठरावीक काळानंतर एकत्रित स्वरूपात करावयाचे 'संकलित मूल्यमापन' (Summative Evaluation) अशा दोन पद्धतींचा समावेश केलेला आहे.

आकारिक मूल्यमापनात : १) दैनंदिन निरीक्षण, २) तोंडी काम, ३) प्रात्यक्षिक/प्रयोग, ४) कृती/उपक्रम, ५) प्रकल्प, ६) चाचणी (लेखी व पुस्तकासह), ७) स्वाध्याय/वर्गकार्य, ८) अन्य साधने या साधन–तंत्रांचा समावेश केलेला आहे.

शिक्षकांनी अभ्यासक्रमात निश्चित केलेली त्या विषयाची शैक्षणिक उद्दिष्टे विचारात घेऊन यांपैकी किमान पाच साधनतंत्रांचा वापर आकारिक मूल्यमापनासाठी करणे अपेक्षित आहे. प्रथम व द्वितीय सत्राच्या अखेरीस शैक्षणिक उद्दिष्टांनुसार लेखी, तोंडी व प्रात्यक्षिक प्रश्नांचा समावेश असलेले संकलित मूल्यमापन करणे निर्देशित केलेले आहे.

सन २०१६ मध्ये भारत सरकारच्या मानव संसाधन व विकास मंत्रालयाने केलेल्या सूचनांनुसार राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी प्राथमिक इयत्ता १ ली ते ५ वी व उच्च प्राथमिक इयत्ता ६ वी ते ८ वी च्या भाषा, गणित, परिसर अभ्यास, सामाजिक शास्त्र, सामान्य विज्ञान इत्यादी विषयांच्या अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes) आणि त्या प्राप्त होण्यासाठी शाळेत करावयाची शैक्षणिक प्रक्रिया या बाबी निश्चित केल्या आहेत. सन २०१७–१८ पासून या अध्ययन निष्पत्तींचा समावेश शालेय शिक्षण प्रक्रियेत केला गेला आहे. याच निष्पत्तींवर आधारित राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण (NAS) सुद्धा ठरावीक कालावधीनंतर यादृच्छिक पद्धतीने संपूर्ण देशभर केले जात आहे. शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी देशभरात एक समान प्रक्रिया त्यामुळे होऊ लागली आहे. महाराष्ट्रामध्येही राज्य शासनाने आपल्या राज्याच्या गरजा विचारात घेऊन या अध्ययन निष्पत्तींमध्ये आवश्यक तेथे सुधारणा केलेल्या आहेत आणि सर्व शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यापर्यंत मार्गदर्शक पुस्तिका, पाठ्यपुस्तके, घडीपत्रिका व भित्तिपत्रके या माध्यमांतून त्या पोहोचविण्यात आलेल्या आहेत.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे या संस्थेने प्रत्येक जिल्ह्यात कार्यरत असलेल्या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत व सर्व जिल्हा परिषदांच्या शिक्षण विभागामार्फत या अध्ययन निष्पत्तींची सुस्पष्टता व त्या प्राप्त करण्यासाठी शाळास्तरावर करायची कार्यवाही याविषयी विविध स्तरांवरील शिक्षक प्रशिक्षणे, बैठका, व्हिडिओ कॉन्फरन्स या माध्यमांतून शिक्षकांना मार्गदर्शन केलेले आहे, त्यामुळे अध्ययन निष्पत्तींबाबत शिक्षकांमध्ये सुस्पष्टता येण्यास मदत झालेली आहे.

अध्ययन निष्पत्ती ही काही नवीन बाब शिक्षण प्रक्रियेत आलेली नाही. अध्ययन निष्पत्ती म्हणजे वर्गातील अध्ययन–अध्यापन प्रक्रियेनंतर विद्यार्थ्याला कशाचे ज्ञान, आकलन व कौशल्य प्राप्त होणे अपेक्षित आहे; या सर्वांच्या उपयोजनांचे स्वरूप काय असावे; प्रत्येक इयत्तेच्या अखेर विद्यार्थ्यांमध्ये कोणते बदल अपेक्षित आहेत; हे सांगणारी, स्पष्ट करणारी विधाने होय. या अध्ययन निष्पत्ती विद्यार्थ्यांना किती प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत याचे वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणानुसार शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा निश्चित केला जात असल्यामुळे शाळेतील अध्ययन–अध्यापन व मूल्यमापन प्रक्रियेत अध्ययन निष्पत्ती यांचा समावेश करणे अनिवार्य झालेले आहे.

वर्गातील दैनंदिन अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत अध्ययन निष्पत्तींचा विचार शिक्षकांनी सतत करणे आवश्यक आहे. त्यानुसार अध्ययन प्रसंगांची निर्मिती करून विद्यार्थ्यांना वैविध्यपूर्ण अध्ययन–अनुभव देणे गरजेचे आहे. शिक्षकांनी अध्ययन–अध्यापन प्रक्रियेमध्ये अध्ययन निष्पत्तींचा विचार करून या साधन–तंत्राची निवड व वापर नियमितपणे करणे गरजेचे आहे. या साधन–तंत्राच्या आधारे विविध कृतींचे नियोजन करून शिक्षकांनी या कृती करण्याची संधी वर्गातील विद्यार्थ्यांना सतत दिल्यास विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ होईल. या साधनतंत्रांचा अध्ययन–अध्यापनासाठी व गरजेनुसार मूल्यमापनासाठी समवाय पद्धतीने उपयोग केल्यास विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील व पर्यायाने स्वतःच्या अध्यापनातील उणिवा शिक्षकांना समजतील व त्यानुसार त्या उणिवा वेळोवेळी दूर करणे शिक्षकांना शक्य होईल आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययनास गती मिळेल.

विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करतानाही मूल्यमापनाचे साधन–तंत्र निवडताना विषयांच्या अध्ययन निष्पत्तींना अनुसरून त्यांची निवड करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन निरीक्षणाद्वारे करावयाच्या वर्णनात्मक नोंदीही अपेक्षित अध्ययन निष्पत्ती डोळ्यांसमोर ठेवूनच अध्ययन दर्शकांच्या (Learning Indicators) साहाय्याने कराव्या लागतील. या ठिकाणी हेही लक्षात घेणे गरजेचे आहे की, एकाच साधन–तंत्रातून किंवा अध्ययन प्रसंगांमधून वेगवेगळ्या अध्ययन निष्पत्ती प्राप्त होण्यासाठी मदत होऊ शकते, म्हणजेच अमुक एका अध्ययन निष्पत्ती साठी अमुक एक साधन–तंत्र किंवा अध्ययन प्रसंग अशी वर्गवारी करणे प्रत्येक वेळी शक्य नसते. या सर्व बाबी एकमेकांत एकजिनसी स्वरूपात एकत्र झालेल्या असतात. त्यामुळे अध्ययन निष्पत्तीच्या प्राधान्यानुसार संबंधित साधन–तंत्र व अध्ययन प्रसंग यांचा वापर दैनंदिन अध्ययन–अध्यापनात करणे गरजेचे असते.

दैनंदिन अध्ययन-अध्यापनामध्ये तसेच मूल्यमापनामध्ये साधन-तंत्रे, अध्ययन प्रसंग निवडताना अध्ययन निष्पत्तींचा विचार कसा करावा हे आपण एक उदाहरण घेऊन समजून घेऊ या. इयत्ता चौथी मराठी विषयाची पुढील अध्ययन निष्पत्ती पहा.

'विद्यार्थी पाठ्यपुस्तकाव्यतिरिक्त इतर मजकुराचे (बालसाहित्य, वर्तमानपत्रांतील ठळक शीर्षक, प्रसिद्धी फलक इत्यादी) समजपूर्वक वाचन करतात .'

या अध्ययन निष्पत्तीच्या प्राप्तीसाठी सर्वप्रथम शाळेमध्ये तसेच शाळेबाहेरही विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त इतर वाचन साहित्य, अपेक्षित वाचन संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यासाठी वर्ग वाचनालय, ग्रंथालय यांमध्ये असणारी पुस्तके, वर्तमानपत्रे ही विद्यार्थ्यांचा वयोगट विचारात घेऊन त्यांना वाचनासाठी उपलब्ध करून द्यावी लागतील. तसेच औपचारिक वेळ देऊन त्यांचे वाचनही करून घ्यावे लागेल. तसेच शालेय परिपाठामध्ये शालेय फलकावर लिहिलेल्या बातम्या, वर्तमानपत्रातील बातम्यांची शीर्षके, दिनविशेष, सुविचार तसेच गावात किंवा परिसरात नागरिकांसाठी असलेल्या सूचना फलकावर लिहिलेल्या सूचना, या सर्व बाबींचे प्रकटवाचन आणि अर्थ स्पष्ट करणाऱ्या कृती, त्यांवर आधारित चर्चा विद्यार्थ्यांकडून नियोजनपूर्वक वारंवार करून घ्याव्या लागतील. याबरोबरच पूरक म्हणून तोंडी काम, कृती/उपक्रम, वर्गकार्य इत्यादी साधन-तंत्रांचा समावेश दैनंदिन अध्ययन-अध्यापनात करावा लागेल. हे सर्व करीत असताना विद्यार्थ्यांना अध्ययनात काही अडचणी आल्यास, त्या कोणत्या? हे समजावून घेऊन त्यानुसार शिक्षकांना अशा विद्यार्थ्यांना साहाय्य करावे लागेल. यानंतर मग ही अध्ययन निष्पत्ती प्राप्त झाली की नाही याचे मूल्यमापन करणे सयुक्तिक राहील. या अध्ययन निष्पत्तीमध्ये विद्यार्थ्यांचे समजपूर्वक वाचन अपेक्षित आहे, त्यामुळे त्याला अनुसरून फक्त तोंडी अभिव्यक्ती शक्य असणाऱ्या साधन-तंत्राची निवड येथे करावी लागेल. म्हणजेच तोंडी काम, उपक्रम/कृती यांसारखी साधन-तंत्रे वापरून मूल्यमापन करता येईल.

'तोंडी काम ' हे साधन-तंत्र निवडल्यास एखादी छापील जाहिरात निवडून त्यावर आधारित तोंडी प्रश्न मुलांना विचारता येतील. वर्तमानपत्राचा वापर करून त्यातील ठळक बातम्या विद्यार्थ्यांना वाचण्यास सांगता येईल आणि हे वाचन त्याने समजपूर्वक केले आहे का? हे पडताळण्यासाठी वाचलेल्या बातमीवर आधारित तोंडी प्रश्न विचारून गुणदान करता येईल.

उपक्रम/कृती' हे साधन-तंत्र निवडल्यास विद्यार्थ्यांना आवडलेल्या वर्तमानपत्रातील माहितीचे कात्रण काढून चिकटवही तयार करण्याचा उपक्रम घेता येईल व त्यांच्या वैयक्तिक चिकटवहीच्या आधारे त्यांच्यासोबत वैयक्तिक चर्चा करून त्यांची समज पडताळणी करून गुणदान करता येईल.

अशाप्रकारे दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये अध्ययन निष्पत्ती, अध्ययन प्रसंग व मूल्यमापनाची साधने यांचा एकत्रित समन्वय साधून विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक वाढविणे व त्यांचा सर्वांगीण विकास करणे शक्य आहे.

❖❖❖

## जागतिक परिचारिका दिन

१२ मे हा जागतिक परिचारिका दिन. १८५४ साली झालेल्या क्रिमियन युद्धातील जखमी सैनिकांना अहोरात्र मलमपट्टी करीत आपले कर्तव्य बजावणाऱ्या आद्य परिचारिका (नर्स) फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा हा जन्मदिवस (१२ मे १८२०) आहे. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना आधुनिक शुश्रूषा शास्त्राची संस्थापिका समजले जाते.

फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांनी जखमी सैनिकांची शुश्रूषा केली आणि संपूर्ण जगाला रुग्णसेवेचा पायंडा घालून दिला. रुग्णांवर मायेची फुंकर घालून त्यांची अहोरात्र सेवा करणाऱ्या परिचारिकांचे जीवन कष्टमय, दुःखप्रद आहे. स्वतःच्या आयुष्यातला काळोख विसरून रुग्णाच्या जीवनात आनंदाचा दिवा प्रज्वलित करण्यासाठी त्यांची धडपड सुरू असते.

या रुग्णसेवेला खऱ्या अर्थाने सुरुवात केली ती फ्लॉरेन्स नाईटिंगेल या परिचारिकेने. दरवर्षी ६ मे ते १२ मे हा आठवडा संपूर्ण जगभरात आतंरराष्ट्रीय नर्सेस आठवडा म्हणून साजरा केला जातो.

नर्सिंगचे पद्धतशीर शिक्षण घेऊन प्रशिक्षित होणाऱ्या भगिनींना रोजगाराची संधी मिळावी या उद्देशाने १८६० साली लंडनमध्ये त्यांनी पहिल्या नर्सिंग स्कूलची स्थापना केली. भारत सरकारच्या कुटुंब कल्याण मंत्रालयाने फ्लॉरेन्स नाईटिंगेल यांच्या नावे उत्कृष्ट काम करणाऱ्या भारतीय परिचारिकांना पुरस्कार देण्यास सुरुवात केली आहे.

# मूल्यवर्धन कार्यक्रम : पुढचे क्षितिज

**विद्याधर शुक्ल,** सल्लागार, एसएमएफ तथा माजी उपसंचालक
**मीनल दशपुत्रे,** संचालक (कार्यक्रम) शांतीलाल मुथ्था फाऊंडेशन, पुणे

*मूल्यशिक्षणासाठी शासनाच्या अनेक वर्षे सुरू असलेल्या प्रयत्नांना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न मूल्यवर्धन कार्यक्रमाने केला. या कार्यक्रमाची क्षमता शिक्षक, पालक व अधिकारी वर्गाच्या लक्षात आली. मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या विविध पैलूंविषयी आणि शिक्षकांनी पाठविलेल्या निवडक अभिप्रायांविषयी....*

संविधानातील मूल्यांवर आधारित, जबाबदार आणि इतरांची काळजी घेणारा नागरिक घडविण्याच्या दृष्टीने शासनाने सुरू केलेला मूल्यवर्धन कार्यक्रम गेल्या चार वर्षांत राज्यातील सर्व जिल्हा परिषद आणि मनपा/न.प. शाळांपर्यंत पोहोचला आहे. शाळांबाहेरही तो अनेक पालकांना, माहीत झाला आहे. शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांखेरीज इतर खात्यांतील अधिकारी, इतर राज्यांतील आणि केंद्रातील शिक्षण विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे लक्ष मूल्यवर्धन कार्यक्रमाने वेधून घेतले आहे.

मूल्यशिक्षणासाठी शासनाच्या अनेक वर्षे सुरू असणाऱ्या प्रयत्नांना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाने केला. वयोगटाप्रमाणे मुले कशी शिकतात, त्यांना काय आवडते, याचा विचार करून मुक्त वातावरणात खेळासारख्या वाटतील अशा, योग्य काय अयोग्य काय याविषयी सहयोगी, ज्ञानरचनावादी पद्धतीने निर्णय घ्यायला प्रवृत्त करणाऱ्या श्रेणीबद्ध उपक्रमांतून मूल्ये रुजविण्याची मध्यवर्ती कल्पना यामध्ये वापरण्यात आली आहे.

हा कार्यक्रम सर्वत्र शिक्षक आणि अधिकारी यांच्याकडून सहजपणे स्वीकारला गेला. कार्यक्रमामुळे मुले आणि शाळा यांमध्ये काही चैतन्यमय बदल घडून आले. तसा हा कार्यक्रम करिअरसाठी थेट उपयुक्त नसला तरी त्यातून विद्यार्थी, शिक्षक, पालक यांच्या मानसिकतेमध्ये अनुकूल बदलाचे अंकुर दिसल्याने या कार्यक्रमाची क्षमता लक्षात आली. मार्क, श्रेणी आणि स्पर्धा या पलीकडची, एक प्रकारे सहयोगी समाज घडवू शकणाऱ्या मूक क्रांतीची ही प्रक्रिया पुढे सुरू राहिली पाहिजे अशी भावना निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम आणखी पुढच्या पातळीवर घेऊन जाण्यासाठी शिक्षक बंधू-भगिनी यांना या कार्यक्रमाबद्दल काय वाटते? त्यांनी याची अंमलबजावणी कशी केली? कोणते आश्वासक बदल दिसले? याचा मागोवा या लेखात घेतला आहे. यासाठी 'मी आणि मूल्यवर्धन' या विषयावरील शिक्षकांनी सादर केलेल्या अनुभव लेखांचा आधार घेतला आहे. ही अनुभवांची देवाणघेवाण वर्षाच्या सुरुवातीलाच झाली तर पुढील नियोजन करताना त्यांचा उपयोग होईल अशी आशा आहे.

### मी आणि मूल्यवर्धन :

मूल्यवर्धन कार्यक्रमाच्या विविध पैलूंविषयी २५० शब्दमर्यादेत शिक्षकांनी ऐच्छिकपणे अभिप्राय पाठवावा व त्यासाठी डायट व इतर अधिकारी वर्गाने प्रोत्साहन द्यावे असे आवाहन परिषदेने पत्राद्वारे केले. त्याला निरनिराळ्या जिल्ह्यातून १३८० जणांचा प्रतिसाद मिळाला. शिक्षकांनी मनापासून दिलेली मते आणि अनुभव यात वेगवेगळे मुद्दे होते. त्यांचा क्रमही वेगळा होता. त्यामुळे या सर्व लेखांतील सामाईक मुद्द्यांची यादी करून त्याआधारे सर्व लेखांचे विश्लेषण करण्यात आले आणि अभिप्रायातील मुद्द्यांनुसार आशयाचे संकलन केले. या अभ्यासाचा अहवाल पुस्तक रूपाने मूल्यवर्धन जिल्हा मेळाव्यामध्ये काही प्रमाणात पोहोचला आहे.

या संकलनातील काही विशेष आणि अनुकरणीय अनुभव निवडून शाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन अधिक माहिती गोळा करण्यात आली. त्या आधारे 'मूल्यवर्धन यशोगाथा' हे पुस्तकही

**(पृष्ठ क्र. २४ वर)**

BRITISH COUNCIL

LearnEnglish Kids

1 ..............................

2 ..............................

3 ..............................


4 ..............................

5 ..............................

6 ..............................

7 ..............................

8 ..............................




## LABEL THE PICTURE

What's your bedroom like?
Try to label everything in this bedroom.

**poster lamp bookshelf CD player**
**bookcase blanket alarm clock pillow**

You can play this game and more online at:
**www.britishcouncil.org/learnenglishkids**

**Answers** 1. blanket 2. poster 3. bookcase 4. alarm clock 5. pillow 6. CD player 7. lamp 8. bookshelf

BRITISH COUNCIL

LearnEnglish Kids

# WORDSEARCH

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| R | S | C | O | O | T | E | R | W | S |
| G | P | B | F | J | U | M | E | B | M |
| S | I | L | O | B | E | T | F | C | R |
| I | H | C | O | O | D | E | Q | T | G |
| C | S | R | T | O | P | D | C | L | Y |
| A | E | A | B | K | B | D | T | A | Q |
| M | C | Y | A | S | O | Y | O | G | R |
| E | A | O | L | L | P | W | B | J | N |
| R | P | N | L | B | T | R | O | B | O |
| A | S | S | N | N | I | E | R | U | N |

**Answers** 1. scooter 2. crayons 3. teddy
4. football 5. car 6. spaceship 7. dolly
8. robot 9. books 10. camera

1. This toy is like a bicycle, but you stand up to use it.
2. You can use these to colour in your drawings.
3. A toy bear.
4. This is round and you can kick it.
5. You can drive to the toyshop in one of these.
6. Imagine travelling to other planets in one of these.
7. You can dress them up and do their hair.
8. A mechanical figure, some of them can move and talk.
9. You can read all kinds of stories in one of these.
10. You can take pictures of your family with one of these.

You can play this game and more online at:
**www.britishcouncil.org/learnenglishkids**

(पृष्ठ क्र. २१ वरून)

लवकरच उपलब्ध होत आहे. या दोन्ही संकलनातील एकेक अनुभव नमुन्यादाखल पुढे दिला आहे.

**वेळेत शाळेला चाललो आम्ही :**

कोल्हापूर शहरात कर्मवीर भाऊराव पाटील विद्यामंदिर या शाळेत एका वस्तीमधील मुले नेहमीच उशिरा शाळेत येत. घरगुती समस्यांमुळे उशिरा येणाऱ्या कामगार वस्तीमधील या विद्यार्थ्यांनी मूल्यवर्धन उपक्रमांपासून प्रेरणा घेऊन स्वतःसाठी एक नियम बनविला. हा नियम होता वेळेत शाळेत पोहोचण्याचा. यासाठी विद्यार्थ्यांनी एक नारा देखील बनविला. 'वेळेत शाळेला चाललो आम्ही!' हे विद्यार्थी आपल्या नियम आणि नाऱ्याचे चांगल्याप्रकारे पालन करून शाळेची एक नवीन ओळख निर्माण करीत आहेत.

**अनोखा मार्ग :**

मूल्यवर्धनचा प्रत्येक तास रंजक करण्यासाठी प्रत्येक घटकाशी संबंधित गाणी गोष्टी, खेळ यांचा संग्रह करण्याची सवयच लागली. आम्हां शिक्षकांकडे प्रत्येकाच्या उपक्रमांचा एक व्यक्तिगत अनमोल संग्रहच तयार झाला. गटचर्चा, प्रश्नकौशल्य यांतून मुलांमध्ये स्वयंशिस्त तर निर्माण करता आलीच, शिवाय अशा सहभागातून वर्गनियंत्रणाचा एक अनोखा मार्गही सापडला. स्वतःच वर्गाचे नियम बनविल्यामुळे त्याचे पालन स्वतः करणे आणि इतरांना त्यासाठी प्रवृत्त करणे या बाबी विद्यार्थ्यांमध्ये दिसून येऊ लागल्यामुळे जबाबदारीची जाणीव त्यांच्यात निर्माण करता आल्याचे समाधान लाभले.

**स्वाती माने (जि. प. शाळा आसरे, कोरेगाव, जि. सातारा)**

हे अनुभव वाचताना मूल्यवर्धन कार्यक्रमामुळे शाळेत निर्माण होणाऱ्या मुक्त चैतन्यमय वातावरणाचे दर्शन घडते. मनापासून निरनिराळ्या रीतीने अभिव्यक्त होण्याच्या संधी मिळाल्यावर मुले मोठ्यांनाही चकित करतील अशा रीतीने कसा विचार करतात, कसे कौशल्य दाखवितात याचा प्रत्यय येतो. त्यांचा सहयोगी रीतीने आपसात विचार–विनिमय आणि सुसंवाद करून योग्य निर्णय घेण्याची कुवत पाहून ही मुले भावी जबाबदार नागरिक व्हावीत हे स्वप्न सत्यात उतरू शकेल याचे आश्वासन मिळते. मूल्यवर्धन उपक्रमाचे सूत्र धरून त्यातून खूप मोठे भरीव काम/प्रकल्प उभे करणाऱ्या शाळांबद्दल कौतुक वाटते. संविधानातील मूल्ये मुलांच्या डोक्यावरून तर जाणार नाहीत ना, ही शंका दूर व्हायला मदत होते. शाळांच्या भिंती, तुळ्या, फळे यांवर वेळोवेळी लिहिलेली काही सुवचने तरी प्रत्यक्षात येत असल्याचा सुखद अनुभव येतो. विद्यार्थी, पालक आणि शिक्षक यांचे एकमेकांतील सामंजस्य वाढल्याची उदाहरणे 'शाळा हे समाज परिवर्तनाचे साधन आहे' या सुविचाराची आठवण करून देतात. उपक्रमातून लहान मुलांना येणारी स्व–जाणीव आणि स्वव्यवस्थापनाचे भान शिक्षणाचा एक उद्देश पूर्ण करते होत असल्याचे समाधान देते. 'मी स्वतः बदलल्याशिवाय मुलांकडून बदलाची अपेक्षा कशी करणार?' असे शिक्षकांनी केलेले चिंतन आपल्या सर्वांनाच अंतर्मुख करते. मूल्यवर्धन उपक्रम मुलांना आवडतात, परिणामकारक ठरतात याचे नक्की गमक काय आहे, याचे उत्तर अवघड नाही. मूल्यांविषयी विचार करायला प्रवृत्त करणारी कृती, गोष्ट, खेळ यांची निवड उपक्रमात केली जाते. ते मुलांना, त्यांच्या वयाला आवडणारे, झेपणारे असतात. मूल्ये व अध्ययन निष्पत्ती यांचे सूत्र कायम ठेवून अनेक उपक्रमांची साखळी तयार केली जाते. मुले–मुलेच विचार करतात. अडेल तिथेच शिक्षक विचारांची गाडी अलगद पुढे नेऊन सोडतात. कुठेही तात्पर्य, निष्कर्ष सांगण्याची घाई नसते. प्रत्येक विद्यार्थी सहभागी होईल असे नियोजन आणि धडपड असते. शिक्षक लहान मुलांचे ऐकून घेतात, त्यांच्या कुवतीवर विश्वास ठेवतात आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कौतुकाची जादूची कांडी पुन्हा पुन्हा वापरतात. अशी ही आनंद यात्रा सुरू राहते.

यात विशेष ते काय? असं वाटेल. खरंच आहे! काहीच नवे नाही. अध्ययनाची ही पद्धती मूल्यवर्धनची मक्तेदारी नाही. सामाजिक भावनिक अध्ययन परिणामकारक रीतीने घडून येण्यासाठी मान्य झालेली ही शिक्षण प्रणाली आहे. खरं तर कोणत्याही शालेय विषयाच्या अध्ययनासाठी ती उपयोगी आहे. अनेक शाळा त्या वापरतच आहेत किंवा मूल्यवर्धन उपक्रमांचा प्रभाव पाहून इतर विषयांसाठी त्यांनी ती वापरायला सुरुवात केली आहे. शिक्षक, पालक आणि अधिकारी यांच्या सहयोगातून मूल्यवर्धन तसेच इतर विषयांच्या अनुभवांआधारे समाज परिवर्तनाचा हा प्रवास असाच सजगतेने आणि उत्साहाने पुढे सुरू ठेवणे हेच मूल्यवर्धन कार्यक्रमाचे पुढचे क्षितिज आहे.

# कर्मवीरांचा शैक्षणिक दृष्टिकोन

**प्रा. प्रदीप हिवरकर**
महात्मा फुले अध्यापक विद्यालय, जि. सातारा. भ्रमणध्वनी : ७७७४८९६६३२

*'रयत' शब्द ऐकला की, राज्य रयतेचे असे म्हणणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि कर्मवीर भाऊराव पाटील या द्रष्ट्या व्यक्तीने स्थापन केलेली 'रयत शिक्षण संस्था' डोळ्यांपुढे येते. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांच्या शैक्षणिक विचारांचा घेतलेला परामर्ष....*

९ मे कर्मवीर भाऊराव पाटील स्मृती दिन. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्यानंतर पुरोगामी विचारांचा वारसा पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी चालविला, १९०९ मध्ये सांगली जिल्ह्यातील दुधगाव येथे सर्व जाती-धर्मांच्या मुलांसाठी दुधगाव विद्यार्थी आश्रम स्थापन केला. पुढे हा प्रयोग चांगलाच यशस्वी झाला. ९ सप्टेंबर १९१९ रोजी सत्यशोधक समाज परिषदेत सातारा जिल्ह्यातील काले या गावी भाऊरावांनी सर्व जाती-धर्मांच्या मुलांसाठी शाळा सुरू करावी असा ठराव झाला. भाऊरावांनीही तो मान्य केला आणि ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना झाली.

*''जाति न पूछो साधुकी, पूछ लिजिए ज्ञान ।*
*मोल करो तलवार का, पडा रहन दो म्यान ।।*

हा संत कबीरांचा विचार अखेरपर्यंत जपला.

ग्रामीण वर्गातील वंचित कुटुंबातील मुलांनी मातृभाषेचा आदर करून इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवावे, उच्च शिक्षण घ्यावे यासाठी समाजातील दानशूर व्यक्तींची मदत घ्यायची व त्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी पाठवायचे यासाठी भाऊरावांनी खूप धडपड केली. अनवाणी पायी फिरून त्यांनी देणग्या जमा केल्या.करवीरचे राजे श्रीमंत छत्रपती शहाजीराजे महाराज, ग्वाल्हेरचे शिंदे घराणे, फलटणचे निंबाळकर, तात्यासाहेब तडसरकर, गणपतराव शेडगे, बाबूराव सणस, कर्जतचे दादा पाटील, विठ्ठलराव देशमुख उर्फ दादा, दत्ताजीराव देशमुख उर्फ महाराज काका, स्वातंत्र्यसैनिक रामभाऊ तुपे, रा. ब. काळे या व अशा असंख्य दानशूर व्यक्तींकडून व सामान्य रयतेकडून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी त्यांनी मदत मिळविली. त्या आर्थिक मदतीतून बॅरिस्टर पी. जी. पाटील यांच्यासारखे अनेक विद्यार्थी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेऊन आले व रयतचे काम अखेरपर्यंत नि:स्वार्थ भावनेने करीत राहिले.

फक्त शिक्षण घेऊन स्वतःचा प्रपंच पाहणे हे भाऊरावांना मान्य नव्हते. राष्ट्र उभारणीच्या कार्यात सर्वस्व अर्पण करण्याचे आवाहन ते आपल्या विद्यार्थ्यांना करीत असत. स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधीजींच्या आवाहनाला प्रतिसाद देत ते गावा-गावांतून स्वदेशीचा प्रचार करू लागले. स्वत:, खादी कोट, सुती धोतर वापरीत. ग्रामीण लघुउद्योग, ग्रामोद्योग यांस चालना मिळावी, ग्रामीण कलेचे संरक्षण व्हावे आणि भारतीय संस्कृतीचे रक्षण व्हावे हे उदात्त हेतू त्यामागे होते.

१९२७ मध्ये सांगली जिल्ह्यातील कामेरी या गावी स्वातंत्र्यलढ्यासंदर्भात परिषद भरली होती. कर्मवीर त्या परिषदेला उपस्थित होते. त्यांनी शैक्षणिक कार्य सोडून स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्याचे ठरविले. हा विचार भाऊरावांच्या पत्नी सौ. लक्ष्मीवहिनी यांना रुचला नाही, त्यांनी भाऊरावांना विरोध केला. त्या म्हणाल्या, ''गोरगरिबांची अठरा पगड जातीची मुले गोळा केली, चार दिवस शिकविले आणि आता हे शैक्षणिक कार्य पेलत नाही म्हणून स्वातंत्र्यालढ्याचा मार्ग पत्करला असे होईल.'' त्यावेळी रामभाऊ नलावडे साहेब यांनी भाऊरावांची समजूत काढली. नंतर भाऊरावांनी रयत वाढविण्याचा ध्यास घेतला. तरीही प्रथम राष्ट्र निर्माण, राष्ट्र प्रेम हा दृष्टिकोन नेहमीच अग्रस्थानी होता.

'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' स्वर्गाहूनही थोर असणाऱ्या मातृभूमीची भक्ती करून तिच्या उन्नतीसाठी,

**(पृष्ठ क्र. २८ वर)**

# Education in Pandemic and Aftermath

**आशुतोष पाटील** (Mech. Eng.)
भ्रमणध्वनी : ९५०३१२०३१२

कोरोना महामारीने पूर्ण जगभरात थैमान घातले आहे. कोरोना विषाणूचा संसर्ग आटोक्यात आणून जीवितहानी टाळणे तसेच टाळेबंदीमुळे येऊ घातलेल्या आर्थिक मंदीचा सामना करणे यासाठी सर्व देश प्रयत्न करीत आहेत. आजच्या परिस्थितीमध्ये सर्वांत जास्त नुकसान हे शिक्षणक्षेत्राचे झाले आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, यासाठी UNESCO चा ताजा अहवाल साक्षीला आहे.

UNESCO च्या म्हणण्यानुसार, या संकटामुळे संपूर्ण जगभरात सुमारे १५४ करोड विद्यार्थी हे शिक्षणापासून वंचित आहेत. महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक आणि उच्च प्राथमिक शाळांमध्ये हीच संख्या १.५९ करोड असून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये ६६.५ लाख आहे. यामुळे शिक्षणक्षेत्रावर तात्कालिक व दूरगामी परिणाम होणार आहेत.

### शाळा सोडण्याच्या संख्येत वाढ :

शाळा बंद झाल्याने विद्यार्थ्यांची गळती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामध्ये मुलींची संख्या जास्त असण्याची भीती आहे. त्यामुळे पुन्हा जुन्याच संकटांचा सामना करावा लागेल. जसे की, शिक्षणातील लिंग आधारित दरीमध्ये वाढ. त्यामुळे थेट लैंगिक शोषण, कुमार वयातच मातृत्व व बालविवाह अशी संकटे उभी राहण्याची शक्यता आहे.

### कुपोषण :

शालेय पोषण आहार सारख्या उपक्रमामुळे शाळांमध्ये विद्यार्थिसंख्येत आजवर जवळपास ३० टक्के वाढ झाली आहे. या शालेय पोषण आहारामधून मिळणाऱ्या अन्नावर पोट भरणाऱ्या गरजू विद्यार्थ्यांची संख्या ही सहजगत्या काही लाखांवर आहे. त्यामुळे थेट दैनंदिन पोषणावर सुद्धा कोरोना संकटाचा परिणाम होणार आहे.

प्रशासनाने यासाठी सुद्धा कॅश ट्रान्सफर करून या विद्यार्थ्यांना अन्नधान्य देण्याची सुविधा उपलब्ध करावी हे अपेक्षित आहे.

> *सध्या आपण कोरोनाच्या महाभयंकर संकटाला तोंड देत आहोत. संकटं आपली परीक्षा पाहत असतात. संकटकाळ हा मोठा कसोटीचा असतो. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षण विभाग या कसोटीच्या काळात तंत्रज्ञानाच्या मदतीने अध्ययन-अध्यापन चालू ठेवण्याचे आव्हान पेलताना या संकटामुळे येणाऱ्या गळती, कुपोषण यांचा विचार करून धोरण, पद्धती कशी ठरविली गेली पाहिजे याविषयी....*

### धोरणात्मक सुधारणा :

कोरोना महामारीने शिक्षणक्षेत्रातील अनेक अडचणी अधोरेखित केल्या आहेत. कोरोना नंतरचे जग हे नवीन संधी उपलब्ध करून देणार आहे. नवीन शिक्षण धोरणही येऊ घातले आहे. या संधीचा फायदा घेऊन राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने शिक्षणामध्ये व अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करण्यासाठी समिती गठित करण्यासाठी पावले उचलली आहेत, ज्यामध्ये सर्व क्षेत्रातील धुरंधर आपले योगदान देतील व सर्वसमावेशक धोरण ठरवतील अशी अपेक्षा आहे.

### भविष्यातील गरज ओळखून सुधारणा :

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम च्या Future of Jobs रिपोर्टनुसार २०२५ पर्यंत कामाच्या ठिकाणी अधिकाधिक मशिन्स मानवाला रिप्लेस करतील अशी दाट शक्यता आहे. त्या दृष्टीने फक्त ज्ञानकेंद्रित शिक्षण, घोकंपट्टी, परीक्षा यांवर अवलंबून न राहता कौशल्य, रचनात्मक प्रात्यक्षिके, प्रोजेक्ट बेस्ड लर्निंग, इंटर्नशिप आणि रीस्कीलिंग यांवर भर दिला गेला पाहिजे. याबरोबरच जर कला, क्रीडा, साहित्य, संगीत या बाबी, गुणांचा विचार न करता अभ्यासक्रमात एक करिअर म्हणून 'अपलोड' केल्या तर नक्कीच येत्या काही वर्षांत महाराष्ट्रामध्ये एक वेगळी 'ऑपरेटिंग सिस्टीम' दिसून येईल. अनेक शिक्षक यामध्ये स्वत:हून सक्रिय असल्याचे दिसून येत आहे, याची अनेक उदाहरणे देता येतील

जसे, भोर येथील एका ग्रामीण भागातील शाळेमध्ये शिक्षकांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांमध्ये पक्षी निरीक्षणाद्वारे निसर्गाविषयी संवेदनशीलता जोपासली जाते. (दळवी सर, पिसावरे स्कूल, भोर), विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागावी व सर्व गरजेची माहिती एका ठिकाणी मिळावी यासाठी YouTube चॅनेल सुरू करण्यापासून वेबसाईट डेव्हलपमेंटचे काम स्वतः करण्याचा एका शिक्षकांचा पराक्रम थक्क करून जातो. (श्री. बाबर, छत्रपती शिवाजी हायस्कूल, भोर, पुणे.) अशा खऱ्या अर्थाने मॉडर्न आणि डिजिटल शिक्षकांची फळी आपल्या राज्यात उपलब्ध आहे.

शिक्षकांमध्ये तंत्रज्ञानाची कौशल्ये विकसित करण्यासाठी सर्व शिक्षण मंडळे, SCERT, बालभारती, SSC बोर्ड यांनी एका प्लॅटफॉर्मवर येऊन धोरण ठरविण्यात आपले योगदान देण्याची गरज आहे.

### डिजिटल गॅप :

शिक्षण विभागाने SCERT च्या पुढाकाराने 'शाळा बंद, पण शिक्षण सुरू' मार्फत दररोज सर्व वर्गांसाठी वेळापत्रक तयार करून विद्यार्थ्यांना ई-लर्निंगद्वारे अभ्यासमाला देण्याची व्यवस्था केली आहे, परंतु सर्वच विद्यार्थ्यांकडे लॅपटॉप, स्मार्टफोन व इंटरनेट सुविधा नसल्यामुळे (राज्यात १६ टक्के विद्यार्थी हे टी. व्ही., रेडिओ, स्मार्टफोन, इंटरनेट इ. पासून वंचित आहेत.) ही अभ्यासमाला या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे म्हणजे शिक्षण विभागासाठी एक आव्हानच आहे. त्यासाठी सुद्धा प्रयत्न चालू असल्याचे दिसून येत आहे.

### डिजिटल कन्टेन्ट :

हे खरे आहे की ई-लर्निंग द्वारे चित्रे, PPT, व्हिडिओ यांमार्फत नावीन्यपूर्ण शिक्षण देता येईल, परंतु सध्या अनेक शिक्षक, प्रायव्हेट कंपन्या वैयक्तिक स्तरावरून असा डिजिटल कन्टेन्ट देण्याचा प्रयत्न करीत आहेत. नक्कीच ही गोष्ट प्रशंसनीय आहे परंतु यामुळे नवीन अडचणी आपले डोके वर काढतील. जसे, भरमसाठ ॲप्स उपलब्ध होतील, पण शाळा, विद्यार्थी कोणते ॲप्स वापरतील यावर नियंत्रण राहणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विश्वसनीय विदा (Data) कोणता याबद्दल संभ्रम राहील आणि सायबर सिक्युरिटीचा प्रश्न निर्माण होईल. त्यातून विदा (Data) ची चोरी किंवा त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. या गोष्टींवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी प्रशासनाने योग्य ती पावले उचलून तंत्रस्नेही शिक्षक व खाजगी निर्माते यांना सुद्धा दीक्षा ॲप मध्ये आपले योगदान देण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. पालकांनी सुद्धा आपला पाल्य किती वेळ स्मार्टफोन/लॅपटॉप वापरतो, त्याच्या डोळ्यांवर व मेंदूवर याचा ताण पडतो का, अभ्यासाव्यतिरिक्त इतर कोणताही आक्षेपार्ह व पोर्नोग्राफिक कन्टेन्ट तो बघत नाही ना याबद्दल दक्ष असण्याची गरज आहे. ऑनलाईन शिक्षणामध्ये शिक्षकांबरोबर पालकांचा रोल खूप महत्त्वाचा आहे हे लक्षात घेतले पाहिजे. पोर मोबाईल घेऊन बसतंय म्हणजे अभ्यासच करत असेल असे समजून निश्चिंत राहून चालणार नाही.

### शिक्षण पद्धतीमध्ये बदल :

आजपर्यंत सर्व शिक्षण हे ऑफलाईन पद्धतीने सुरू होते.कोरोना संकटामुळे अचानक ऑनलाईन शिक्षणाकडे वळण्याखेरीज आज गत्यंतर नाही ही बाब मा. मुख्यमंत्र्यांनी सुद्धा अधोरेखित केली आहे. सध्याच्या परिस्थितीत शाळा सुरू करणे हा मार्ग नक्कीच शक्य नाही. त्यामुळे अचानक ऑफलाईन कडून ऑनलाईन या 'क्लिक' ला सामावून घेताना व योग्य सांगड घालताना शिक्षक तसेच विद्यार्थ्यांची नक्कीच तारांबळ उडणार आहे, याकरिता दूरशिक्षणाची कला विकसित करण्यासाठी सुद्धा विशेष ट्रेनिंगची गरज नाकारता येत नाही.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाचा या आलेल्या संकटाचे संधीमध्ये रूपांतर करून घेण्यासाठी कात टाकून युद्ध पातळीवर काम चालू करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. दीक्षा ॲप च्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न, टी. व्ही., रेडिओ वर वेगवेगळे चॅनेल्स व प्राईम टाइम मिळविण्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा, 'अधिकारी ऑनलाईन व्यावसायिक विकास मंच' च्या माध्यमातून अधिकारी तसेच डायट च्या शिक्षकांचे प्रशिक्षण, जास्तीत जास्त विकेंद्रीकरण करून स्थानिक पातळीवर केंद्र संचालक आणि मुख्याध्यापक यांच्याकडे जबाबदारी सोपविणे, UNICEF च्या बरोबर MoU करून विद्यार्थ्यांना करिअर पोर्टल उपलब्ध करून देणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लॉकडाऊनच्या काळात विद्यार्थी आणि पालक अनुभवत असलेल्या डिप्रेशन, anxiety, मेंटल इन्स्टॅबिलिटी इ. हाताळण्यासाठी समुपदेशकांचा चमू तयार करून योग्य मार्गदर्शन करणे या गोष्टींचा आढावा घेतल्यावर असे दिसते की, इतके चांगले काम कमी वेळेमध्ये कदाचित इतर राज्यांत झाले नसेल. या प्रयत्नांबद्दल नक्कीच आपल्या शिक्षण विभागाचा अभिमान वाटतो.

कोरोना महामारीचे संकट कमी झाल्यावर आणि लॉकडाऊनचे नियम शिथिल झाल्यानंतर शाळा सुरू करणे हे मोठे आव्हान आहे.

सर्व शाळांचे निर्जंतुकीकरण करणे, मास्क वापरणे, शारीरिक अंतर राखण्याचे (Physical Distancing) नियम पाळून बैठक व्यवस्था करणे, प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवणे, दोन-तीन शिफ्टमध्ये शाळा चालविणे, ग्रीन झोन मध्ये टप्प्याटप्प्याने शाळा सुरू करणे हे नियम काटेकोरपणे पाळावे लागणार आहेत. सदर अधिकार स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी, शिक्षणाधिकारी यांच्याकडे सोपविले तर या नियमांची उत्तमरीत्या अंमलबजावणी करता येईल.

ग्लोबल वॉर्मिंगमुळे उद्‌भवणाऱ्या अशा आपत्तींची संख्या ही वाढतच जाणार आहे याची मला खात्री आहे. भविष्यामध्ये महापूर, दुष्काळ, अतिवृष्टी, प्रदूषण, कोरोना सारखे संसर्गजन्य रोग, चक्रीवादळे इ. संकटे ही अधिक तीव्र होत जातील. कदाचित तुम्ही हा लेख वाचेपर्यंत amphan चक्रीवादळाने भारतात धुमाकूळ घातला असेल. अशा सर्व शक्यता गृहीत धरून व सदर परिस्थिती पुन्हा निर्माण झाली तर शिक्षण थांबणार नाही यासाठी मिळालेल्या संधीचा उपयोग करून एक कायमस्वरूपी यंत्रणा व धोरण तयार करावे लागेल. हे करीत असताना ऑफलाईन आणि ऑनलाईन शिक्षणाची सांगड कशी घालता येईल यावर विचार झाला तर नक्कीच आपल्याला 'अपडेट' राहता येईल. 'जर' का आपण यामध्ये यशस्वी झालो 'तरच' नावीन्यपूर्ण असा 'आत्मनिर्भर भारत' व 'आत्मनिर्भर महाराष्ट्र' उभा राहण्यासाठी एक पाऊल पुढे पडेल.

❖❖❖

---

**(पृष्ठ क्र. २५ वरून)**

संरक्षणासाठी सदैव झटणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे प्रथम कर्तव्य आहे असा संदेश ते आपल्या विचारांतून व्यक्त करीत.

१९२७ मध्ये महात्मा गांधीजी साताऱ्यातील शाहू बोर्डिंग क्र.१ मध्ये आले असता सर्व जाती-धर्मांची मुले एकत्र अध्ययन करतात, एकत्र जेवण करतात, कोणताही भेदभाव नाही हे पाहून महात्मा गांधीजी म्हणाले, ''भाऊराव मला जे साबरमती आश्रमात जमले नाही ते पवित्र कार्य आपण शाहू बोर्डिंगमध्ये करून दाखविले.'' 'भाऊराव पाटील इनका कार्यही उनका सच्चा कीर्ती स्तंभ हैं ।' असे उद्‌गार त्यांनी काढले.

फक्त उच्च शिक्षण घेऊन भारत बलशाली होणार नाही तर एकता, समता, बंधूता असेल, समाजाला न्याय मिळत असेल तर भारत सामर्थ्यवान होईल हा विचार त्यांनी आपल्या कर्तृत्वातून प्रत्यक्षात अमलात आणला.

१९२८ मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू बोर्डिंगला भेट दिली. त्यावेळी भाऊरावांनी आपल्या विद्यार्थ्यांसमोर डॉ. बाबासाहेब यांची ओळख करून देताना म्हटले, ''विद्येच्या बळावर, स्वत:च्या प्रकाशाने कर्तृत्वाची किती मोठी उंची गाठता येते याचे प्रतीक म्हणजे डॉ. बाबासाहेब. मुलांनो, लक्षात ठेवा जेवणाला सुरुवात करण्यापूर्वी, अन्नाला स्पर्श करण्यापूर्वी रोज म्हणा, मी सुद्धा आंबेडकर होईन.'' हा सुसंस्कार भाऊरावांनी मुलांना दिला.

नोकरी मिळण्यासाठी शिक्षण असा विचार असू नये. ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करायची असेल तर शेतीशिवाय पर्याय नाही. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही आपल्या देशात ५० ते ५१ टक्के क्षेत्र पडीक आहे, नापिक आहे. ती भूमी शेतीस योग्य व्हावी, सिंचनाखाली यावी हा विचार करून भाऊरावांनी माळरानावर नंदनवन उभे करण्याचे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी सातारा जिल्ह्यातील देवापूर, माण, खटाव या भागात सामुदायिक शेतीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. हजारो ट्रक गाळ खडकावर ओतून ती जमीन लागवडीखाली आणली. दानशूरांना ते नेहमी म्हणत, "Give me waste land, we will turn into best land." घामाच्या सुगंधाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी ते अखेरपर्यंत कार्यमग्न राहिले.

*नवीन स्वप्ने, तंत्रज्ञान, सदा असे सांगाती ।*
*मंगल अमुच्या या देशाचे, भविष्य अमुच्या हाती ।।*

रयतने विशेषत: दुर्गम व ग्रामीण भागांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे व्रत निरंतर स्वीकारले. आर्थिक पाठबळ नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' (Earn and Learn) ही योजना सुरू केली. 'घामाच्या सुगंधाला प्रतिष्ठा लाभते, कार्यरत रहा, श्रमाची प्रतिष्ठा सांभाळा' (Diginity of Labour) हा मूलमंत्र भाऊरावांनी दिला.

मूठ मूठ धान्यापासून, समाजाचा सहभाग घेऊन मनुष्यबळाच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी रयतच्या सायन्स अँड इनोव्हेशन ॲक्टिव्हिटी सेंटरचा प्रवास निरंतर सुरू आहे.

❖❖❖

# निकष : तंबाखूमुक्त शाळेचे

**रमेश मुनेश्वर**
जि. प. प्राथ. शाळा लोणी, ता. किनवट, जि. नांदेड. भ्रमणध्वनी : ७५८८४२४७३५

*व्यसन माणसाला रसातळाला नेते, मग ते कोणतेही असो. मुले वेगवेगळ्या व्यसनांच्या आहारी गेलेल्या व्यक्ती बघतात. त्यांचे कुतूहल वाढते. ती अनुकरणप्रिय असतात म्हणूनच आजूबाजूला सर्रास तंबाखूचे सेवन करणारे लोक असताना मुलांना त्याच्या दुष्परिणामांविषयी सांगणे आवश्यक आहे. शाळा तंबाखूमुक्त होण्यासाठी महाराष्ट्र शासन व सलाम फाऊंडेशन यांनी सुरु केलेल्या चळवळीविषयी व शाळांनी घ्यावयाच्या दक्षतेविषयी....*

प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे महाराष्ट्र आणि सलाम मुंबई फाऊंडेशन यांचा संयुक्त उपक्रम म्हणजे तंबाखूमुक्त शाळा.

भारतात तंबाखू विरोधी कायदा असला तरी निव्वळ कायदा करून प्रश्न सुटलेला नाही. समाजातील घटकांना याची जाणीव करून देणे गरजेचे आहे. महाराष्ट्र शासनाने एका आदेशान्वये सुगंधित तंबाखू सुपारी पानमसाला व गुटख्याची उत्पादन विक्री, साठवणूक, वाहतूक व वितरण यांवर बंदी घातलेली आहे.

तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाने दरवर्षी भारतात दहा लाख नागरिकांचा मृत्यू होतो. देशात प्रौढ व्यक्तींमध्ये तंबाखू खाणाऱ्यांचे व तंबाखूजन्य पदार्थ सेवन करणाऱ्यांचे प्रमाण अधिक असून आता हे लोण लहान लहान मुलांमध्ये सुद्धा पोहोचले आहे.

मुले ही संस्कारक्षम असतात. मोठ्यांचे अवलोकन करून ती त्यांचे अनुकरण करतात म्हणून शिक्षकांनी तंबाखूच्या उच्चाटनासंदर्भात पुढे येणे गरजेचे आहे. तंबाखूचा शरीरावर कसा वाईट परिणाम होतो याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे व ही चळवळ शाळा तसेच महाविद्यालयांतून चालविणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासन व सलाम फाऊंडेशन यांनी ही चळवळ जोमात सुरू केलेली आहे.

तंबाखूमध्ये घातक रसायने असतात. तंबाखूमुळे तोंड, नाक, स्वरयंत्र, फुफ्फुस, गळा, अन्ननलिका, मूत्राशय, मूत्रपिंड, व गर्भाशय मुखाचा कर्करोग होतो. तंबाखूतील निकोटीनच्या प्रभावामुळे मेंदूचे कार्य थांबते. मेंदूची विचार करण्याची क्षमता कमी होते. तसेच जे लोक धूम्रपान करतात त्यांना हृदयघात होण्याची शक्यता अधिक असते.

त्यामुळे शाळा तंबाखूमुक्त होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी निर्धारित केलेले ११ निकष पूर्ण केलेली शाळा तंबाखूमुक्त शाळा म्हणून घोषित करण्यात येते. त्यासाठी शाळेने शाळेत तंबाखूमुक्तीसाठी केलेल्या कामाचे पुरावे द्यावे लागतात. प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांनी एक मोहीम म्हणून काम केले तर एक–दोन महिन्यांत शाळा तंबाखूमुक्त होते. विद्यार्थी तंबाखूमुक्तीसाठी निबंध लिहितात, चित्रे काढतात, एवढेच नाही तर आपल्या नातेवाईकांना तंबाखू सोडण्यासाठी भावनिक पत्रं सुद्धा लिहितात. यामुळे पालकांवर त्याचा परिणाम दिसून येतो. गावातीलच मुले शाळेत असल्याने शाळा तर तंबाखूमुक्त होतेच, पण विद्यार्थ्यांचे पालक, नातेवाईक पर्यायाने समाज, गाव तंबाखूमुक्त होऊ शकतो.

लहान वयातच तंबाखूच्या परिणामांची मुलांना जाणीव झाली तर ते कधीच त्यांच्या आहारी जाणार नाहीत आणि हीच मुले सुदृढ नागरिक म्हणून पुढे येतील म्हणून प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण संचालनालय पुणे, महाराष्ट्र आणि सलाम मुंबई फाऊंडेशन यांच्या उपक्रमात ११ निकष पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न करू या आणि महाराष्ट्रातील सर्वच शाळा, शिक्षक, विद्यार्थी, शालेय व्यवस्थापन समितीने तंबाखूमुक्त शाळा करण्यासाठी पुढाकार घेऊन शाळा तंबाखूमुक्त करू या..!

**शाळा तंबाखूमुक्त होण्यासाठी असलेले निकष पुढीलप्रमाणे :**

- शैक्षणिक संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारच्या तंबाखूजन्य पदार्थाचे सेवन करण्यास विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व अभ्यागत यांना पूर्णपणे बंदी असावी.
- धूम्रपान निषेध जागा : येथे धूम्रपान करण्यास कायद्याने मनाई आहे असा फलक शैक्षणिक संस्थेत महत्त्वाच्या ठिकाणी लावलेला असावा.

**(पृष्ठ क्र. ३३ वर)**

# जपणूक जैवविविधतेची

**डॉ. सुधीर कुंभार**
क. भा. पाटील विद्यालय ढेबेवाडी, जि. सातारा. भ्रमणध्वनी : ९४२१२१४१३६

*निसर्ग हा इतकं भरभरून देणारा आहे, की 'अनंत हस्ते कमलावराने, देता किती घेशील दो कराने' अशी आपली अवस्था होते, पण आपला हव्यास इतका वाढला, की आपण त्यापायी निसर्गात नको इतकी ढवळाढवळ केली. त्यामुळेच निसर्गाचा समतोल ढासळू लागला. जैवविविधतेचा ऱ्हास होऊ लागला. याकडे गांभीर्याने लक्ष देत जैवविविधतेची जपणूक करायला हवी. याविषयी....*

## आपल्या समस्यांची उत्तरे निसर्गातच :

जैवविविधता दिन २२ मे या दिवशी जगभरात साजरा केला जातो. गेली पंचवीसहून अधिक वर्षे हा दिन साजरा केला जातो. त्यानिमित्त आतापर्यंत विविध विषय हाताळले गेले आहेत. वन जैवविविधता, पाणी आणि जैवविविधता, आमची जैवविविधता : आपले अन्न, आपले आरोग्य, जैवविविधता आणि शाश्वत पर्यटन, सागरी जैवविविधता, जैवविविधता विकास आणि दारिद्र्य निर्मूलन, जैवविविधता आणि शेती, जैवविविधता आणि हवामान बदल इत्यादी. यंदाचा २020 चा विषय आहे. 'आमचे निराकरण निसर्गात आहे '(Our Solutions Are In Nature).

जंगले, वने, बागा, शेती, समुद्र, प्राणिसंग्रहालये पाहण्यासाठी भटकणे व निरीक्षण करणे यापुरताच निसर्ग मर्यादित नाही. कोणाच्यातरी अधिवासाचा नाश, नव्या ठिकाणी नको त्या प्राणी वा वनस्पती जातींचा प्रवेश, मानवी लोकसंख्येची मर्यादेपलीकडे वाढ आणि कृषिक्षेत्राची अनिर्बंध वाढ असे जैवविविधतेचे धोके आहेत. मानवाची निसर्गातील ढवळाढवळ कधी धोकादायक बनेल सांगता येत नाही. अल्प कालावधी वा दीर्घ कालावधीसाठी बदल संभवतात पण ते दुरुस्त होऊ शकतात.

जैवविविधता ऱ्हासाला कधीकधी निसर्गच कारणीभूत ठरतो. महापूर, ज्वालामुखी, त्सुनामी, भूकंप यांसारखी उदाहरणे देता येतील. मात्र जैवविविधता ऱ्हासाची मानवनिर्मित अनेक करणे सांगता येतील. वणवा, शहरीकरण, खाणकाम, अतिक्रमण, शिकार, तस्करी, अंधश्रद्धा, अनेक प्रकारचे प्रदूषण येथील विविधतेला हळूहळू कुरतडून संपवीत आहे. मानव जेव्हा काही छोट्या मोठ्या गोष्टी करतो तेव्हा त्यांचे दूरगामी परिणाम लगेच लक्षातही येत नाहीत आणि जैवविविधता ऱ्हासाला सुरुवात होते. जसे, रासायनिक कीटनाशकांचा वापर कित्येक टनाने वाढला आहे. कारखान्यांद्वारे हवा, माती, पाणी व अन्न दूषित करण्याचे अर्थात नासविण्याचे काम सुरू आहे. जपानमधील मिनिमाटा, अमेरिकेतील डी. डी. टी. यांमुळे लोप पावलेले काळे पेलिकन किंवा आपल्याकडची पांढऱ्या पाठीची गिधाडे आपले अस्तित्व राखता राखता अस्तित्वहीन झाली आहेत. निसर्गाच्या कानाकोपऱ्यांत कुठेतरी गिधाडांच्या तोंड लपवून बसलेल्या टोळ्या कधीतरी दिसतात.

जैवविविधता, हवामान व जमिनीची एक सांगड असते. विशिष्ट हवामानामुळे विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात तेथील जमिनीवर विशिष्ट प्रकारच्या वनस्पती, पिके येत असतात. त्यावर अन्नसाखळ्या व अन्नजाळे हजारो वर्षे अव्याहतपणे चालू आहे. मात्र १९ व २० व्या शतकात ते सारे हळूहळू उध्वस्त झाले आणि आजही होत आहे. विविधता नष्ट होत गेली तर मानवाची विविधताही पुढेमागे धोक्यात येणार आहे. त्यातच त्याचा ऱ्हास ठरलेला आहे. एकविसाव्या शतकाच्या मध्यावर किंवा शेवटी काय असेल माहीत नाही. कोरोना, झिका, हंटा, रोटा, निपाह, स्वाईन-फ्लू यांसारखे विषाणू जगभर थैमान घालत आहेत. गेल्या शंभर दीडशे दिवसांत जगभर लाखांच्या वर बळी पडलेले आपण पाहिले आहेत.

जैवविविधतेचा संबंध दैनंदिन जीवनाशी जोडला तर अनेक व्यवसाय त्याच्याशी जोडलेले दिसून येतील. आपला शेतकरी विविध प्रकारची पिके घेतो. मागणीनुसार विविध धान्ये, कडधान्ये, तेलबिया, भाज्या, फुले, फळे पिकवितो. त्यात अशी

विविधता नसती तर केवळ भात, मासे हाच आहार झाला असता. पण तो सर्वत्र तयार होत नाही. निसर्गाकडे याचे उत्तर आहे ते म्हणजे जैवविविधता. निसर्ग सर्वांसाठी सर्वच द्यायला तयार असतो. किती घ्यायचे हे न समजल्याने समस्या निर्माण झाल्या आहेत. अनेकांनी त्यांचे व्यवसाय निसर्गातूनच शोधले आहेत. निसर्ग मार्ग शोधायला मदत करीत असतो. पृथ्वीवर असणारी जैवविविधता बर्फाळ प्रदेशात, वाळवंटात, समुद्र किनारी, समुद्रात, डोंगराळ प्रदेशात जिथे तिथे दिसते. नुसते निसर्ग पर्यटन व निसर्ग पाहणे एवढाच उद्देश ठेवला तर ही विविधता अनेकांचे पोट भरण्यास समर्थ आहे. मनोरंजन, कलात्मकता, ज्ञान व विविध कौशल्ये निसर्ग देतो आहे, पण निसर्गाचे दोहन आणि ओरबाडणे यामुळे जागोजागी त्याला क्षती पोहोचत आहे. लॉकडाऊनच्या काळात अभयारण्यात, राष्ट्रीय उद्यानात, जंगलातून भीतीमुक्त वातावरणात फिरणारे, भटकणारे प्राणी पहायला मिळाले. अगदी गावापर्यंत किंवा शहरापर्यंत हरणे, बिबट्या, हत्ती फिरून गेले. मानवमुक्त निसर्ग पक्ष्या-प्राण्यांनी पाहिला.

जैवविविधता व मानवी संस्कृती यांचा धांडोळा घेतला तर प्रत्येक संस्कृतीत निसर्गाचा पुरेपूर वापर अन्न, वस्त्र व निवारा अशा सुखसोयींसाठी करताना झालेला दिसेल. लोकसंख्या वाढली तशी हावही वाढली. वापरापेक्षा साठवणूक करण्याकडे माणसांचा कल दिसून येऊ लागला. हे करताना भानही राखायचे असते हे तो विसरून गेला. प्राणी-वनस्पतींचे औषधासाठी इतके व्यापारीकरण झाले की एखाद्या ठिकाणाहून त्या अजिबात दिसेनाशा झाल्या. शतावरी सारख्या कोणत्याही जंगलात सहज दिसणाऱ्या वनस्पती औषधालाही मिळणे दुरापास्त झाले. जिभेच्या चोचल्यासाठी अनेक प्राणी व पक्षी दुर्मीळ झाले.निसर्ग मग उत्तर देतोच आहे. अशी विविधता नको आहे तर टणटणी, बेशरम, ग्लारीसेडीया, पाम अन निलगिरी ही विविधता घ्या ना. कोणता प्राणी, पक्षी वा कीटक त्यावर येणार! आपल्या सर्व समस्यांची उत्तरे निसर्गाकडे आहेत. कृषी व्यवस्थेचा प्रारंभ, परिसरामध्ये तंत्रज्ञान आणि अवजारांच्या मदतीने बदल करून नैसर्गिक अधिवास मानवास राहण्यायोग्य बनवणे हे होलोसीन युगाचे वैशिष्ट्य. मानवी हस्तक्षेपामुळे सध्या विलोपन क्रिया एवढी झपाट्याने होत चालली आहे की फक्त १०० वर्षांमध्ये इतर सजिवांचा नाश होण्याची शक्यता आहे.

गेल्या शतकात इंडोनेशियातील भातावर राइस ग्रासी स्टंट व्हायरस नावाचा एक रोग पडला होता. जग उपासमारीच्या उंबरठ्यावर होते. शास्त्रज्ञांनी त्या रोगाला बळी न पडणाऱ्या भाताचा शोध जगभर घेतला. रोगप्रतिकारशक्ती असणारे भाताचे वाण त्यांना शोधायचे होते. भारतातील ६२७३ भात वाणांपैकी एका आदिवासी पाड्यावर ते भात त्यांना मिळाले. यातील नैसर्गिक गुणसूत्रामुळेच जग उपासमारीमुळे वाचले.

जगातील ७० टक्के लोक आजही नैसर्गिक औषधोपचार पद्धतीचा वापर करीत आहेत. सुमारे २० प्रकारच्या वनस्पती जगभर मोठ्या प्रमाणात पिकविल्या जातात. निसर्ग संपन्नता धीम्या वेगाने होत असते. उत्क्रांती हळू वेगाने होते, पण ऱ्हास मात्र वेगाने होतो. असे असले तरी त्याचे परिणाम कमी करण्याची क्षमता निसर्गात आहे. निसर्ग अनेकदा जागोजागी थोड्याफार दुरुस्त्या करू शकतो. काही समस्यांचे पूर्णतः अथवा अंशतः निराकरण निसर्ग स्वतःच करतो. त्सुनामीच्या डोंगरांएवढ्या लाटांत श्रीलंकेतील समुद्रकिनाऱ्याच्या जवळच्या क्षेत्रातील अभयारण्यातील हजारो प्राण्यांना वाचविण्याचे काम किनाऱ्यावरील कांदळवनांनी म्हणजे खारफुटीच्या जंगलांनी केले. ऑस्ट्रेलियातील ॲमेझॉन जंगलांना लागलेले महाभयानक वणवे विझविण्याचे काम निसर्गानेच त्याच्या पद्धतीने केले. आपल्या प्रत्येक समस्येचे उत्तर निसर्गाकडे आहे हे पुन्हा पुन्हा सिद्ध होते. साध्या राहणीत राहणार असू तर निसर्ग साथ देईल अन्यथा तुझा शेवटच माझ्या पायाशी हे निसर्ग तत्त्व आहे. आपण जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी स्थानिक पातळीवर सज्ज राहिलेच पाहिजे. प्रत्येक ठिकाणी हे घडले तरच जैवविविधतेची जपणूक होईल.

❖❖❖


## वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वतःचा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई-मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई-मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण'ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.

# महाडचे बाल साहित्य संमेलन

**अरुणा यादव**
गटशिक्षणाधिकारी महाड, ता. महाड, जि. रायगड. भ्रमणध्वनी : ९८८१०३३१८०

*वाचन व साहित्याशी निगडित गोष्टींना पारख्या होत चाललेल्या पिढीसाठी संत-महात्म्यांचे साहित्य, आधुनिक साहित्यिकांचे साहित्य दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरू शकते. या साहित्याची ओळख मुलांना साहित्यसंमेलनातून व्हावी या विचाराने सुरू केलेल्या महाडच्या बाल साहित्य संमेलनाविषयी....*

**महाडची केंद्रस्तरीय बाल साहित्य संमेलने ठरतील राज्यासाठी दिशादर्शक.....**

टीव्ही, मोबाईल, इंटरनेट, व्हॉट्सॲप, फेसबुक व यूट्यूब सारख्या सोशल मीडियाचा दबदबा असलेल्या आजच्या काळात; हल्लीची पिढी वाचन व साहित्याशी निगडित गोष्टींना पारखी होत चालली आहे. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात माहिती व ज्ञानाचा प्रचंड साठा उपलब्ध होत आहे, परंतु माणसाची विवेकबुद्धी दिवसेंदिवस हरवत चालल्याने मानवी मूल्ये ढासळत आहेत. त्यातच पुस्तके आणि साहित्य संस्कृतीची आवड कमी झाल्याने येणारी नवीन पिढी सुद्धा भरकटत आहे. त्याचे दुष्परिणाम तुम्ही आम्ही सगळे जण पाहतच आहोत. कधीकाळी माणसाने स्वत:च्या विकासासाठी भाषा निर्माण केली. आपल्या मराठी भाषेत कालपरत्वे विपुल साहित्यही निर्माण झाले. मात्र आज एकविसाव्या शतकात प्रत्यक्ष ग्रंथ, पुस्तके, कथा, कविता, गाणी, गोष्टी, महापुरुषांची चरित्रे यांचे वाचन हल्ली जवळजवळ थांबलेलेच आहे म्हणूनच सद्य:परिस्थितीचा विचार केला तर पुन्हा एकदा माणूस घडविण्याची जबाबदारी नव्याने आपल्या मराठी भाषेवर व साहित्यावर येऊन ठेपली आहे असे वाटते. आजच्या धावपळीच्या युगात भरकटत जाणाऱ्या मुलांची पडझड होऊ नये व उद्याच्या उज्ज्वल भारताचे आधारस्तंभ हे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास झालेले, संपन्न असे घडविण्यासाठी संत-महात्मे, लेखक, कवी व थोर साहित्यिक यांनी लिहिलेले साहित्य आपल्या सर्वांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरू शकते; हे लक्षात घेऊन...

*''या कोवळ्या कळ्यांमाजी,*
*लपले ज्ञानेश्वर, रवींद्र, शिवाजी ।*
*विकसिता प्रकटतील,*
*शेकडो महापुरुष''।।*

या विचाराने मुलांना केंद्रस्थानी ठेवून गटशिक्षणाधिकारी पदावर कार्यरत असताना मी प्रत्येक केंद्रात यशस्वीपणे राबविलेल्या विज्ञान प्रदर्शनाप्रमाणेच, सध्या महाड येथे यावर्षीपासून प्रयोगिक तत्त्वावर; दुर्गम भागातील, दऱ्याखोऱ्यांतील विद्यार्थी व पालकांसाठी बालसाहित्य संमेलन सुद्धा प्रत्येक केंद्रातून घेण्याचा प्रयत्न केला. अर्थात यामागे विद्यमान संचालक, मा. श्री. दिनकर पाटील यांनी २१ वर्षांपूर्वी सातारा जिल्ह्यात सुरू केलेला व अद्यापही अविरतपणे चालत आलेला 'ग्रंथमहोत्सव' हा उपक्रम जवळून अनुभवल्याने त्याची वेगळी प्रेरणा व आदर्श मनात होताच. यामुळे केंद्रस्तरीय बालसाहित्य संमेलन घेण्यासाठी आपोआपच प्रोत्साहन मिळाले होते. त्याला महाड तालुक्यातील वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, सर्व केंद्रप्रमुख व शिक्षकांनी उत्तम प्रतिसाद देत मनावर घेतल्यामुळे ही संकल्पना संपूर्ण तालुक्यात चांगल्याप्रकारे यश मिळविताना दिसली. केंद्रस्तरावरील बालसाहित्य संमेलनाची ही कल्पना विद्यार्थी व पालकांसाठी नावीन्यपूर्ण व अनोखी असली तरी ती ज्ञान व मनोरंजनासोबतच विद्यार्थी, पालक, शिक्षक व ग्रामस्थांना बरेच काही शिकवून जाते हे महत्त्वाचे.

या देशाच्या व महाराष्ट्राच्या मातीत अनेक नामवंत लेखक, कवी, बालसाहित्यिक होऊन गेले आहेत. त्यांनी विपुल साहित्यसंपदा निर्माण केली. दैनंदिन अभ्यासाबरोबरच मुलांना यांची गोडी लागली तर त्यांच्या जीवनाला व व्यक्तिमत्त्वाला नवा आयाम मिळू शकतो. साहित्यामुळे जीवन आनंदी तर होईलच परंतु नि:संशय चांगली माणसे घडतील म्हणून शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच साहित्य संस्कारांतून अर्थात साहित्य संमेलनातून बाल पिढीला नवा आकार देण्याचा प्रयत्न सुरू केला.

तालुक्यातील प्रत्येक केंद्रातून हा उपक्रम राबविल्यामुळे केवळ ग्रामीण भागातच नाही तर दुर्गम क्षेत्रातील विद्यार्थी व पालकांनाही याचा लाभ होऊ लागला. मोठमोठ्या शहरांतून भव्यदिव्य स्वरूपात होणारे साहित्य संमेलन काय असते, हे गावपातळीवर आता समजू लागले आहे. साहित्य संमेलनातील शिस्तबद्ध वेळापत्रक, ग्रंथदिंडीपासून... साहित्यदालन, ग्रंथ प्रदर्शन, वस्तू प्रदर्शन, संमेलन-अध्यक्ष, उद्‌घाटन, मार्गदर्शन, काव्यवाचन, कथाकथन, परिसंवाद, मुलाखत अशा गोष्टी नेमकेपणाने सगळ्यांना कळायला लागल्या. शिक्षक, विद्यार्थी व पालक असे अनेक जण संमेलनात आपल्या कला व साहित्याचे सादरीकरण करू लागले. ग्रंथदिंडी, वेशभूषा, लेझीम पथक, बँड पथक, सामाजिक व प्रबोधनपर पथनाट्य इत्यादींमध्ये ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शविल्यामुळे संमेलनाला चांगली प्रसिद्धी मिळू लागली.

बाल साहित्य संमेलनाच्या निमित्ताने अनेक केंद्रांमध्ये शिक्षकांबरोबरच पालक, शाळा समिती व स्थानिक ग्रामस्थ स्वयंस्फूर्तीने कार्यक्रमाच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी उचलत आहेत असे दिसून आले, त्यामुळे आपोआप शाळेची नाळ गावाशी जोडली जाऊन गाव शाळेत आले. परिणामी शाळेचा गावाला व गावाचा शाळेला अभिमान वाटू लागला आणि याचा लाभ नक्कीच चिमुकल्या विद्यार्थ्यांना होत राहील. संमेलन म्हटले की त्यानिमित्ताने केंद्राशी संबंधित पंचक्रोशीतील सगळे ग्रामस्थ एकत्र जमणे, रस्त्याच्या दुतर्फा आकर्षक रांगोळ्या, शुभेच्छांचे फलक, दिवसभर भरगच्च कार्यक्रम, दरम्यानच्या काळात गावकीची सर्व मंडळी पुढाकार घेऊन करीत असलेले स्नेहभोजनाचे नियोजन... इ. गोष्टींमुळे संमेलनास जणू काही एखाद्या मोठ्या उत्सवाचे स्वरूप येत होते. हा उत्सव म्हणजे ज्ञानदानाचा तसेच काहीसा प्रबोधनाचा होता, असे म्हणण्यास हरकत नाही.

या प्रयोगामुळे साहित्याची आवड मुलांमध्ये निर्माण होईलच. परंतु अवांतर वाचनाची सवयही वाढेल. त्यांना पुस्तकांची गोडी लागेल. मुलांना इतिहासातील आदर्श कळतील व त्यातूनच त्यांचं माणूसपण व सुजाण नागरिकत्व आकार घेईल.

केंद्रस्तरीय साहित्य संमेलनाचा विचार माझ्या मनात सहज आला होता. तो मनावर घेऊन सगळ्यांनी उत्स्फूर्तपणे त्याला कृतीची साथ दिली. त्यामुळेच ही कल्पना मूर्त स्वरूपात उतरली. आमची जिल्हा परिषदेची मुले खरंच, खाजगी संस्थेपेक्षा कुठेही कमी नसतात. त्यांना फक्त प्रोत्साहनाची व अशा प्रेरणादायी उपक्रमांची गरज असते. म्हणूनच त्यांच्या आयुष्याच्या या महत्त्वाच्या वळणावर बालसाहित्य संमेलनाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व संपन्नतेच्या दृष्टीने त्यांच्यावर संस्कार घडू शकतील, असा विश्वास वाटतो.

*बच्चे महान होते हैं और,*

*महान बच्चों से ही राष्ट्र भी महान बनता है....*

अशी ही मुले महान बनविण्याच्या कार्यात महाडची बालसाहित्य संमेलने राज्यासाठीही दिशादर्शक ठरतील असे वाटते.

❖❖❖

---

(पृष्ठ क्र. २९ वरून)

- शैक्षणिक संस्थेमध्ये मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडे सिगारेट आणि अन्य तंबाखू उत्पादन कायदा (तंबाखू नियंत्रण कायदा) २००३ आणि अध्यादेश यांची प्रत असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक संस्थेच्या नियोजित १०० यार्ड परिसरात तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर पूर्णत: बंदी असणे आणि शैक्षणिक संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ फलक असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक संस्थेने शालेय आरोग्य उपक्रमात तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचा अंतर्भाव केलेला असणे आवश्यक. जसे की, उद्बोधन सत्र, मुक्त तपासणी आदी.
- शैक्षणिक संस्थेमध्ये जे शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी तंबाखू नियंत्रणाच्या कामात हिरिरीने भाग घेत आहेत त्यांचा मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्याकडून प्रमाणपत्र आणि बक्षिसे देऊन जाहीर सत्कार करावा.
- तंबाखू नियंत्रणासाठी नियुक्त राज्य सल्लागार प्रतिनिधींची संबंधित कामासाठी मदत घेतलेली असावी.
- तंबाखूविरोधी संदेश शैक्षणिक संस्थेच्या स्टेशनरीवर लिहिलेले असणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक संस्थेत तंबाखू नियंत्रण समितीची स्थापना करून आणि समितीच्या त्रैमासिक बैठका आयोजित करून त्यांची नोंद घेणे आवश्यक आहे.
- शैक्षणिक संस्थेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ तंबाखूमुक्त शाळा किंवा तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था परिसर असा फलक लावणे आवश्यक आहे.

❖❖❖

# प्रतिबिंब गुणवत्ता विकासाचे

**रामनाथ कराड**
गटशिक्षणाधिकारी, पं. स. शेवगांव. भ्रमणध्वनी : ९४०३१७११८५

*जिल्हा परिषदेच्या शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या, भौतिक सुविधांनी संपन्न आणि डिजिटल व्हाव्या म्हणून शासन स्तरावर विविध प्रयत्न होत आहेत. त्याचाच एक भाग म्हणजे शाळा तपासणीसाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकी शाळा भेटीच्या उपक्रमात खामगावच्या शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांवषयी आणि शिक्षकांच्या परिश्रमांविषयी....*

महाराष्ट्र शासनाचे 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र धोरण' आले आणि जिल्हा परिषदेच्या शाळा बदलू लागल्या. आपली शाळा अधिकाधिक प्रगत कशी होईल यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांतील शिक्षक प्रयत्न करू लागले. लोकसहभागातून, शिक्षकांच्या प्रयत्नांतून शाळांमध्ये एलईडी, संगणक, प्रोजेक्टर, लॅपटॉप, टॅब आले. शाळा लोकसहभागातून कात टाकू लागल्या. शाळेची रंगरंगोटी होऊ लागली. शाळेच्या भिंती बोलक्या होऊ लागल्या. शाळेचे वैशिष्ट्यपूर्ण फलक दर्शनी भागावर लागू लागले व खऱ्या अर्थाने शाळा डिजिटल होऊन शाळांमध्ये ई-लर्निंग अध्यापनास सुरुवात झाली. जिल्हा परिषदेच्या शाळेत टिकाऊ स्वरूपाचे नावीन्यपूर्ण बदल घडवून आणावयाचे असतील तर शाळेत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम घेणे आवश्यक आहे.

त्याचाच एक भाग म्हणून अहमदनगर जि. प. चे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या शाळांच्या गुणवत्ता तपासणीसाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यात जिल्हास्तरीय शैक्षणिक गुणवत्ता तपासणी पथक, तालुकास्तरीय शैक्षणिक गुणवत्ता पथक यांनी अचानक शाळेस भेट देऊन शाळेची शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्ता तपासणी करणे व मार्गदर्शन करून गुणवत्तावाढीसाठी शाळेत उपक्रम सुचविणे हा महत्त्वाकांक्षी उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविला जात आहे. शनिवारी सकाळी अचानकपणे या भेटी केल्या जातात. त्यांच्या अंमलबजावणीसाठी मा. शिक्षणाधिकारी साहेबांच्या आदेशान्वये माझ्या तालुक्यात तालुकास्तरीय पथक निर्माण केले आहे. पथकाने अचानक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खामगाव, मराठी केंद्र, जोहरापूर, तालुका शेवगाव येथे सकाळी ठीक साडेसात वाजता भेट दिली. कोणतीही पूर्वसूचना न देता शाळेत आमचे पथक गेले. शाळेत गेल्यावर तेथे अनियमितता आढळेल असे माझ्या पथकातील सदस्यांना वाटत होते, पण शाळेत प्रवेश करताच १००% गणवेशातील स्मार्ट मुले, शाळेतील दोन्ही शिक्षकांसह एकाच प्रांगणात भरत असलेली उर्दू जिल्हा परिषद शाळेची मुले व शिक्षक, संगीत व तबल्याच्या सुंदर साथीसह शाळेत चाललेल्या आदर्श परिपाठात तल्लीन झालेले दिसून आले. स्वच्छ व प्रसन्न शालेय परिसर, ३३ कोटी वृक्ष लागवड अंतर्गत लावलेली झाडे, फुलवेली, आकर्षक डिजिटल शाळेच्या बोलक्या भिंती इत्यादी पाहून माझ्यासह पथकातील सदस्यांना प्रथम दर्शनी समाधान वाटले. परिपाठ झाल्यावर दोन्ही शाळांची मुले शिस्तीत वर्गात गेली. पाठोपाठ माझ्या पथकातील सदस्य शैक्षणिक गुणवत्ता तपासणीसाठी वर्गात गेले. मी देखील इयत्ता तिसरीच्या वर्गात गेलो. इयत्ता तिसरीच्या वर्गशिक्षिकांनी मुलांसह माझे वर्गात स्वागत केले. शाळेच्या बाहेरील बोलक्या भिंती पाहून वर्गात कोणती सजावट केलेली असेल याची मला उत्सुकता होतीच. सुंदर वर्गसजावट, स्वनिर्मित व्यवस्थित लावलेले शैक्षणिक साहित्य, जोडवर्ग असल्याने ज्ञानरचनावादी वर्गरचना, लॅपटॉपवर कृतियुक्त प्रत्यक्ष चालू असलेले वर्ग अध्यापन, सोबत वर्गशिक्षिकांनी लॅपटॉपवर मराठीत टाईप केलेले दैनिक टाचण, १००% शालेय उपस्थिती, भाषा व गणित या विषयांत आढळून आलेली प्रगत मुले पाहून खरोखर जिल्हा परिषदेच्या शाळेत 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याची खात्री झाली. शाळेचे विविध शालेय अभिलेखे तपासले असता खालील वैशिष्ट्यपूर्ण उपक्रम शाळेत चालू असलेले आढळून आले :

१) **आदर्श शालेय परिपाठ :** शालेय परिपाठ तीनही भाषांतून २-२ दिवस घेतला जातो. जो वार तोच पाढा, सामान्य ज्ञान प्रश्न, इंग्रजी प्रश्न, वैज्ञानिकांची ओळख इत्यादींचा

सराव घेतला जातो. पुस्तक परिचय या नावीन्यपूर्ण घटकाचा समावेश केला आहे. परिपाठातही संगणकाचा वापर केला जातो.

२) **सक्षम शालेय व्यवस्थापन समिती :** शालेय व्यवस्थापन समितीचा शाळेला भक्कम पाठिंबा आहे. प्रिंटर, वॉटर फिल्टर, साऊंड सिस्टिम असे अत्यावश्यक साहित्य शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत यांचेमार्फत शाळेला मिळाले. एसएमसी ने आजपर्यंत लाखो रुपयांचे साहित्य दिले आहे. एसएमसी च्या बैठका नियमित होतात. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबाबत चर्चा केली जाते.

३) **नियमित वैशिष्ट्यपूर्ण पालक सभेचे आयोजन :** शाळेत नियमित पालक सभा आयोजित केली जाते व विद्यार्थ्यांच्या प्रगती विषयी, उपस्थिती विषयी चर्चा केली जाते. १००% उपस्थितीसाठी आवाहन केले जाते.

४) **आदर्श वर्ग सजावट :** भरपूर शैक्षणिक साहित्य शाळेत दिसून आले. वर्ग सजावट करताना विषयनिहाय साहित्य वेगवेगळे मांडण्यात आले आहे. तक्ते, चित्रे, मॉडेल, तरंगचित्रे, पताका यांनी वर्ग सजविला आहे.

५) **विषयनिहाय शैक्षणिक साहित्य निर्मिती :** शैक्षणिक साहित्य विषयवार बनविलेले आहे. भाषा, गणित व इंग्रजी पेटीतील साहित्याची मांडणी सुंदर व आकर्षक आहे.

६) **प्रकल्पाची निवड, नियोजन व कार्यवाही :** शालेय वर्षाच्या आरंभीच प्रकल्पाची यादी केली जाते. त्यानुसार इयत्तानिहाय प्रकल्पांची निवड करून विद्यार्थ्यांकडून सुंदर प्रकल्प बनवून घेतले आहेत. प्रकल्पाची मांडणी आकर्षकरीत्या करण्यात आली आहे.

७) **ई-लर्निंग शैक्षणिक साहित्य :** अध्ययन-अध्यापनात संगणकाचा वापर केला जातो. या अंतर्गत शैक्षणिक व्हिडिओ, पीपीटी, चित्रे यांचा वापर केला जातो. अवांतर वाचनासाठी ई-बुक्स सुद्धा विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. बीसीपीटी उपक्रमांतर्गत इंग्लिश विषयाचे व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविले जातात.

८) **लोकसहभाग :** सन २०१२-१३ पासून आतापर्यंत शाळेने रोख तसेच वस्तूरूपात मिळून तीन लाख रुपयांचा निधी मिळविला आहे. ग्रामस्थ, पालक प्रतिवर्षी सढळ हाताने शाळेस आर्थिक मदत करतात.

९) **अभिलेखे जतन :** सर्व अभिलेखे संगणकावर तयार केले जातात. दैनिक परिपाठ, दैनिक हजेरी, दैनिक टाचण वही इत्यादी सर्व संगणकावर तयार केले जाते. अभिलेखांची मांडणी आकर्षक रीतीने केलेली आहे. सर्व समित्या डिजिटल आहेत. सहा गठ्ठे पद्धतीने अभिलेखे जतन केले आहेत.

१०) **डिजिटल शाळा :** सहा संगणक, एक एलईडी, लॅपटॉप, मोबाईल, साऊंड सिस्टिम, टॅब यांद्वारे शाळा डिजिटल करण्यात आली आहे.

११) **पटवाढीसाठी केलेले प्रयत्न :** गावातून एकही विद्यार्थी इतर शाळांत शिकायला जात नाही. २०१२-१३ पासून शाळेच्या शिक्षकांनी त्यासाठी अथक परिश्रम केले आहेत. डिजिटल शाळा, ई-लर्निंग अध्ययन-अध्यापन यांमुळे शाळेचा पट वाढत असून इंग्रजी माध्यमातील मुलेही आता जि. प. शाळेत प्रवेश घेत आहेत.

१२) **आय.एस.ओ. मानांकन प्राप्त शाळा :** आय.एस.ओ. मानांकन मिळविणारी ही तालुक्यातील दुसरी शाळा आहे. आय.एस.ओ. मानांकन मिळविण्यासाठी शिक्षकांच्या अथक परिश्रमातून आयएएस चे सर्व निकष पूर्ण केले गेले आहेत.

१३) **दप्तरमुक्त शाळा :** शनिवारी शाळा दप्तरमुक्त असते. विद्यार्थी शाळेतील साहित्यावर अध्ययन-अध्यापन करतात. अशी दप्तरमुक्त शाळा आठवडाभर करण्याचे प्रयत्न चालू आहेत आणि हा प्रयोग लवकरच यशस्वी होईल अशी शिक्षकांना आशा आहे.

१४) **क्षमतेनुसार गट अध्यापन :** नवीन वर्षाच्या प्रारंभीच इ. २ री ते इ. ४ थी च्या वर्गांचा विषयनिहाय स्तर निश्चित केला जातो. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार त्यांना बसविले जाते व अध्यापनही त्यांच्या क्षमतेनुसारच घेतले जाते. सन २०१२-१३ पासून हा उपक्रम राबविला जातो. यामुळे शाळेत एकही विद्यार्थी अप्रगत नाही.

१५) **गुणवत्तावाढीतून शाळेला मिळालेले यश :** या शाळेचे विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेतही झळकलेले आहेत. शैक्षणिक गुणवत्ता विकास प्रकल्पांतर्गत शाळेने सन २०१५-१६ मध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रमांक व सन २०१६-१७ मध्ये तृतीय क्रमांक पटकाविला आहे. विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये शाळेचे विद्यार्थी झळकलेले आहेत.

(पृष्ठ क्र. ३७ वर)

# पंख अभिव्यक्तीचे

**अनिता जावळे**
जि. प. प्राथ. शाळा बोरगाव काळे. ता. जि. लातूर. भ्रमणध्वनी : ९५४५०५०२९२

भाषा हे संवादाचे साधन आहे. मुलांचे व्यक्तिमत्त्व आणि क्षमता यांच्या विकासाला बाल्यावस्थेत भाषेमुळे आकार येत असतो.

भाषा अभ्यास करीत असताना पुस्तकातील कविता मुलांना आवडतात. पाठ्यपुस्तकातील कविता आवडली तर दिवसभर मुले ती गुणगुणतात. म्हणून मुलांनाही त्यांच्या बोलीभाषेत कविता रचता येण्याचा दृष्टिकोन ठेवून आम्ही भाषादालनात उपक्रम राबविला 'आम्ही झालो कवी.'

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरगाव काळे या शाळेत इयत्ता पाचवी ते सातवीसाठी आम्ही भाषादालन उभे केले. त्यामध्ये भाषेसाठी लागणारे शैक्षणिक साहित्य, पूरक पुस्तके आणि स्वअभिव्यक्तीसाठी पूरक फलक लावण्यात आले. एक दिवस मुलांना मी कविता शिकवीत होते. मुलांना खूपच आनंद झाला आणि त्यांतील सुप्रभाने प्रश्न केला, ''मॅडम, आपल्याला पण करता येईल का कविता?'' त्यावर मी म्हणाले, ''का नाही, करू शकता की तुम्ही पण कविता !'' खरे पाहता मुलांबरोबर मी पण शिकत होते. प्रथम आम्ही एक विषय देऊन त्यावर आधारित यमक जुळणारे शब्द लिहिण्यास सुरुवात केली. जसे – शेत, शाळा, घर, अंगण असे परिसरातील विषय घेऊन आम्ही साधी साधी वाक्ये लिहिण्यास सुरुवात केली. मुलांना खूप मजा येऊ लागली. विषय दिला की लागलीच कामाला लागायचे.

मुलांनी विविध विषय घेऊन वाक्यांची जुळवाजुळव केली होती, परंतु मला काही वेगळेच अपेक्षित होते. कवितेमधून एक आशय व्यक्त व्हायला हवा असे वाटायचे. मुलांना ते जमत नव्हते. नंतर आम्ही पाठ्यपुस्तकांतील, मासिके व इतर पुस्तकांतील कविता वाचण्यास सुरुवात केली. त्यामुळे आपल्या कवितेत नेमके काय कमी आहे ते मुलांच्या पण लक्षात येऊ लागले. किशोर व इतर मासिकांमधील कविता वाचून मुले त्या कवितांच्या कवींबरोबर फोनवर संवाद साधू लागली. कविता या विषयावर चर्चा होऊ लागली आणि एक नवी दिशा मुलांना आणि शिक्षक म्हणून मला पण मिळाली.

> *मुलांच्या कल्पनाशक्तीचा, त्यांच्यातील सर्जनशीलतेचा, ती लहान आहेत म्हणून आपण फारसा विचार करीत नाही ही आपली चूक असते. त्यांनाही संधी दिली, प्रेरणा दिली की चित्ररूपात, कथारूपात, कवितेच्या रूपात ती व्यक्त होतात आणि प्रत्येकाचं वेगळं आकाश आपल्याला दिसून येतं. हे लक्षात घेऊनच एका शाळेने उपक्रम राबविला 'आम्ही झालो कवी' आणि मुलांच्या प्रतिभेला कसे पंख फुटले त्याविषयी....*

उन्हाळी सुट्टी संपून शाळा नुकतीच सुरू झाली होती. मुले शाळेत आली आणि पावसाची रिमझिम सुरू झाली. मुलांना वर्गातून बाहेर जावेसे वाटू लागले. मुले म्हणाली, ''मॅडम, सोडा ना आम्हांला बाहेर.'' मी मुलांना म्हणाले, ''ठीक आहे, पण नंतर मात्र मला पावसावर कविता करून दाखवायची बरं का!'' मुले हो... म्हणत हुर्र करीत बाहेर पळाली. मस्त मजा करत पावसात भिजण्याचा आनंद घेत होती. पाऊस थांबल्यावर वर्गात आली, अंगावरचे पावसाचे तुषार झटकले. मुले वर्गांत येण्यापूर्वीच मी फळ्यावर विषय लिहून ठेवला होता 'पाऊस'. यावर वाक्ये लिहिण्यास सांगितले आणि मग मुलांनी पाऊस या विषयावर आपापल्या कल्पनेनुसार सुंदर कविता लिहिल्या. मला तर कविता वाचून खूपच आनंद झाला.

आपल्या भावविश्वातील अनुभवांची जोड घेऊन मुले आता चांगल्या कविता करीत होती. परिसरातील अनेक गोष्टींवर मुलांनी कविता केल्या. उदा. रान, झाड, शाळा, वारा, पोपट, मोर, परी, जादूगर असे अनेक विषय घेऊन मुलांनी रचना केल्या आहेत. कवितांबरोबर मुले आता कथा पण लिहू लागली. मुलांच्या कथा वृत्तपत्रे आणि मासिकांमध्ये प्रकाशित होऊ लागल्या. पालकांना आणि मुलांना खूपच आनंद होत होता आणि शिक्षक म्हणून मला समाधान मिळत होते, आपली बोलीभाषा समृद्ध करण्यासाठी छोटी छोटी पावले टाकत मी वाट सर करीत होते.

मुले आपल्या बोलीभाषेत अभिव्यक्त होत होती; त्याला प्रमाणभाषेची जोड पण देत होती. या कथा कविता सादर

करण्यासाठी मुलांना हक्काचं व्यासपीठ हवं होतं. त्यासाठी शाळास्तरावर बाल साहित्य संमेलन घेण्याचे ठरविले, जानेवारी महिन्यात बालकदिनाचे निमित्त साधून शाळा व्यवस्थापन समिती आणि गावकरी मंडळी यांच्या सहकार्याने पहिले शाळास्तरीय बाल साहित्य संमेलन दि. ३ जानेवारी २०१९ रोजी थाटामाटात पार पडले आणि दुसरे शाळास्तरीय बाल साहित्य संमेलन दि. १४ जानेवारी २०२० रोजी संपन्न झाले. यामध्ये इतर निमंत्रित मुलांनीही आपल्या स्वरचित कथा, कविता संमेलनात सादर केल्या.

इयत्ता पाचवी ते सातवीचे विद्यार्थी स्वरचित कवितांचा संग्रह करीत होती. मुलांच्या या छान छान कविता इतरांनी देखील वाचायला पाहिजेत म्हणून पालकांच्या मदतीने मुलांचा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आला. 'आम्ही झालो कवी' हा काव्यसंग्रह पालकांना व वाचकांना खूपच भावला.

त्यातील संस्कारने लिहिलेली एक कविता – पंख मला जर असते ...

*पंख मला जर असते,*
*कोणाचेच ऐकले नसते,*
*डोंगर, नद्या पाहिले असते,*
*धरती कशी भारी दिसते.*

*शाळा, क्लासेस चिंता सोडा,*
*फक्त आकाशात उंच उडा*
*सर्व जग मी प्रत्यक्ष बघेन*
*पंख असल्यावर टिकीट का लागेल?*

*मस्त मजेत बघा जग*
*जग बघायला सोडावं लागतं घर.*
*माझी ढगांशी पक्की दोस्ती*
*करू दिवसभर धम्माल मस्ती*

*जग उडायला कमी पडेल*
*आठवा अजूबा मी घडेल!*

**संस्कार किशोर शितल पोटभरे (इयत्ता ६ वी)**

मुलांनी स्पष्ट बोलावं आणि स्पष्ट लिहावं यासाठी मी प्रयत्न करीत आहे. या बालवयात मुलांना वाचण्याची आवड, लिहिण्याची गोडी निर्माण करण्याचा छोटासा प्रयत्न मी भाषादालनातून करीत आहे.

❖❖❖

(पृष्ठक्र. ३५ वरून)

**१६) विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून दरवर्षी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ यांचा यात मोठ्या प्रमाणात सहभाग आहे.

**१७) मूल्यशिक्षण व त्याची रुजवणूक :** मूल्यवर्धन विषयक विविध उपक्रम शाळेत राबविले जातात. दिवसभरातील प्रत्येक वागणुकीतून मूल्यांची रुजवणूक केली जाते.

**१८) ड्रेस कोड :** विद्यार्थ्यांकरिता दोन गणवेश आहेत. बुधवार व शनिवारी विद्यार्थी स्पोर्ट्स ड्रेसमध्ये असतात. शनिवारी शाळेत योगासने घेतली जातात. विद्यार्थी रोज टाय, शूज घालून स्वच्छ व नीटनेटके येतात.

**१९) शैक्षणिक व्हिडिओ :** या शाळेने स्वतःचे अभ्यासक्रमाचे व्हिडिओ तयार केले आहेत. त्यांचा वापर अध्ययन अध्यापनात अतिशय प्रभावीपणे होतो. या सर्वांमुळे शाळा १००% प्रगत झाली आहे. मुले शैक्षणिक व्हिडिओ पाहताना रमतात. दृक्श्राव्य साधनांमुळे विद्यार्थ्यांनी केलेले अध्ययन–अध्यापन दीर्घकाळ स्मरणात राहते.

सध्याचे युग हे स्पर्धेचे युग असून विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक विकास होत असतो. शाळेत प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी, प्रश्नमंजूषा, चालता–बोलता व अन्य विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना दिली जाते. माझ्या वर्गाचा, माझ्या शाळेचा विद्यार्थी शैक्षणिक दृष्ट्या कसा प्रगत होईल या दृष्टीने शिक्षकांचे प्रयत्न दिसून आले. शाळेतील शिक्षकांनी शाळा स्तरावर नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून गुणवत्तावाढीसाठी केलेले प्रयत्न निश्चितच अभिनंदनीय आहेत. शाळेत राबविलेले उपक्रम पाहून 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' शासन धोरणाची प्रभावी अंमलबजावणी जि. प. च्या शाळेत होत असून शाळा 'अप्रगतहीन' करण्यासाठी शिक्षक अनुकूल प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. शाळा भेटी केल्यानंतर बहुधा कारणे दाखवा नोटीस प्रशासन बजावते. मात्र मला आलेल्या उत्कृष्ट शाळा भेटीच्या अनुभवानंतर शाळेतील शिक्षकांना, शाळेत राबवीत असलेल्या विविध उपक्रमांबद्दल अभिनंदनपर पत्र देण्याचे मनोमन ठरवून मी पथकासह विद्यार्थी व शिक्षकांसह शाळेचा आनंदाने निरोप घेतला.

❖❖❖

**कोव्हीड १९ या विषाणूजन्य साथीच्या रोग प्रसारामुळे लागू करण्यात आलेल्या संचारबंदीच्या काळात अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सुरू राहण्यासाठी लर्निंग फ्रॉम होम ही संकल्पना राबविणेबाबत.**

# शासन निर्णय

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : २०२०/प्र.क्र.८४/एस.डी.–६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : २८ एप्रिल, २०२०

**प्रस्तावना :**

सध्या देशभरामध्ये संचारबंदीची परिस्थिती आहे. जगभरातही यापेक्षा वेगळी परिस्थिती नाही. अशा गंभीर परिस्थितीत वाहतुकीचे प्रमाण कमी झाल्यामुळे, कारखाने बंद असल्यामुळे प्रदूषणाचे प्रमाणही खूप कमी झाले आहे. या परिस्थितीत विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना पर्यावरणाप्रती अधिक सजग करता येऊ शकते. संचारबंदीच्या काळामध्ये पालक, मुले, सर्व कुटुंबीय घरातच बंदिस्त झाले आहेत. अशा काळात घर हीच एक प्रयोगशाळा बनविता येऊ शकेल का? घरातील वेगवेगळे साहित्य, स्वयंपाक घरातील वस्तू, त्यांची रचना व कार्य तसेच या वस्तूंच्यामागचे विज्ञान यांबाबत मुलांमध्ये आपल्याला जागरूकता निर्माण करता येऊ शकते.

कोरोना (COVID-19) विषाणूच्या जगभरातील वाढत्या प्रादुर्भावामुळे देशात व संपूर्ण राज्यात संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये राज्यातील सर्व शाळा महाविद्यालये बंद आहेत. शालेय स्तरावरील सर्व परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. इयत्ता दहावीच्या परीक्षा रद्द करण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत राज्यात लागू करण्यात आलेली संचारबंदी पुढील कालावधीकरिता वाढविण्यात आली आहे. संचारबंदीच्या या काळात प्रत्येक विद्यार्थ्याने शिक्षणाच्या प्रवाहात असणे महत्त्वाचे आहे. या मुलांना अध्ययन–अध्यापनाच्या प्रक्रियेत ठेवण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब करावा लागणार आहे. संचारबंदीच्या या काळात मुलांच्या मनामध्ये असलेली भीती, चिंता दूर करण्याचा प्रयत्नही करणे आवश्यक आहे. हाती असलेल्या वेळेचा सदुपयोग करून काही नव्या गोष्टी करता येऊ शकतात. यासाठी तंत्रज्ञानाच्या या युगात ऑनलाईन शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे आता उपयुक्त ठरणार आहे. त्याआधारे मुलांना आता स्वयंअध्ययन करता येईल. सद्य:स्थितीत शालेय अभ्यासक्रमातील मराठी, गणित, विज्ञान, इंग्रजी, हिंदी, इतिहास व नागरिकशास्त्र, भूगोल, कला, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण या विषयांच्या अभ्यासाची आता नवीन दिशा ठरविता येईल. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये तंत्रज्ञानाचा वापर खूप चांगल्या प्रकारे करता येऊ शकेल.

मुलांच्या शिक्षणात पालकांचा सहभाग वाढविण्यासाठी सध्या खूप वाव आहे. मुलांचा कल, छंद, वृत्ती, दृष्टिकोन समजून घेण्यासाठी आपल्याला पालकांना काही मदत करता येऊ शकेल का? त्यासाठी त्यांना प्रश्नावली पुरविता येऊ शकेल का? याचाही विचार करता येऊ शकतो. सध्या शालेय अभ्यासक्रम अध्ययन–अध्यापनाचे कार्य बंद असले तरी मुलांचे अध्ययन मात्र बंद नाही. ते सतत चालू असते, पण अभ्यासापलीकडच्या या अध्ययनाला शालेय अभ्यासाची जोड देता आली तर शिक्षण हे अधिक समृद्ध, सखोल आणि समजपूर्वक करता येऊ शकते. त्यासाठी आपल्याला तंत्रज्ञानाची मदत घेता येऊ शकेल का?

कोरोना (COVID-19) या विषाणूच्या प्रसारामागील विज्ञान समजावून घेतलं तर असं लक्षात येतं की, हा विषाणू माणसांच्या सभा संपर्कामुळे (Community transfer) मोठ्या प्रमाणात प्रसारित होतो. त्यामुळे सध्या जगभरामध्ये अनिवार्य कामासाठी भेटणाऱ्या व्यक्ती एकमेकांपासून अंतर ठेवून काम करीत आहेत. एकमेकांना अभिवादन करण्याच्या पद्धतीतही बदल झाले आहेत. मोठ्या प्रमाणामध्ये भारतीय संस्कृतीतील अभिवादनाची पद्धती जगभरामध्ये वापरली जात आहे. या दृष्टिकोनातून भारतीय संस्कृतीला जगामध्ये एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. अशा परिस्थितीत भारतीय संस्कृतीचा वारसा मुलांना समजावून सांगून त्याचे महत्त्व पटवून देण्याची ही योग्य वेळ आहे.

**शासन परिपत्रक :**

महाराष्ट्र शासनाने या पूर्वीपासूनच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी उपाययोजना केलेल्या आहेत. त्या सर्व पालकांपर्यंत आणि मुलांपर्यंत पोहोचून आपले शिक्षण आपण या काळात सुद्धा चालू ठेवू शकतो. त्यासाठी वेगवेगळी संकेतस्थळे, पोर्टल, प्लॅटफॉर्म आणि शैक्षणिक ॲप्लिकेशन्स यांचा वापर शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांनी करावा. तंत्रज्ञानाचा वापर करताना सायबर सिक्युरिटी संदर्भातही विद्यार्थी आणि पालक यांचे सतत उद्बोधन होणे आवश्यक आहे. सद्य:स्थितीमध्ये अध्ययन–अध्यापन प्रक्रिया सुरू राहण्यासाठी काही महत्त्वाच्या संसाधनांची माहिती शासन

सर्वांना करून देत आहे. त्यांचा अधिकाधिक वापर करण्याची आवश्यकता आहे. याकरिता घरी राहून शिक्षण (Learning From Home) ही संकल्पना राबविण्यासाठी खालील संसाधनांची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे. या संसाधनांचा जास्तीत जास्त वापर करून लर्निंग फ्रॉम होम ही संकल्पना प्रत्यक्षात अमलात आणावी.

१) **DIKSHA :** प्रत्येक शिक्षक व विद्यार्थी यांना मोफत आणि मुबलक प्रमाणात ई–लर्निंग साहित्य मिळावे म्हणून केंद्र शासन (MHRD) आणि महाराष्ट्र शासनाने DIKSHA ई–लर्निंग प्लॅटफॉर्म सुरू केला आहे.

DIKSHA वर सद्य:स्थितीमध्ये इयत्ता १ ली ते १० वी साठी मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू भाषेमधील ९००० पेक्षा अधिक ई–लर्निंग साहित्य उपलब्ध आहे. या वर उपलब्ध ई–साहित्यामध्ये प्रामुख्याने इंटरॅक्टिव व्हिडिओ, संकल्पनेवर आधारित व्हिडिओ, उपक्रमांवर आधारित व्हिडिओ, बौद्धिक स्वरूपातील खेळ, विविध वर्कशिट्स, इंटरॅक्टिव प्रश्नपेढी इत्यादींचा समावेश आहे. महाराष्ट्रातील शिक्षकांनी देखील DIKSHA वरील ई–साहित्याची निर्मिती केली आहे. DIKSHA वरील उपलब्ध ई–साहित्याचा वापर करून विद्यार्थी घरबसल्या आपले अध्ययन सुरू ठेवू शकतात तसेच पालक याचा वापर करून विद्यार्थ्यांचा अभ्यास घेऊ शकतात.

अ) **इयत्ता १ ली ते १० वी साठीचे DIKSHA मोबाईल अ‍ॅप :** इयत्ता १ ली ते १० वी च्या राज्य शासनाच्या अभ्यासक्रमावर आधारित प्रत्येक पाठ्यपुस्तकामध्ये Q. R. Code देण्यात आले आहेत. या Q.R. Code ला शिक्षकांमार्फत तयार करण्यात आलेले ई–लर्निंग साहित्य जोडलेले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वयंअध्ययनावर आधारित काही उपक्रमांचा समावेश देखील करण्यात आलेला आहे. हे सर्व साहित्य पाठ्यपुस्तकातील Q. R. कोड DIKSHA अ‍ॅप वापरून स्कॅन केल्यावर सहज पाहता येणार आहे. तसेच पाठ्यपुस्तक नसल्यास सर्व साहित्य DIKSHA अ‍ॅप मध्ये सर्च व फिल्टर या पर्यायांचा वापर करून देखील पाहता येणार आहे. हे साहित्य ऑफलाईन वापरण्याची सुविधाही देण्यात आली आहे. DIKSHA अ‍ॅप डाऊनलोड करण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा.
https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.diksha.app

आ) **इयत्ता १ ली ते १० वी साठीचे DIKSHA वेब पोर्टल :** संगणक व लॅपटॉपवर देखील DIKSHA मधील ई–साहित्य पाहण्यासाठी DIKSHA वेब पोर्टल विकसित करण्यात आले आहे. यात इयत्ता १ ली ते १० वी च्या सर्व विषयांचे ई–साहित्य पाहता येते. DIKSHA वेब पोर्टल वर ई–साहित्य पाहण्यासाठी खालील लिंक वर क्लिक करा.
www.diksha.gov.in/explore

इ) **क्रिएटिव्ह आणि क्रिटिकल थिंकिंग (सीसीटी) प्रश्न :** इयत्ता आठवी–दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वाचन, गणित आणि विज्ञान साक्षरतेवरील CCT आठवड्यातून DIKSHA वर अपलोड केल्या जातात. CCT सरावासाठी नवीन प्रश्न दर सोमवारी अपलोड केले जातात आणि गुरुवारी उत्तरे दिली जातात, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विचार कौशल्य निर्माण करण्याची चांगली संधी उपलब्ध होते. हे प्रश्न बघण्यासाठी खालील URL चा वापर करावा. CCT मार्फत सदर उपक्रम इतर इयत्तांसाठी लवकरच उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
https://diksha.gov.in/resources/play/collection/do_31290608850520473612338?contentType=TextBook

२) **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती' :** पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता १ ली ते १२ वी च्या राज्य अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्यात येते. यास अनुसरून खालीलप्रमाणे अध्ययन साहित्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे :

अ) **ऑनलाईन पाठ्यपुस्तके :** इ.१ ली ते १२ वी साठीची सर्व पाठ्यपुस्तके डाऊनलोड करण्यासाठी बालभारती वेबसाईट www.ebalbharati.in या संकेतस्थळावर जाऊन PDF BOOKS DOWNLODING मधून इयत्ता १ ली ते १० वी ची राज्य अभ्यासक्रमावरील एकूण दहा भाषा माध्यमांतील पाठ्यपुस्तके PDF स्वरूपात डाऊनलोड करावी. तसेच इयत्ता ११ वी व १२ वी ची मराठी आणि इंग्रजी या भाषा माध्यमांतील PDF स्वरूपातील पाठ्यपुस्तके डाऊनलोड करावी. पाठ्यपुस्तके डाऊनलोड करण्यासाठी खालील लिंकचा वापर करता येईल.
www.ebalbharati.in
http://cart.ebalbharati.in/BalBooks/ebook12.aspx

आ) **ई–बालभारती :** पाठ्यपुस्तक मंडळाच्या ई–बालभारतीच्या माध्यमातून **इयत्ता दहावीच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांतील सर्व विषयांचे ई–लर्निंग साहित्य** तयार करण्यात आलेले आहे. या साहित्यामध्ये प्रत्येक पाठाचे व्हिडिओ ॲनिमेशनसह देण्यात आले आहेत. पाठावर आधारित स्वाध्याय, प्रश्नपेढी व काही कृती देण्यात आल्या आहेत. हे साहित्य ई–बालभारतीच्या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहे. सदर साहित्य डाऊनलोड करून ऑफलाईन स्वरूपात वापरता येते. यासाठी पुढील लिंक वापरावी.
https://learn.ebalbharati.in/
https://play.google.com/store/apps.details?id=com.EBalBharati

ई) **बोलकी बालभारती (Talking Books) :** ई– बालभारतीच्या माध्यमातून इयत्ता ८ वी ते १० वी च्या दिव्यांग (दृष्टी संदर्भात) तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी मराठी व इंग्रजी माध्यमाची सर्व भाषा विषयांची Talking Books तयार करण्यात आली आहेत. ती ऑडिओ स्वरूपात असल्याने विद्यार्थ्यांना त्यांचे श्रवण करता येईल. त्यासाठी पुढील लिंक वापरावी.

https://learn.ebalbharati.in/

ई) **इयत्ता ८ वी ते १० वी विज्ञान, भूगोल, संस्कृत विषयाचे व्हिडिओ स्वरूपातील साहित्य :** बालभारतीने पुणे येथील ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मदतीने संयुक्तरीत्या इयत्ता ८ वी ते १० वी विज्ञान, भूगोल, संस्कृत विषयाचे व्हिडिओ स्वरूपातील साहित्य तयार करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यानुसार विषयनिहाय पाठांच्या सादरीकरणाचे व्हिडिओ, प्रात्यक्षिक कार्याचे व्हिडिओ अशा स्वरूपाचे साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी खालील लिंक वापराव्यात.

www.youtube.com/user/ERCJPP,

www.diksha.janaprabodhini.org

https://learn.ebalbharati.in/

**https:**//www.youtube.com/channel/UYCacnAJUq6dkmYrvb401cRA

उ) **बालभारती YouTube वाहिनी :** पाठ्यपुस्तक मंडळाने यू–ट्यूब वाहिनी सुरू केलेली आहे. यामध्ये इयत्ता ८ वी ते १० वीचे विज्ञान, भूगोल आणि संस्कृत विषयांचे पाठनिहाय संकल्पना, घटक, उपघटक व प्रात्यक्षिक कार्य संदर्भातील व्हिडिओ उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. याशिवाय इयत्ता ११ वी च्या अभ्यासक्रमाचे संदर्भात विद्यार्थी, शिक्षक यांनी अध्ययन–अध्यापन प्रक्रिया कशी अवलंबवावी याबाबतची माहिती देणारे अभ्यासमंडळ तज्ज्ञांचे व्हिडिओ उपलब्ध करून दिले आहेत. त्यासाठी खालील लिंकचा वापर करावा.

https://www.youtube.com/channel/UYCacnAJUq6dkmYrvb401cRA

ए) **पाठ्यपुस्तक मंडळाचे ई–बालभारती ॲप :** Google Play Store मधून ebalbharati app डाऊनलोड करावे. यावर आपले खाते उघडण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. सदर ई–बालभारती ॲपवर ऑडिओ–व्हिडिओ इंटरॅक्टिव्ह स्वरूपातील साहित्य उपलब्ध आहे. सदर साहित्य एकदाच डाऊनलोड करून ते पुन्हा पुन्हा ऑफलाईन वापरण्याची सोय आहे.

https://play.google.com/store.apps.details?id=com.EBalBharati

ऐ) **किशोर मासिक :** पाठ्यपुस्तक मंडळामार्फत किशोर मासिक तयार करण्यात येते. १९७१ पासून ते चालू महिन्यापर्यंतचे असे ४९ वर्षांतील सर्व अंक आता ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. विद्यार्थी, पालक तसेच शिक्षकांना बालभारतीच्या संकेतस्थळावर PDF स्वरूपात अवांतर वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यासाठी

http://kishor.ebalbharati.in/Archive/ या लिंकचा वापर करावा.

३) **अवांतर वाचनासाठीची वेबसाईट व ॲप्लिकेशन :**

**Bolo : वाचनासाठीचे मोबाईल ॲप्लिकेशन :** Google द्वारा निर्मित Bolo हे ॲप्लिकेशन मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांमध्ये वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी उपयुक्त आहे. त्या संदर्भातील लिंक पुढीलप्रमाणे आहे.

https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android.apps.seekh

४) **NROER : इ.१ ली ते १२ वी साठीच्या सर्व विषयांसाठी ई–साहित्य संग्रह :** राष्ट्रीय पातळीवर इ. १ ली ते १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेले सर्व ओपन सोर्स ई–साहित्य नॅशनल डिपॉझिटरी ऑफ ओपन एज्युकेशनल रिसोर्सेस येथे उपलब्ध आहेत. NROER मध्ये विविध भाषेतील ई–साहित्य उपलब्ध आहे. यासाठी खालील URL चा वापर करावा.

http://nroer.gov.in/welcome

५) **e-Pathshala :** NCERT ने इयत्ता १ ली ते १० वी साठी विविध प्रकारचे ई–साहित्य e-Pathshala वर विविध भाषेत अपलोड केली आहेत. यासाठी खालील URL चा वापर करावा.

http://epathshala.nic.in

http://epathshala.gov.in

६) **SWAYAM :** हा राष्ट्रीय ऑनलाईन शैक्षणिक प्लॅटफॉर्म आहे. यामध्ये शालेय शिक्षणाशी संबंधित (इयत्ता नववी–बारावी) आणि उच्च शिक्षण (पदवीधर आणि पदव्युत्तर कार्यक्रमांतर्गत) चे १९०० ऑनलाईन अभ्यासक्रम देण्यात आले आहेत. यासाठी खालील URL वापरावे.

https://swayam.gov.in

७) **SWAYAM PRABHA :** यामध्ये शैक्षणिक सामग्री २४ × ७ प्रसारित करणारी ३२ डीटीएच टीव्ही चॅनेल्स आहेत. डीडी, फ्री डिश सेट टॉप बॉक्स आणि अॅन्टीना वापरून ही चॅनेल्स देशभरात पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. प्रत्येक चॅनेलचे वेळापत्रक आणि इतर तपशील पोर्टलवर उपलब्ध आहे. या चॅनेलमध्ये शालेय शिक्षण (इयत्ता नववी–बारावी) आणि उच्च शिक्षण (पदवीधर आणि पदव्युत्तर कार्यक्रमांतर्गत) या दोन्ही गोष्टींचा समावेश आहे. यासाठी खालील URL वापरावे. तसेच या अंतर्गत NCERT चे किशोर मंच २४ × ७ टीव्ही चॅनेलसाठी चॅनेल ३१ वर भेट देता येईल.
https://swayamprabha.gov.in

८) **PODCAST :** CBSE ने एक पॉडकास्ट अॅप 'सीबीएसई–शिक्षा वाणी' लॉन्च केले असून हे अँड्रॉइड फोन वापरकर्त्यांसाठी Google Play Store वर उपलब्ध आहे. विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि मुख्याध्यापकांना पॉडकास्टद्वारे महत्त्वपूर्ण माहिती प्रसारित करण्यासाठी याचा उपयोग होतो. स्टोरी टेलिंग पासून ते विविध शैक्षणिक व कौशल्याधारित विषयांपर्यंत तज्ज्ञांद्वारे विविध विषयांवर ऑडिओ फाईल तयार करणे यामुळे शक्य झाले आहे.

९) **National Digital Library of India :** विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या भाषांमधील ८०००० पुस्तके ई–बुक स्वरूपात या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. नॅशनल डिजिटल लायब्ररी ऑफ इंडिया ही शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, शिक्षक, विद्यार्थी, व्याख्याते, विद्यार्थी आणि शिकण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकासाठी व्यासपीठ आहे. यासाठी
https://ndl.iitkgp.ac.in/ हे URL वापरा.

१०) **विज्ञान विषयासाठी सिम्युलेशन मोबाईल अॅप्लिकेशन :** PhET विज्ञान विषयातील विविध प्रयोग आभासी प्रयोगशाळेच्या माध्यमातून समजून घेण्यासाठी इंटरॅक्टीव्ह स्वरूपाचे अॅप खालील लिंकवर उपलब्ध आहे.
https://play.google.com/store/apps/details?id=edu.colorado.phet.android_app

११) **Google Classroom :** शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रकल्प, गृहपाठ, अभ्यास, ई–साहित्य पुरविण्यासाठी मोबाईल अॅप्लिकेशन-Google Classroom. यानुसार अध्ययन साहित्याची देवाणघेवाण करण्यासाठी हा प्लॅटफॉर्म उपयुक्त आहे.
https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android apps.classroom

१२) **Google Hangouts :** विद्यार्थ्यांशी ऑडिओ किंवा व्हिडिओ कॉल ने संवाद साधण्यासाठी/अध्ययन–अध्यापनासाठी मोबाईल अॅप्लिकेशन – Google Hangouts. Google चे हे अॅप्लिकेशन शिक्षक–विद्यार्थी–पालक यांच्यात ऑडिओ किंवा व्हिडिओ स्वरूपात संवाद साधण्याचा उत्तम प्लॅटफॉर्म आहे. याकरिता पुढील लिंक वापरता येईल.
https://play.google.com/store/apps/details?id=com.google.android apps.meetings

१३) **ई–साहित्य उपलब्ध असलेला आंतरराष्ट्रीय संग्रह – Global Digital Library :** आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळ्या देशांत बनविल्या गेलेल्या ओपन रिसोर्स व ई–साहित्याचा प्लॅटफॉर्म मोबाईल अॅप्लिकेशन स्वरूपात खालील लिंकवर उपलब्ध आहे.
https://play.google.com/store/apps/details?id=io.digitallibrary.reader

१४) सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२००५०४१५४७२१८१२१ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही/–)
(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

## प्रिय संपादक ....

मी 'जीवन शिक्षण' मासिकाचा नियमित वाचक आहे. नुकताच प्रसिद्ध झालेला मार्च २०२० चा अंक वाचला.

मार्च २०२० च्या अंकाच्या मलपृष्ठावर 'श्रेया गोरक्षनाथ सजन' या आमच्या शाळेच्या इ. तिसरीच्या विद्यार्थिनीच्या हस्ताक्षरास जाहीर प्रसिद्धी दिलेली नजरेस आली.

या प्रसिद्धीमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शाळांपर्यंत पोहोचण्याची संधी आमच्या श्रेयाच्या हस्ताक्षरास मिळाली. आम्ही आपले ऋणी आहोत.

महाराष्ट्रातून आम्हांस खूप पत्रे, अभिनंदन पत्रे, शुभेच्छा प्राप्त झाल्या. 'जीवन शिक्षण' मासिकामुळे एखाद्या चांगल्या उपक्रमास नेहमीच सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळते.

**श्री. राजेंद्र नारायण शिंदे**

जि. प. प्राथ. शाळा कडूवस्ती (सात्रळ), ता. राहुरी, जि. अहमदनगर

---

मी 'जीवन शिक्षण' मासिकाचा नियमित वाचक आहे. महिला दिनाच्या औचित्याने माहे मार्च च्या अंकातील संचालक, मा. शकुंतला काळे मॅडम यांची मुलाखत समाजप्रबोधनपर आणि प्रेरणादायी वाटली. 'पाखरांची शाळा', 'आम्ही लिहिलेले आगळेवेगळे पुस्तक' हे लेख दिशा देणारे वाटले. अंकातील नवनव्या उपक्रमांतून नेहमीच अधिक नवे उपक्रम घेण्याविषयी प्रेरणा मिळते. हा अंक विद्यार्थी गुणसंपन्न करण्यासाठी शिक्षकांना दीपस्तंभासारखा मार्गदर्शक आहे.

**सौ. श्रद्धा गणेश अंबुर्ले**

जि. प. प्राथ. शाळा विंचवली, ता. माणगाव, जि. रायगड

---

माहे फेब्रुवारी २०२० च्या 'जीवन शिक्षण' च्या अंकातील लेख अतिशय माहितीपूर्ण, वाचनीय व प्रेरणादायी आहेत. निष्ठा प्रशिक्षणासंदर्भात 'शिक्षक समृद्धतेचा प्रवास' हा अतिशय माहितीपूर्ण लेख आहे.

श्री. पोपट निकम यांचा 'स्वच्छतेचा दूत संत गाडगेबाबा' हा लेख खूपच भावला. शालेय शिक्षणाचे राष्ट्रीय स्तर मूल्यांकन SEQI व PGI तौलनिक विचार या लेखामधून आम्हां शिक्षकांच्या त्याविषयीच्या संकल्पना स्पष्ट होण्यास मदत झाली आहे. त्या संदर्भात सारांशानुसार योग्य ती माहिती मिळालेली आहे. प्रशांत कोळसे यांचा राष्ट्रीय विज्ञान दिवस हा लेख खूप सुंदर व वाचनीय आहे. Raman Effect याविषयी अतिशय सखोल माहिती या लेखामधून मिळते. हा लेख संग्रही ठेवण्यासारखा आहे.

मलपृष्ठावरील कार्यानुभव विषयातील 'कागदी ग्लासापासून साहित्य निर्मिती' हा राजेद्र काकडे यांचा उपक्रम विद्यार्थ्यांना कृतिशील करण्याकरिता अतिशय महत्त्वाचा वाटतो. अशा कृती मुले आनंदाने करतात.

अशाप्रकारे अतिशय रंजक माहिती आमच्यापर्यंत पोहोचते ती 'जीवन शिक्षण' मासिकाच्या माध्यमातून. त्याकरिता संपादकीय मंडळाचे मन:पूर्वक अभिनंदन व आभार.

प्रिय संपादक या स्तंभामध्ये आम्हांला सुद्धा आमच्या प्रतिक्रिया पाठवायला व इतर वाचकांच्या प्रतिक्रिया वाचायला मिळतात ही अतिशय चांगली बाब आहे.

**श्री. हेमंत ईश्वर तिमांडे**

जि. प. उच्च प्राथ. शाळा वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ

# महाराष्ट्र राज्याची प्रतिके

## राज्य प्राणी - शेकरू

**शास्त्रीय नाव : रटूफा इंडिका**



मोठी खार म्हणून ओळख. महाराष्ट्रात सह्याद्रिच्या रांगेत दाट जंगलात प्रामुख्याने भीमाशंकर, फणसाड, अंबाघाट जंगल तसेच मेळघाट अभयारण्य, ताडोबा राष्ट्रीय उद्यान येथे अधिवास. वजन दोन ते अडीच किलो व लांबी अडीच ते तीन फूट असते. डोळे गुंजेसारखे लालभडक, मिशा, अंगभर तपकिरी तलम कोट आणि गळ्यावर, पोटावर पिवळसर पट्टा आणि शेपूट झुबकेदार लांबलचक असते. एका झाडावरून दुसऱ्या झाडावर सहज झेप घेणारा शेकरू १५ ते २० फूट लांब उडी मारू शकतो. डहाळ्या व पाने वापरून बनविलेले शेकरूचे घरटे गोलाकार असते. सुरक्षेसाठी हे घरटे बारीक फांद्यांवर बांधले जाते, जेथे अवजड परभक्षी पोहोचू शकत नाहीत. एक शेकरू सहा ते आठ घरे तयार करतो. शेकरूची मादी वर्षातून एकदाच डिसेंबर-जानेवारीमध्ये पिलाला जन्म देते.एखाद्या घरट्यातच शेकरूची मादी पिले देते. इतर फसव्या घरट्यामुळे पिल्लांचे शत्रूपासून रक्षण होते. शेकरू हा अतिशय देखणा आणि झपाट्याने दुर्मीळ होत चाललेल्या प्रजातीतील प्राणी आहे.

## राज्य पक्षी - हरियाल



**शास्त्रीय नाव : ट्रेरॉन फोनिकॉप्टेरा**

हा पक्षी महाराष्ट्र, गुजरात, बंगाल, राजस्थान, पंजाब व आसाम येथील अभयारण्यांत दिसून येतो. तसेच पाकिस्तान आणि श्रीलंका येथेही हरियाल सापडतो.हा कबूतरवंशीय पक्षी आहे. याला हिरवा होला, हरोळी, यलो फुटेड ग्रीन पिजन किंवा पिवळ्या पायाची हरोळी या नावांनीही संबोधले जाते. हा पक्षीही दुर्मीळ झाला आहे.

पाचूसारखी हिरवी झाक व पिवळ्या, निळ्या, जांभळ्या अशा कितीतरी रंगांच्या छटा हरियालच्या अंगावर असतात. हरियाल हा कबूतरासारखाच घुमतो. कधीकधी चिर्र... चिर्र... आवाज करीत फिरतो. नर आणि मादी हरियाल यांच्यात बाह्यतः फरक दिसत नाही. गर्द हिरव्या झाडांची ठिकाणे, प्रामुख्याने वड, पिंपळ,उंबर, अंजीर अशा झाडांवर आढळतात. हे पक्षी नेहमी थव्यानेच उडतात. विणीचा हंगाम मार्च ते जून या कालावधीत असतो. या काळात उंच झाडावर काड्यांनी बनविलेल्या घरट्यात हे पक्षी अंडी घालतात.

## राज्य फळ - आंबा

**शास्त्रीय नाव : मॅंजिफेरा इंडिका**



आंब्याचा उगम नक्की कुठे झाला हे ज्ञात नाही, परंतु दक्षिण आणि दक्षिणपूर्व आशियामध्ये आंब्याचा उगम झाला असावा असे मानण्यात येते. हा विषुववृत्तीय प्रदेशात आढळणारा वृक्ष आहे. अवीट गोडीच्या याच्या फळाला महाराष्ट्रात कोकणचा राजा म्हणतात. एप्रिल-जून हा या फळाचा हंगाम असतो. कच्च्या आंब्याला कैरी म्हणतात. कैरी ही चवीला आंबट असते, आंबट नसलेल्या कैरीला खोबरी कैरी असे नाव आहे. आंबा फळांचा राजा आहे. भारतीय संस्कृतीमध्ये आंब्याला विशेष महत्त्व आहे. आंब्याची पाने अनेक धार्मिक कार्यक्रमांत वापरण्यात येतात. आंबा हे भारत आणि पाकिस्तान या देशांचे राष्ट्रीय फळ, बांग्लादेशाचे राष्ट्रीय झाड आणि फिलिपाईन्सचे राष्ट्रचिन्ह आहे. जगाच्या आंबा उत्पादनापैकी ५६ टक्के आंब्याचे उत्पादन एकट्या भारतात होते. भारतात आंब्याच्या जवळपास १३०० जातींची नोंद आहे, परंतु २५ ते ३० जाती या व्यापारी दृष्ट्या महत्वाच्या आहेत. नीलम व हापूस यांच्या संकरीकरणातून कोकण कृषी विद्यापीठाने रत्ना ही जात विकसित केली आहे. गुजरात राज्यातील केशर हे वाण महाराष्ट्रातील कोरडवाहू पट्ट्यांमध्ये अतिशय लोकप्रिय आहे. दक्षिण भारतातील तोतापुरी, आंध्र प्रदेशातील बैंगणपल्ली, उत्तर प्रदेशातील दशेरी, लंगडा, दक्षिणेतील नीलम, पायरी, मलगोवा या जाती प्रसिद्ध आहेत. याव्यतिरिक्त संशोधन केंद्राने दशेरी व नीलम यांच्या संकरामधून आम्रपाली आणि नीलम व दशेरी यांच्या संकरामधून मल्लिका ही जात विकसित केली आहे. कोकण विद्यापीठाने बिनकोयीची सिंधू ही जात विकसित केली आहे.

'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. दिनकर पाटील यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव बु.।।, सिंहगड रोड, पुणे-४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

Date of Publication 3 May 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th of May 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/57
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

## राज्य फूल - ताम्हण


**शास्त्रीय नाव : लॅगस्ट्रोमिया रेजिनी**



कडक उन्हाळ्यात जांभळ्या रंगाच्या फुलांनी फुललेले हे वृक्ष अनेकांचे लक्ष वेधून घेतात. हे झाड साधारण गोलसर, डेरेदार असते. याचे फूल पूर्ण उमलल्यानंतर सहा ते सात सेंटिमीटर व्यासाचे होते. त्या फुलाला झालरीसारखी दुमड असणाऱ्या सहा किंवा सात नाजूक, तलम, चुणीदार पाकळ्या असतात. कोकणात नदी-नाल्यांच्या काठांवर, बंगाल, आसाम, दक्षिण भारत, अंदमान, निकोबार आणि श्रीलंका येथील जंगलात तसेच म्यानमार, मलाया, चीन या देशांत नदीकाठी आणि दलदलीच्या भागात ही झाडे मोठ्या प्रमाणावर आढळतात. हे झाड सरासरी दहा ते वीस मीटर उंचीचे असते. भारतात त्याचा वापर शोभेसाठी केला जातो. रायगड जिल्ह्यात माणगाव येथे जारूळाचा अंदाजे शंभर फूट उंचीचा वृक्ष आहे. लाकूड लालसर रंगाचे, मजबूत, टिकाऊ, चमकदार असते. टिकाऊपणा आणि उपयोग या बाबतीत जारूळ हा वृक्ष सागवानाच्या झाडाशी स्पर्धा करतो. हे लाकूड इमारती, होड्या, घरबांधणी, पूल, मोटारी, जहाज बांधणी, रेल्वे वॅगन अशा विविध कामांत आणि विविध वस्तू बनविण्यासाठी वापरले जाते.

हा वृक्ष भरपूर पाणी मिळणाऱ्या जागी वाढतो. हे झाड एप्रिल ते जूनच्या दरम्यान फुलून येते. त्याचे शास्त्रीय नाव 'लॅजिस्ट्रोमिया' असे आहे. हा सपुष्प वृक्ष लिथ्रेसी किंवा मेंदी कुळातील आहे. त्याला जारूळ, तामण, बोंडारा, बोंद्रा, बुंद्रा अशी इतर नावेही आहेत. भारतीय उपखंडातील जंगली फूल म्हणून याची ओळख असली तरी त्याच्या गुणांमुळे ते फूल युरोप-अमेरिकेतही पोहोचले आहे. ताप आला असल्यास या झाडाच्या सालीचा काढा दिला जातो तसेच तोंड आले असल्यास याचे फळ तोंडाला आतून लावले जाते. ताम्हणाच्या पानांत-फळांत 'हायपोग्लिसेमिक' हे द्रव्य असते. ते मधुमेहावर गुणकारी आहे. पोटदुखीवरील इलाज आणि वजन कमी करण्यासाठी या झाडाचा उपयोग केला जातो. याच्या फुलास शासनाने राज्य पुष्पाचा दर्जा दिला आहे. देशातील वनस्पती शास्त्राच्या अभ्यासकांनी जारूळाचे 'प्राईड ऑफ इंडिया' असे सार्थ नामकरण केले आहे. एप्रिल ते जून या कालावधीत या वृक्षाला आकर्षक फुले येत असल्याने ते सर्वांचे लक्ष वेधून घेते.

## राज्य फुलपाखरू - राणी पाकोळी



**शास्त्रीय नाव : पॅपिलिये पॉलिम्नेस्टर**

भारतातील महाराष्ट्र राज्याचे राज्य फुलपाखरू म्हणून याचे नाव घोषित झाले आहे. २२ जून, २०१५ रोजी महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाने या फुलपाखराला राज्य फुलपाखराचा दर्जा दिला. राज्य फुलपाखरू घोषित करणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. ब्लू मॉरमॉन हे फुलपाखरू श्रीलंका व भारतातील महाराष्ट्र, दक्षिण भारत व पूर्व समुद्र किनारपट्टीच्या क्षेत्रात आढळते. सध्या विदर्भापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत त्याचे अस्तित्व आहे. ब्लू मॉरमॉन हे फुलपाखरू भारतातील आकाराने सर्वांत मोठ्या असलेल्या सदर्न बर्डविंग या फुलपाखरानंतरचे सर्वांत मोठे फुलपाखरू असून ते मखमली काळ्या रंगाचे असते. त्याच्या पंखांवर निळ्या रंगाच्या चमकदार खुणा असतात. पंखाखालील बाजू काळी असून शरीराकडील एका बाजूवर लाल ठिपका असतो. महाराष्ट्रात फुलपाखरांच्या जवळपास २२५ प्रजाती आहेत. देशातील १५ टक्के फुलपाखरे महाराष्ट्रात आढळतात.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ______________

______________

______________

______________